उत्कृष्ठ क्वालिटी
साबुदाणा ५५ रु.किलो
सेंद्रिय गुळ ५० रु.किलो
सागर ड्रायफ्रुट
पत्ता : व्ही.के.चौधरी मार्केट, हॉटेल शेरे पंजाब समोर, पाचकंदिल, धुळे (मो.९३७११९२०००)

# आपला महाराष्ट्र

मूल्य २.००

संस्थापक - लोकमित्र भाई मदाने

WWW.APLAMAHARASHTRA.IN

संयुक्त वर्ष ६८ ■ अंक क्र.१२४ ■ रविवार ९ फेब्रुवारी २०२५ ■ धुळे, नंदुरबार, जळगाव, नाशिक आवृत्ती ■ पाने ८

POST REGD.No./DHL/53/24-26

श्री नेत्रालय हॉस्पिटल
नवीन जागेत
विश्वकर्मा कॉम्प्लेक्स, १ ला मजला, दत्तमंदिर चौक, देवपूर, धुळे
* कॉम्प्युटरच्या सहाय्याने डोळे तपासणी व उपचार
* फेको पद्धतीने व बिनटाक्याच्या पद्धतीने माफक दरात मोतीबिंदू शस्त्रक्रिया करण्यात येईल.
* तपासणी वेळ : संध्या. ४ ते रात्री ९ पर्यंत
मो.नं.९५१८३९७५९२ / ९४२१५१७६६३

## दिल्लीत 'आप'चा गड ढासळला, काँग्रेसचा सुपडा साफ
## केजरीवाल, सिसोदियांसह मातब्बरांचा झाला पराभव

**नवी दिल्ली, दि.८- दिल्ली विधानसभा निवडणुकांचे जे निकाल समोर आले असून ते पूर्णपणे अनपेक्षित असे आहेत. भाजपने यंदा मोठी मुसंडी मारत दणदणीत विजय संपादन केला आहे. शिवाय अनेक दिग्गजांनाही धक्का दिला आहे. ज्या आम आदमी पक्षाने नव्या प्रकारचे राजकारण सुरू केले होते आणि ज्यात दिल्ली बदलण्याची क्षमता असल्याचे बोलले जात होते, तोच पक्षाला त्यांच्या गडातून उखडला गेला आहे.**



नवी दिल्लीच्या जागेवरून अरविंद केजरीवाल स्वतः पराभूत झाले आहेत. तर मनीष सिसोदिया, सत्येंद्र जैन हे देखील पराभूत झाले आहेत. आता हे सर्व घडले याचा अर्थ भाजपने नक्कीच मोठी खेळी खेळत मतदारांचा विश्वास जिंकला आहे. परिणामी जनतेनेही भरघोस मतदान त्यांच्या बाजूने केल्याचे दिसून आले आहे. भाजपच्या या मोठ्या विजयामागे अनेक कारणे आहेत, पण एक निर्णय असा आहे की जो गेम चेंजर मानला जात आहे. हा निर्णयही दिल्लीतील मतदानाच्या अवघ्या शंभर तास आधी घेण्यात आला होता. एकीकडे दिल्लीत निवडणुका होत होत्या, तर दुसरीकडे अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांनी देशाचा सर्वसाधारण अर्थसंकल्प सादर केला होता. २०१४ नंतर सर्वात मोठी घोषणा यावेळी या अर्थसंकल्पात करण्यात आल्या. त्यातील १२ लाखांपर्यंतच्या उत्पन्नावर कोणताही कर जाहीर केलेला नाही. आता या निर्णयाने सगळी समीकरणेच बदलून गेली आहेत, एक्झिट पोलनेही हे दाखवून दिले आहे, असा विश्वास सर्व तज्ज्ञांनी व्यक्त केला आहे.

**मध्यमवर्गाची मते भाजपला मिळवण्यात यश**

किंबहुना दिल्लीत मध्यमवर्गीय मतदारांनी भाजपच्या बाजूने लाट निर्माण केली. ज्या मध्यमवर्गाला कोणत्याही पक्षाकडून काहीच मिळत नव्हते, तिथे आम आदमी पक्षापासून ते काँग्रेसपर्यंत ते केवळ मागासलेल्या समाज, मुस्लिम आणि इतर जातींवर विजय मिळवण्याचा प्रयत्न करत होते, हा मध्यमवर्ग **(पान ८ वर)**

## खून करुन एकास दरीत फेकले


नंदुरबार, दि.८ (प्रतिनिधी)- खून करुन एकास खोल दरीत फेकल्याची घटना धडगाव तालुक्यात घडली. या प्रकरणी उशिराने म्हसावद पोलिसांत गुन्हा दाखल करण्यात आला असून आरोपीचा शोध घेण्यात येत आहे. खुन कशामुळे करण्यात आला असावा, याबाबतचे गुढ कायम असून पोलिस या घटनेमागील कारणांचा शोध घेत आहेत.धडगाव तालुक्यातील वेलखेडी गावाचे पलाडीपाडयाचा पाटीलपाडा ते मालपाडा गावा दरम्यान एका खोल दरीत ४३ वर्षीय बालगर रुपसिंग पावरा यांचा खुन करुन फेकून देण्यात आल्याची घटना २० ते २२ जानेवारी दरम्यान घडली होती. याप्रकरणी म्हसावद पोलिसांत गुन्हा दाखल करण्यात आला आहे. हवालदार चंदु उखडू साबळे यांनी पोलिसांत फिर्याद देण्यात आली.

## काही महिन्यांपूर्वी बनवलेल्या काँक्रीट रस्त्यांची दुर्दशा
## मा.आ.गोटेंसह उबाठाच्या पदाधिकाऱ्यांनी केली पाहणी

**धुळे, दि.८- शहरात काहि महिन्यांपूर्वी बनवण्यात आलेल्या काँक्रीट रस्त्यांची प्रचंड दुरवस्था झाली आहे. काँक्रिट रस्ता बनवितांना काम ाचा दर्जा पाहण्यात आलेला नाही. निकृष्ट दर्जाच्या रस्ता कामाची पाहणी मा.आ.अनिल गोटे समवेत शिवसेना उबाठाच्या पदाधिकाऱ्यांनी केली.**



शहरातील प्रभाग क्रमांक १५ फाशीफुल ते धान्य गोडाऊन धान्य गोडाऊन ते साक्र साक्री रोड बायपास, येथील धान्य गोदामा समोरील खराब झालेला काँक्रीट रस्ता, वैभव नगर पोलीस क्लबसमोरील रस्ता, उत्कर्ष कॉलनी भीम नगर कडे जाणारा रस्ता, जलगंगा हाऊसिंग सोसायटी, सत्यसाईबाबा सोसायटी, महात्मा नगर, सिंहस्थ नगर, प्रभाग क्रमांक ११ मधील अरिहंत मंगल कार्यालयाच्या पाठीमागील रस्ता, विश्वकर्मा नगर, इच्छामणी गणपती मंदिर व तिरंगा चौक या ठिकाणच्या काँक्रीट रस्त्यांची पाहणी करतांना माजी आ.अनिल गोटे यांच्यासम वेत शिवसेना जिल्हाप्रमुख अतुल सोनवणे, माजी विरोधी पक्ष नेता नरेंद्र परदेशी, महानगर प्रमुख धीरज पाटील, प्रशांत भदाणे, ललित माळी, विजय वाघ उपस्थित होते. रस्त्यांच्या संदर्भात पुनश्च एकदा **(पान ८ वर)**



## प्रकाशा, डामरखेडा येथील पुलाचे काम लवकर पूर्ण करण्याचे निर्देश

**शहादा, दि.८ (का.प्र.)- तालुक्यातील डामरखेडा व प्रकाशा येथील जुन्या पुलांचे नूतनीकरण व नवीन पुलाचे काम १ मे २०२५ पूर्वी पूर्ण करण्याचे निर्देश जिल्हाधिकारी डॉ.मित्ताली सेठी यांनी दिले आहेत.**

नंदुरबार या जिल्ह्याचे मुख्यालय असलेल्या ठिकाणाशी जोडल्या जाणाऱ्या प्रकाशा व डामरखेडा येथील तापी आणि गोमाई नदीवरील नवीन व जुन्या पुलांचे काम गेल्या अनेक दिवसांपासून सुरू आहे. काम प्रगतीपथावर असल्याचे प्रशासनाकडून सांगितले जात असले तरी ते लवकर पूर्ण होत नसल्याने दळणवळणाची समस्या निर्माण झाली आहे. प्रवासी जनतेची होणारी गैरसोय लक्षात घेता जिल्हाधिकारी डॉ.मित्ताली सेठी यांच्या उपस्थितीत शहादा तहसिलदार **(पान ८ वर)**

## पत्रकाराच्या घरातून दागिने लांबविले

नंदुरबार, दि.८ (प्रतिनिधी)- शहरातील मधूबन कॉलनीत पत्रकाराच्या घराच्या दरवाजा उघडून चोरट्यांनी चांदीचे दागिने तसेच रोकड लंपास केली.या प्रकरणी अज्ञात चोरट्याविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.चोरीच्या प्रमाणात वाढ झाल्याने चिंता व्यक्त होत असून पोलिसांच्या कार्यपध्दतीवर प्रश्नचिन्ह उपस्थित होत आहे. अविनाश भामरे हे घरी नसतांना त्यांच्या घरात अज्ञात चोरट्यांनी प्रवेश करीत पाच भार वजनाचे चांदीचे भार, साडे चार भार वजनाचे चांदीचे पैंजण तसेच अकरा हजाराची रोकड चोरट्यांनी लंपास केली.

दिपक ज्वेलर्स
सोने- 22 K -78,100 रु.+3% GST
सोने- 24 K -85,300 रु.+3% GST
चांदी- 99,500 रु.+3% GST
तारगल्ली, सराफ बाजार, धुळे
फोन नं.२३३१०३/२३४१०३

## राज्य शासनाकडून गणेशोत्सव स्पर्धेत सार्व.गणेश मंडळांच्या भावनांशी खेळ

### लाखोंच्या बक्षिसांची कार्यकर्त्यांना प्रतिक्षा

**धुळे, दि.३०- महाराष्ट्र शासनाने गणेशोत्सवात उत्कृष्ट गणेशमुर्ती, प्रबोधनात्मक देखावा सादर करणाऱ्या मंडळांना लाखोंची बक्षिसे जाहीर केली होती. जिल्हास्तरावर निवड झाल्यानंतर राज्यस्तरावर गणेश मंडळाची निवड परिक्षक करणार होते. धुळ्यातूनही एकुण ३१ मंडळांनी सहभाग घेतला. परिक्षकांनी निष्पक्ष पध्दतीने मंडळांचे परिक्षण केले. परंतु लाखो रूपयांचा बक्षिस वितरण सोहळा गुंडाळण्यात तत्कालिन राज्य शासनाचे नेतृत्व करणाऱ्या शिंदे सरकारला यश आले आहे. स्पर्धेत सहभागी झालेल्या गणेश मंडळांना आजही बक्षिस वितरणाची प्रतिक्षा लागुन आहे. ही बक्षिसाची रक्कम अन्य कुठे वापरली तर गेली नाही ना? अशी शंका सर्वत्र चर्चेत आहे.**

निवडणुकांमधून जनतेला दिली जाणारी आश्वासने पूर्ण केलीच पाहिजेत, अशा कोणत्याही नियमावलीशी उमेदवार बांधील नसतो. याची प्रचिती धुळ्यात राज्य शासनाने गणेशोत्सवानिमित्त घेण्यात आलेल्या आरास स्पर्धेतून जनतेला आली आहे. धुळ्यातही तब्बल एकतीस लहान मोठ्या मंडळांनी शासनातर्फे आयोजीत गणेश आरास स्पर्धेत सहभाग नोंदवला. स्पर्धेच्या उद्देशाने मंडळांनीही जय्यत तयारी केली. रात्री उशीरा पर्यंत परिक्षकांनी परिक्षण केले. परिक्षकांनी पारदर्शक निकाल शिवसेना शिंदे गटाच्या पदाधिकाऱ्यांकडे सुपूर्द केला. नवरात्र उलटली **(पान ८ वर)**

## ॲथलेटीक्स स्पर्धेसाठी निवड चाचणीचे आयोजन

**धुळे, दि.८- जिल्हा क्रीडा संकुलात दि.११ व १२ फेब्रुवारी रोजी धुळे जिल्हा ॲथलेटीक्स असोसिएशनच्यावतीने सकाळी साडेसात वाजता महाराष्ट्र राज्य सब ज्युनिअर ॲथलेटिक्स अजिक्यपद स्पर्धा २०२५-२६ करीता निवड चाचणीचे आयोजन करण्यात आले आहे.**

निवड झालेले विद्यार्थी राज्यस्तरीय स्पर्धेसाठी सोलापूर जिल्ह्यातील पंढरपुर येथे दि.२२ व २३ फेब्रुवारी रोजी प्रतिनिधीत्व करणार आहेत. सोळा वर्षाआतील खेळाडुंसाठी सहाशे मीटर धावणे, साठ मीटर धावणे, लांब उडी, गोळा फेक,४*१०० रिले, चौदा वर्ष, बारा, दहा आणि आठ वर्षांआतील खेळाडुंसाठी स्पर्धा होणार आहे. खेळाडुंना पन्नास रूपये फी राहणार आहे. यशस्वी खेळाडूंना मेडल व प्रशस्तीपत्र देण्यात येणार आहे. खेळाडुंनी सहभागी व्हावे **(पान ८ वर)**

## शिवसेना उबाठाने उपशिक्षिकेसंदर्भात दिलेले निवेदन दिशाभूल करणारे : भामरे

**धुळे, दि. ८- शहरातील वलवाडी येथील कै.एस.आर. पाटील माध्यमिक उच्च माध्यमिक विद्यालय येथे कार्यरत असणाऱ्या उपशिक्षिकाबाबत शिवसेना उबाठा धुळे जिल्ह्याच्या पदाधिकाऱ्यांची दिशाभुल करून चंद्रकांत हजारे यांनी शिक्षणाधिकाऱ्यांना निवेदन दिले. याबाबत खुलासा संस्थेचे अध्यक्ष साहेबराव भामरे यांनी केला आहे.**

पब्लिक एज्युकेशन सोसायटी, देवपुर धुळेचे अध्यक्ष साहेबराव भामरे यांनी केलेल्या खुलाशात नमुद केले आहे की, संबंधित शिक्षिकेची बी.ए.बी.एड. या पदावर २०१२ पासून नियुक्ती झालेली असून त्यांचे नियमित वेतन मिळण्याकामी त्यांनी मे.उच्च न्यायालयाच्या औरंगाबाद खंडपीठात ४९८/२०१८ त्याचप्रमाणे अवमान याचीका ३३८/२०१८ याच पध्दतीने १८५५/२०२० तसेच त्यांनी दाखल केलेली ५९५/२०१२ ही अवमान याचिकेच्या झालेल्या निर्णयाच्या अनुषंगाने बी.ए.डी. एड. या वेतनश्रेणीमध्ये वेतन घेत आहे. त्या आज सुध्दा बी.ए.डी. एड याच वेतनश्रेणीचे वेतन घेत आहे. त्यामुळे बनावट बी.एड. ची पदवी घेवून सदर शिक्षिका शासनाची फसवणुक करत आहे. असे हजारे यांनी खोटे सांगितले आहे. तक्रारदार हा शिवसेना उबाठाचे पदाधिकारी तसेच शिक्षणाधिकारी, शासनाची दिशाभुल करून खोटी माहिती पुरवून निवेदन देत आहे.

यापुर्वीही चंद्रकांत हजारे यांनी शिक्षणाधिकारी यांच्याकडे वेगवेगळ्या स्वरूपात तक्रारी केल्याने संबंधित **(पान ८ वर)**

Shri Vile Parle Kelavani Mandal's
SVKM SCHOOL, DHULE
CBSE Affiliation No. 1130842
SVKM School Dhule

"EXPERIENTIAL LEARNING AT SVKM SCHOOL, DHULE"

ADMISSIONS OPEN FOR 2025-26



Pre Primary | Grades I to IX | Grade XI Science & Commerce

WHY CHOOSE SVKM?
• Balanced education with CBSE comprehensive curriculum
• Academic Excellence
• Equipping students with skills for a globalized world
• Innovative Robotics and AI lab
• Safe and secure environment
• Sports and recreational facilities
• Indoor sports arena an upcoming project
• Cricket ground ready to play
• Reliable transport facility with GPS tracking

Accredited by Quality Council of India's NABET

Ranked 6th in India & 4th in Maharashtra by Education World 2024-25

SCHOOL HIGHLIGHTS
• 100% X result with 94.8%
• 100% XII result with 97.6%
• JEE Topper 99.41 percentile
• NEET Topper 99.99 percentile
• MHT CET Topper PCB 100 percentile
• MHT CET Topper PCM 99.71 percentile
• Math Olympiad International Rank 90

Shri Vile Parle Kelavani Mandal's
SVKM School
Beside Gurudwara, Mumbai-Agra Road, Dhule - 424001
dhulesvkmschool@gmail.com www.svkmschool.net

For further details, please contact the school office.
02562-297803 | 9209890476

# लोणखेडी ते बळसाणे रस्त्याने खड्ड्यांचा प्रवास विमलनाथाच्या दर्शनाला भाविकांना होतोय अडथळा

**पिंपळनेर, दि.८ (प्रतिनिधी)- साक्री तालुक्यातील लोणखेडी ते बळसाणे रस्त्यावर खड्यांचे साम्राज्य वाढले आहे. या रस्त्याच्या दुरवस्थेने ग्रामस्थ खडतर प्रवास करताय अन् विमलनाथाच्या दर्शनाला खड्यांचे अडथळे ठरत आहे. तर वाहनचालकांचे कंबरडे मोडले जात आहे.**

मुंबई, नाशिक व ठाणे, बोरिवली, कल्याण, कोल्हापूर, सातारा, इगतपुरी, घोटी, पनवेल आदी ठिकाण्याहून भाविक धुळे मार्गाने कमी अंतरावरून बळसाणे तीर्थ गाठतात. या रस्त्याचे अंतर साधारणतः१३ ते १४ किलोमीटर असून रस्त्याची अंत्यत वाईट अवस्था झाली आहे. खड्ड्यात रस्ता की रस्त्यात खड्डा असा प्रश्न वाहनचालाकंना पडत आहे. या रस्त्यावरून जाताना अक्षरशा नागरिकांचे कंबरडे मोडले जात आहे. ऐवढी दुरवस्था या रस्त्याची झाली आहे. तर बळसाणे येथील तीर्थक्षेत्रावर येणाऱ्या भाविकांनीही हा खडतर प्रवास करावा लागत असल्याने संबंधित यंत्रणेला सदबुद्धी देवो, अशी प्रार्थना ते या तिर्थक्षेत्राचे दर्शन घेतल्यानंतर भक्तगण निश्चितच करीत असतील असा अंदाज भाकीत होत असेल. गेल्या अनेक वर्षांपासून लोणखेडी ते बळसाणे रस्त्याची दुरावस्था झाली आहे दरम्यान धुळे येथून बळसाणे जाण्यासाठी कढरे मार्गाने अंतर कमी असल्याने भाविक व वाहन चालक या रस्त्याला पसंती दर्शवीत आहे. रस्ता पुर्णपणे डांबरीकरण झाल्यास प्रवाशी व पर्यटक सहज पणे बळसाणे तीर्थक्षेत्र गाठतील असा अंदाज वर्तविला जात आहे पण लोणखेडी ते बळसाणे गावा



पर्यंत रस्ता डांबरीकरण झाला की बळसाणेसह परिसरातील अनेक शासकीय, शालेय, रुग्णालय काम कमी वेळात होतील व खर्चाची बचत होईल आणि महामंडळाची बसेस देखील या मार्गावरून ये जा करतील सहज महामंडळाच्या तिजोरीत वाढ होईल. लोणखेडी ते बळसाणे हा रस्ता १३ किलोमीटरच्या अंतराचा रस्ता पूर्णपणे खराब झाला आहे. अक्षरशः डांबर उखडून खड्ड्यात रस्ता की रस्त्यात खड्डे असं भयावह दृश्य बघावयास मिळत आहे. या रस्त्यावरून मार्ग काढताना वाहनचालाकांना मोठी कसरत करावी लागते, कोणता खड्डा टाळू असा प्रश्न या वाहनाचालकांना पडतो. त्यामुळे खड्डा चुकवताना समोरून येणाऱ्या वाहनावर काही वाहने ही धडक देतात. त्यामुळे किरकोळ अपघात होऊन वाहनचालाकंमध्येच वाद निर्माण होताना दिसून येत आहे. तरीही या समस्येकडे संबंधित यंत्रणा ढुंकूणही पाहण्यास तयार नाही. विशेष म्हणजे बळसाणे येथे जैन धर्मियांचे मोठे तिर्थक्षेत्र आहे. त्यामुळे या तिर्थक्षेत्राचे दर्शन घेण्यासाठी रोज शेकडो भाविक आणि नागरिक या रस्त्यावरून ये-जा करीत असतात.त्यामुळे नेहमी वर्दळीचा रस्ता असल्याने नागरिकांना नाहक निर्ढावलेल्या यंत्रणेच्या कामचुकारपणामुळे या रस्त्याची समस्या झेलावी लागत आहे. या रस्त्याचा कोणीही वाली नाही का, असा प्रश्न बळसाणे येथील गिरीश जैन व कढरे डॉ. साईदास चव्हाण, कैलास चव्हाण यांनी उपस्थित केला आहे. तातडीने या रस्त्याकडे संबंधित यंत्रणेने त्वरीत लक्ष देऊन समस्या सोडावी, अशी मागणी भाविक आणि ग्रामस्थांकडून होत आहे.

# शहाद्यातील सर सैय्यद ऊर्दू गर्ल्स हायस्कूल अँड ज्युनिअर कॉलेज येथे विद्यार्थ्यांना दिला निरोप

**शहादा, दि.८ (प्रतिनिधी)- येथील सर सैय्यद ऊर्दू गर्ल्स हायस्कूल अँड ज्युनिअर कॉलेज येथे इ.१० वी व इ.१२ वीच्या विद्यार्थिनींना निरोप देण्यासाठी समारंभाचे आयोजन करण्यात आले होते.**




या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्रा. सैय्यद लियाकत अली सर होते, तसेच संस्थेचे सचिव हाजी मंजुर हुसेन खान, सहसचिव हाजी डॉ.शाह खलील अहमद यांची उपस्थिती लाभली. या कार्यक्रमात विद्यार्थिनींना शाळेतील त्यांच्या आठवणींना उजाळा देत पुढील शैक्षणिक आणि व्यावसायिक वाटचालीसाठी मार्गदर्शन करण्यात आले. संस्थाध्यक्ष प्रा.लियाकत अली सैय्यद यांनी विद्यार्थिनींना कठोर परिश्रम, प्रामाणिकपणा आणि आत्मविश्वासाच्या जोरावर उज्ज्वल भविष्यासाठी तयार राहण्याचे संदेश दिला. महाविद्यालयाचे प्राचार्य सैय्यद इफ्तेखार अली यांनी विद्यार्थिनींना निरोप देताना सांगितले की, शिक्षण ही केवळ परीक्षांपुरती मर्यादित गोष्ट नसून जीवनभर चालणारी प्रक्रिया आहे. तुम्ही जिथे जाल, तिथे ज्ञानाचा प्रकाश पसरवा आणि आपल्या संस्कारांनी समाजाचे नाव उज्ज्वल करा.

यावेळी विद्यार्थिनींनीही आपल्या भावना व्यक्त करताना शाळेतील आठवणी, शिक्षकांचा प्रेमळ व कठोर शिस्तीचा संगम, तसेच सहविद्यार्थिनींसोबतचे गोड क्षण उलगडले. त्यांनी शिक्षक व शाळेच्या संपूर्ण व्यवस्थापनाला मार्गदर्शनाबद्दल मनःपूर्वक आभार मानले. कार्यक्रमात विद्यार्थिनींना भविष्यातील शैक्षणिक व व्यावसायिक संधींसाठी काही महत्त्वाच्या सूचना देण्यात आल्या. तसेच त्यांना जीवनात कोणत्याही अडचणी आल्या तरी आत्मविश्वासाने त्यांचा सामना करण्याचे धडे दिले. समारंभाच्या शेवटी विद्यार्थिनींना शुभेच्छा देत स्मृतिचिन्ह आणि शुभेच्छा पत्रे देण्यात आली. या कार्यक्रमाचे सूत्रसंचलन इरफान खान सर, अन्सारी अ.रऊफ सर यांनी केले. आभार प्राथमिकचे मुख्याध्यापक वकार शेख यांनी मानले. कार्यक्रम यशस्वितेसाठी संपूर्ण स्टाफने परिश्रम घेतले.

# भोंगरा ते मंदाणा रस्त्यावर एक लाख १४ हजाराचा गांजा जप्त; एकास अटक

**शहादा, दि.७ (प्रतिनिधी)- तालुक्यातील भोंगरा ते मंदाणा रस्त्यावर गांजाची चोरटी वाहतूक करणाऱ्या व्यक्तीस शहादा पोलीस व स्थानिक गुन्हा शाखेच्या पथकाने केलेल्या संयुक्त कारवाईत ताब्यात घेतले त्याच्याकडून ११ किलो गांजा व मोटरसायकल असा सुमारे एक लाख ४४ हजार रुपये किमतीचा ऐवज जप्त करण्यात आला असून प्रकरणी ईश्वर हिरसिंग पावरा यास अटक करण्यात आली आहे.**

याबाबत पोलीस सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार मंदाणा परिसरातून गांजाची चोरटी वाहतूक होत असल्याची माहिती मिळाली होती. त्यानुसार शहादा पोलीस व स्थानिक गुन्हा अन्वेषण शाखेच्या पथकाने भोंगरा ते मंदाणा रस्त्यावर पाण्याच्या टाकीजवळ सापळा लावला. त्यावेळी ईश्वर हीरसिंग पावरा (वय २४ रा. फत्तेपूर/कणगाई ता.शिरपूर) हा त्याच्या ताब्यातील शाईन कंपनीची मोटर सायकलने क्रमांक एमएच १८ बीयु.२३४२ गांजा घेऊन जात असताना मिळून आला. त्याच्याकडून ११ किलो ४२९ ग्रॅम वजनाचा १ लाख १४ हजार २९० रुपये किमतीचा गांजा व ३० हजार रुपये किमतीची मोटर सायकल असा सुमारे एक लाख ४४ हजार रुपये किमतीचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. ही कारवाई काल दि.६ रोजी रात्री सात वाजेच्या सुमारास करण्यात आली. गांजा वाहतूक करणारा आरोपी ईश्वर पावरा यास अटक करण्यात आली असून त्याच्या विरोधात गुंगीकारक औषधे द्रव्य व मनोव्यापारावर परिणाम करणारे पदार्थ अधिनियम अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. तपास पोलीस उपनिरीक्षक अभिजीत अहिरे करीत आहेत.




# शहादा तालुका खरेदी विक्री संघात शासकीय हमीभावाने तूर खरेदीसाठी नोंदणी प्रक्रिया सुरु

**शहादा, दि.८ (का.प्र.)- तालुक्यातील शेतक-यांसाठी नाफेडच्यावतीने खरीप २०२४-२५ हंगामातील शासकीय हमी भावाने तूर खरेदीसाठी शेतकरी नोंदणी प्रक्रिया सुरु झाली आहे.नोंदणी येत्या दि. २२ फेब्रुवारी २०२५ पर्यंत सुरु राहणार आहे.**

जिल्हा उपनिबंधक सहकारी संस्था नंदुरबार,सहाय्यक निबंधक सहकारी संस्था शहादा व खरेदी विक्री संघ शहादा यांच्या संयुक्त विद्यमाने दि.७ फेब्रुवारी रोजी शहादा तालुका सहकारी खरेदी विक्री संघ लिमिटेड शहादा येथे आयोजित करण्यात आलेल्या कार्यक्रमात शासकीय हमी भावाने तूर खरेदी नोंदणी प्रक्रियेस प्रारंभ करण्यात आला.आंतरराष्ट्रीय सहकार वर्ष सन २०२५ निमित्ताने शासकीय हमी भाव याजेनेची माहिती देतांना श्रीमती भारती ठाकुर (जिल्हा उपनिबंधक सहकारी संस्था नंदुरबार) यांनी शेतकरी बंधुंनी या योजनेचा अधिकाधिक लाभ घ्यावा असे आवाहन केले. प्रति क्विंटल ७५५०/- रुपये हमी भाव असुन यासाठी ऑनलाईन पिकपेरा असलेला सातबारा उतारा, आधारकार्ड झेरॉक्स, बँक पासबुक झेरॉक्स, मोबाईल नंबर इत्यादी नोंदणी करीता आवश्यक असल्याची माहिती यावेळी देण्यात आली. याप्रसंगी गिरीष महाले (सहाय्यक निबंधक सहकारी संस्था शहादा), घनशाम बागल(सहकार अधिकारी सहकारी संस्था शहादा), खरेदी विक्री संघाचे संचालक विनोद चौधरी, माजी संचालक सखाराम तात्या पाटील,रमाकांत खंडु चौधरी, शेतकरी बंधू,संघाचे मॅनेजर अनिल पाटील व कर्मचारी उपस्थित होते. तालुक्यातील जास्तीत जास्त शेतकरी बांधवांनी शासकीय हमी भावाने तूर खरेदी नोंदणी प्रक्रियेत सहभागी व्हावे,असे आवाहन शहादा तालुका खरेदी विक्री संघाचे चेअरमन प्रा.मकरंद पाटील,व्हाईस चेअरमन अरविंद पाटील व संचालक मंडळाने केले आहे.

# आर.एम.सिसोदे महाविद्यालयात बारावीच्या विद्यार्थ्यांना निरोप

**धुळे, दि.८- परीक्षेत यश प्राप्त करण्यासाठी विद्यार्थ्यांनी नियमितपणे शाळेत यावे, आपल्या शिक्षकांकडून समस्या समजून घ्याव्यात, भरपूर सराव व सातत्यपूर्ण अभ्यास करावा आणि कोणत्याही तणावाशिवाय परीक्षेला सामोरे जावे असे प्रतिपादन प्राचार्य डॉ.पी.एस. गिरासे यांनी आर.एम. सिसोदे महाविद्यालयात केले.**



ग्रामीण विकास शिक्षण प्रसारक मंडळ, नरडणा संचलित श्रीमती आर. एम. सिसोदे कला कनिष्ठ महाविद्यालयात आयोजित इयत्ता बारावीच्या विद्यार्थ्यांच्या निरोप समारंभ प्रसंगी मार्गदर्शन करतांना प्राचार्य गिरासे बोलत होते. कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान संस्थेचे अध्यक्ष संजय सिसोदे यांनी भूषविले. याप्रसंगी संस्थेचे उपाध्यक्ष सिद्धार्थ शिसोदे, उपप्राचार्य प्रा.एन के पाटील, प्राध्यापक व विद्यार्थी उपस्थित होते. प्रा.एस.बी. महाजन, मिल्लू पावरा, उदय पाटील, राज साबे, दुर्गेश पवार, पिंकी पावरा, दिशा सोनवणे, आरती भिल, तेजस्विनी पाटील, खुशी जाधव यांनी मनोगत व्यक्त केले. प्रास्ताविक उपप्राचार्य प्रा.एस.टी. भामरे यांनी केले. सूत्रसंचलन प्रा. पी.जी.पाटील यांनी तर आभार प्रा.श्रीमती के.एस. कढरे यांनी व्यक्त केले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी प्रा.गिरीश पवार, संजय बोरसे, शशिकांत भामरे, इरफान पिंजारी, जयेश कोळी, स्वप्निल भील, विठोबा पाटील, दुर्गेश पवार, दिव्या मोरे, वैष्णवी कोळी, नयना अहिरे, कुणाल पाटील, प्रणव बोरसे, विशाल पावरा यांनी परिश्रम घेतले.

# भावेश सोनवणेची गणित प्रज्ञा परीक्षेसाठी निवड

दोंडाईचा, दि.८- हस्ती चॅरिटेबल ट्रस्ट संचलित हस्ती गुरुकुल,दाऊळ शिवार कॅम्पस दोंडाईचा येथील विद्यार्थी भावेश सोनवणे - इ.५ वी. याने महाराष्ट्र राज्य गणित अध्यापक महामंडळ व नंदुरबार जिल्हा गणित अध्यापक मंडळ यांचे तर्फे आयोजित करण्यात आलेल्या गणित प्राविण्य परीक्षेत यश संपादन केले. सदरची परीक्षा माहे जानेवारी २०२५ मध्ये डी. आर. हायस्कूल, नंदुरबार येथे संपन्न झाली होती.



भावेश दिपाली तुकाराम सोनवणे याने गणित संबोध परीक्षेत यश प्राप्त करून, गणित प्राविण्य परीक्षेत विशेष यश संपादन केले. याकरिता त्याची आगामी एप्रिल रोजी संपन्न होणाऱ्या राज्यस्तरीय गणित प्रज्ञा परीक्षेसाठी कौतुकास्पद निवड करण्यात आली. भावेशला गणित विषय शिक्षक प्रविण माळी यांचे मार्गदर्शन लाभले. वरील विद्यार्थ्यांचे हस्ती शालेय समिती चेअरमन कैलास जैन तसेच नंदुरबार जिल्हा गणित अध्यापक मंडळ अध्यक्ष योगेशकुमार गवते व शाळेचे मुख्याध्यापक सदाशिव महाजन यांनी कौतुक व अभिनंदन केले.

# आर.सी.पटेल उच्च माध्यमिक विद्यालयाच्या तन्मय मराठेची नवी दिल्ली येथे गणतंत्र दिवसाला उपस्थिती

**शिरपूर, दि.८- येथील आर.सी.पटेल उच्च माध्यमिक विद्यालयाचा अकरावी विज्ञान शाखेच्या विद्यार्थी तन्मय अंकुश मराठे याने दिल्ली येथे ७६ व्या गणतंत्र दिवसाला विशेष अतिथी म्हणून उपस्थिती दिली.**

तन्मय मराठे याने २९ वी राष्ट्रीय बाल विज्ञान परिषद, यंग सायंटिस्ट इंडिया, ३१ वी राष्ट्रीय बाल विज्ञान परिषद, निती आयोगाची अटल मॅरेथॉन, स्पेस इंडिया, इ. अनेक राष्ट्रीय स्तराच्या स्पर्धांमध्ये विशेष प्राविण्य प्राप्त केले होते. या सर्व उत्तुंग कामगिरीचा संदर्भ घेऊन तन्मय मराठे या विद्यार्थ्याला ७६ व्या गणतंत्र दिवसानिमित्त रक्षा मंत्रालयातर्फे विशेष अतिथी म्हणून आमंत्रित करण्यात आले होते. या गणतंत्र दिवसाच्या कार्यक्रमाचे अध्यक्ष भारताचे राष्ट्रपती महामहीम द्रोपती मुर्म या होत्या. कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे इंडोनेशिया राष्ट्राचे राष्ट्रपती जोको विडोडो होते. पंतप्रधान माननीय नरेंद्र मोदी तसेच संपूर्ण केंद्रीय मंत्रिमंडळ यांची देखील उपस्थिती होती. या अविस्मरणीय क्षणाचा साक्षीदार हा विद्यार्थी होता. ही आपल्या सर्वांसाठी फार गौरवास्पद बाब आहे.

या सुवर्ण संधीबद्दल शिरपूर एज्युकेशन सोसायटीचे अध्यक्ष माजी शिक्षण मंत्री आमदार अमरिशभाई पटेल, कार्याध्यक्ष भूपेशभाई पटेल, उद्योगपती चिंतनभाईपटेल, उपाध्यक्ष राजगोपाल भंडारी, सचिव सौ. रेशा पटेल, सर्व संचालक, सीईओ डॉ. उमेश शर्मा, प्राचार्य पी. आर. साळुंखे, पर्यवेक्षक एस. एन. पाटील यांनी कौतुक केले.

# निवडणूक काळातील वाद कुऱ्हाडीने जीवघेणा हल्ला

धुळे- शहरातील वडजाईरोडवरील खाऱ्या नाल्याजवळ विधान सभा निवडणुकीच्या वेळी झालेल्या शाब्दीक वादाचा राग मनात ठेवून पाच जणांनी शिवीगाळ करत कुऱ्हाड व लोखंडी रॉडने जीवघेणा हल्ला केल्याची घटना घडली आहे. वसीम अहमद रफीक अहमद अन्सारी यांनी दि.५ फेब्रुवारी रोजी दिलेल्या फिर्यादीनुसार, विधान सभा निवडणुकीच्या कालावधीत व्हॉटस ॲपवर चॅटींगकरतांना शाब्दीक वाद झाले होते. त्याचा राग मनात ठेवून अंबिका नगरातील सत्तार मासुन पिंजारी ऊर्फ सत्तार मेंटल, सोहेल शेख, नाजीम मनियारचा भाऊ नाव माहित नाही, शाहरूख पुर्ण नाव माहित नाही, मुन्ना मन्सुरी टायरवालाचा भाऊ नाव माहित नाही हे सर्व कार क्र.एमएच १८/-५८०१ मधुन सोबत आले. वडजाई रोडवरील खाऱ्या नाला येथे नदीम मोहम्मद रफीक अन्सारी याच्या जवळ येवून शिवीगाळ करत कुऱ्हाड व लोखंडी रॉडने डोक्यावर, दोन्ही हातांवर, पायावर व चेहऱ्यावर मारून गंभीर जखमी करून पळून गेले.



# सिध्दार्थ नगर कुकडेल येथे माता रमाबाई जयंती उत्साहात

**शहादा, दि.८ (का.प्र.)- त्यागमूर्ती माता रमाबाई आंबेडकर यांची १२७ वी जयंती सिद्धार्थ नगर कुकडेल येथे महिला मंडळातर्फे उत्साहात साजरी करण्यात आली.**

भारतरत्न डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांच्या अर्धांगिनी माता रमाबाई आंबेडकर यांच्या १२७ व्या जयंतीनिमित्त सिद्धार्थ नगर कुकडेल मधील महिला मंडळाच्या वतीने माता रमाबाई आंबेडकर यांची जयंती उत्साहात साजरी करण्यात आली. सर्वप्रथम माता रमाबाई आंबेडकर व डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. महात्मा भगवान गौतम बुद्ध यांच्या पुतळ्यास वंदन करण्यात आले. उपस्थित महिला,बालिका व मुलांनी बुद्धवंदना व भीमवंदना म्हटली.शालेय विद्यार्थीनींनी माता रमाबाई यांच्या जीवन चरित्रावर आधारित माहिती दिली. यावेळी आशाबाई कुवर, सिंधुबाई कुवर, रंजना कुवर, मीना कुवर,कविता कुवर, नंदाबाई कुवर, रतक्ष कुवर,कुसुम कुवर, ज्योती अहिरे, लक्ष्मी अहिरे, वंदना बैसाणे, आरती सामुद्रे, रोहिणी जगदेव, भारती जगदेव, सुनंदा मोघे, अरुणा मोघे, सुरेखा अहिरे, प्रज्ञा सामुद्रे, बेबीबाई अहिरे, रेणूबाई कुवर आदींची उपस्थिती होती.














## शब्दकोडे क्रमांक.२०८५



**आडवे शब्द :** १.९०अंशाचा कोन ३.बारीक-सारीक कामं ५.चुरा ७.मयुर ८.खडक ९.पराक्रम ११.सेवक १२.गळा १३.अमेरीकेचे अवकाश संशोधन केंद्र १४.शत्रुचे विमान ओळखण्यासाठी वापरतात ती प्रणाली १७.घोडे जुंपलेली बग्गी १९.अवस्था २१.अविरत २२.ढिग २५.लहान २७.कंगण २८.संगीतातील एक राग २९.ताकद ३१.कपाळावर आलेली केसांची लट ३२.पहा ३३.फुकटची वटवट ३५.इंग्रजीत-रस्ता ३७.एक दुजे के लिए-सिनेमातील अभिनेत्री फक्त नाव ३९.समय ४१.शंकराचे वाद्य ४३.बायका-पोरे नसलेला ४६.दैवाची अवकृपा झालेला ४९.आईचा भाऊ ५०.वायदा ५२.फळ ५४.झाडाची फांदी ५५.फॅक्टरी ५६ लढाई **उभे शब्द :** १.कन्हैया २.नारळ फोडण्यासाठी वापरतात तो सुरा ३.भुमिका ४.दुर्ग ५.पिशाच्च ६.□ाळण ८.बांगड्यां□ा व्यवसाय करणारा ९.द□ाला अर्पिल□्या अन्ना□ा श□ १०.पंख १५.डाळ वाढण्या□□साधन १६.म□क १८.रोमां□कारी २०.एक उं□ी लैकरी वस्त्र २१. सर्व २३.प्रश्न २४.खोट□कारण २६.एक निशा□र पक्षी २८.पराभव पत्करण□३०.□िंदीत-मुलगा ३४.अंड्यातील पिवळा भाग ३६.दशरथ पुत्र ३८.तीन दशकं मिळून तयार □ोणारी संख्या ४०.सुंदर ४१.करंटा ४२.खिशात ठ□ता जोगा ल□ान कपडा ४४.□िंदीत-ड□ाळी ४५.म□राणा प्रताप यां□ा प्रांत ४७.बुद्धी ४८.डोंगर माथा ५१.□ाताच्या बोटां□ी संख्या ५२.आमीर खान,काजोल यां□ा एक सिन□ा ५३.पाय

## शब्दकोडे क्रमांक.२०८४ चे उत्तर

| | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| वे | ता | ळ | | गो | ग | ल | गा | य | | मौ | त |
| □ | स | | मो | ठा | | डा | | व | □ | न | |
| ना | | गा | ज | | स | ख | ल | | व | | ती |
| | बी | | □ा | न | व | | ल | व | | आ | |
| स | | प | □ | र | | मौ | का | | स | ज | ना |
| पा | ळ | त | | म | सा | | री | या | ज | | ज |
| ट | | न | ट | | व | क्त | | □ | ग | ड | |
| | सी | | क | पा | ट | | फु | गा | | ग | हू |
| आ | | गु | ला | ल | | नो | क | र | □ा | र | |
| स | र | ळ | | क | र | | ट | | ख | | स |
| न | वी | | घा | | सा | डू | | क | ला | का | र |
| स्थ | | वा | व | ट | ळ | | पा | ट | | म | ण |

आपला महाराष्ट्र
www.aplamaharashtra.in

# बहर



‘आता मी माझीच गोष्ट सांगतो. मी आधी बगळा होतो. सतत तक्रारी करत बसायचो. पण मग मी माझ्या मनोवृत्तीत बदल करायचे ठरवले. बगळा न होता गरुड व्हायचे ठरवले. मी आजुबाजुला निरिक्षण करायला सुरवात केली. बहुतेक टॅक्सी ड्रायव्हर गबाळे व गलीच्छ असतात, ग्राहकांची काळजी न घेणारे असतात. ग्राहक नेहमी त्यांच्याबद्दल तक्रारी करत असतात. त्यांच्या गाड्या पण खराब व अस्वच्छ असतात. मी माझ्या बाबतीत काही बदल करायचे ठरवले. थोडे थोडे बदल करत गेलो!’ वासु सांगत होता.

## बगळा व्हायचे की गरुड?




सुप्रसिद्ध साहित्यीक चेतन भगत याने सांगीतलेला हा किस्सा आहे. मी एअरपोर्टच्या बाहेर टॅक्सीसाठी रांगेत उभा होतो. तेवढ्यात माझ्यासमोर एक टॅक्सी येऊन उभी राहीली. पहिली गोष्ट माझ्या लक्षात आली की ती टॅक्सी बाहेरून नुसतीच स्वच्छ नव्हती तर चकचकीत पॉलीश केलेली होती. टॅक्सीचा ड्रायव्हर खाली उतरून व टॅक्सीला वळसा घालुन माझ्याकडे येत होता. त्यावेळी माझ्या लक्षात आले की त्याचा ड्रेस एकदम स्मार्ट आहे. त्याने स्वच्छ धुतलेला व इस्त्री केलेला पांढरा शर्ट घातला होता. तशीच इस्त्री केलेली काळी पँट होती. टाय लावलेला होता व पायात चकचकीत पॉलीश केलेले बुट होते. त्याने आदराने माझ्यासाठी टॅक्सीचे मागील दार उघडले व माझ्या हातात एक लॅमीनेट केलेले कार्ड देत म्हणाला, ‘ सर! माझे नाव वासु! मी तुमचा टॅक्सी ड्रायव्हर. मी तुमचे सामान मागे डिकीमध्ये ठेवेपर्यंत आपण हे माझे मिशन स्टेटमेन्ट कृपया वाचावे.’

‘मिशन स्टेटमेन्ट?’ मला गंमत वाटली व मी त्या कार्डावर नजर टाकली. त्यावर सुरेख व ठळक अक्षरात छापले होते. ‘ वासुचे मिशन स्टेटमेन्ट! माझ्या टॅक्सीमधील प्रवाशांना कमीत कमी खर्चात, कमीत कमी वेळात, सुरक्षीतपणे त्यांच्या इच्छीत स्थळी पोचवणे व ते सुद्धा मैत्रीपूर्ण वातावरणात!’

मला गंमत वाटली. मी टॅक्सीत बसलो व मला आश्चर्याचा धक्काच बसला. कारण टॅक्सी आतुनसुद्धा बाहेरच्यासारखी चकचकीत स्वच्छ होती.

वासुने त्याच्या ड्रायव्हरच्या सिटवर बसता बसता विचारले, ‘सर! आपण कॉफी घेणार? माझ्याकडे थर्मासमध्ये रेग्युलर तसेच ‘डिकॅफ’ कॉफी आहे!’

मी सहज गंमत करावी म्हणून म्हणालो, ‘नको! मला कॉफी नको! काहीतरी थंड पेय हवे आहे!’

‘काही हरकत नाही!’ वासु म्हणाला, ‘माझ्याकडे पुढे कुलर आहे. त्यामध्ये रेग्युलर व डायट कोक, लस्सी, पाणी व ऑरेंज ज्युस आहे.’

‘मला लस्सी चालेल!’ मी म्हणालो पण माझ्या चेहेऱ्यावरचे आश्चर्य काही लपत नव्हते.

माझ्या हातात लस्सी देताना वासु म्हणाला, ‘आपल्याला जर वाचायला काही हवे असेल तर टॅक्सीमध्ये द हिन्दु, टाईम्स ऑफ इंडिया, इकॉनॉमिक टाईम्स व इंडिया टुडे आहे.’

माझ्या हातात अजुन एक लॅमिनेटेड कार्ड देत वासु म्हणाला, ‘ही रेडियो स्टेशन्स व त्यावर असलेल्या कार्यक्रमांची यादी, जर आपल्याला रेडीयो ऐकायचा असेल तर!’

मला वासुचे कौतुक वाटु लागले होते. टाक्सी सुरु करातताना वासु म्हणाला, ‘मी एअर कंडीशनींग चालु केले आहे. टेम्परेचर योग्य आहे ना व आपल्याला कंफर्टेबल वाटते ना? का यात ऍजेस्ट करू?’

वासुने मला त्यावेळी माझ्या इच्छीत स्थळी जाण्याचा सर्वात चांगला मार्ग कोणता हे सांगीतले. तसेच वाटेत कोणकोणती प्रेक्षणीय स्थळे लागतात याची पण माहीती दिली.

‘आपणास हरकत नसेल तर आपण माझ्याशी गप्पा मारू शकता. पण आपल्याला जर एकांत हवा असेल तर मी आपल्याला डिस्टर्ब करणार नाही’ वासु म्हणाला.

‘मला एक सांग वासु!’ मला माझे आश्चर्य अजुनही लपवता येत नव्हते, ‘तु तुझ्या ग्राहकांना नेहमी अशीच सेवा देत असतोस?’

वासुच्या चेहेर्योवर हास्य पसरले. ‘नाही सर! गेल्या दोन वर्षांपासुनच मी हे सुरु केले. या आधीची पाच वर्षे मी इतर सर्वसामान्य टॅक्सी ड्रायव्हरसारखाच होतो. गबाळा, अनुत्साही, सतत कसल्या ना कसल्या तरी तक्रारी करत बसणारा! पण एक दिवशी मला ‘पॉवर ऑफ चॉइस’ बद्दल कळले!’

‘पॉवर ऑफ चॉइस म्हणजे?’ मी उत्सुकतेने विचारले

‘पॉवर ऑफ चॉइस म्हणजे तुम्ही बगळा व्हायचे का गरुड व्हायचे याचा चॉइस!’ वासु म्हणाला, ‘तुम्ही सकाळी उठलात व म्हणालात की आजचा दिवस काही चांगला जाणार नाही तर तुमची कधीच निराशा होणार नाही. तक्रारी करण्याचे थांबवा! गरूड व्हा, बगळा होऊ नका! कारण बगळा सतत ‘क्वॅक क्वॅक’ करत असतो म्हणजे तक्रारी करत बसतो. तर गरुड येणार्यी सर्व अडचणी, अडथळे, संकटे यावर मात करत आकाशात उंच भरारी घेत असतो, ढगांच्या वर जात असतो. माझ्या डोक्यात हे वाक्य पक्के बसले’ वासु म्हणाला

‘आता मी माझीच गोष्ट सांगतो. मी आधी बगळा होतो. सतत तक्रारी करत बसायचो. पण मग मी माझ्या मनोवृत्तीत बदल करायचे ठरवले. बगळा न होता गरुड व्हायचे ठरवले. मी आजुबाजुला निरिक्षण करायला सुरवात केली. बहुतेक टॅक्सी ड्रायव्हर गबाळे व गलीच्छ असतात, ग्राहकांची काळजी न घेणारे असतात. ग्राहक नेहमी त्यांच्याबद्दल तक्रारी करत असतात. त्यांच्या गाड्या पण खराब व अस्वच्छ असतात. मी माझ्या बाबतीत काही बदल करायचे ठरवले. थोडे थोडे बदल करत गेलो!’ वासु सांगत होता.

‘मग याचा तुला चांगला फायदा झाला असेल नाही का?’ मी वासुला विचारले.

‘झाला तर!’ वासु उत्साहाने सांगु लागला. ‘मी गरुड व्हायचे ठरवल्यावर पहिल्या वर्षीच माझे उत्पन्न आधीच्या वर्षापेक्षा दुपटीने वाढले. या वर्षी कदाचीत माझे उत्पन्न चौपट वाढेल. माझ्या अनेक ग्राहकांनी माझा सेल फोन नंबर घेतला आहे. ते माझीच टॅक्सी हवी म्हणून फोन करत असतात. बहुतेक वेळा माझी टॅक्सी ऍडव्हान्समध्ये बुक होते.’

गरुड व्हा, बगळा होऊ नका!

वासुने वेगळा चॉइस केला. त्याने किरकिर करणारा बगळा न होता आकाशात उंच भरारी घेणारा गरूड व्हायचे ठरवले. त्याचे फळ त्याला मिळाले.

बगळा व्हायचे का गरुड व्हायचे हा चॉइस देवाने प्रत्येकालाच दिलेला आहे, अगदी जन्मापासून ते मरेपर्यंत!

आता आपण बगळा व्हायचे का गरुड व्हायचे हे ज्याचे त्याने ठरवायचे..

****

---

मयुरेश उमाकांत डंके

## कटू वास्तव

एकदा सोलापूरहून पुण्याला येत असताना एका प्रसिद्ध हॉटेल मध्ये आम्ही ब्रेक घेतला. शेजारच्या टेबलावर सात आठ जण बसले होते. आठ जणांनी आठ वेगवेगळ्या भाज्या मागवल्या. इतके स्टार्टर्स, इतक्या डिशेस.. टेबल अख्खं भरलं होतं. पण खाल्लं किती? जितकं मागवलं होतं त्यातलं निम्मंसुद्धा नाही..! बिल भरुन माणसं निघूनही गेली.

२५ जानेवरीची संध्याकाळ. आधीच शनिवार-रविवार आणि त्यात पुन्हा राष्ट्रीय सुट्टी आलेली. आजूबाजूची सगळी शोरुम्स आणि मॉल्स गर्दीनं खचाखच भरुन वाहत होते. कुणाला तरी भेटायला गेलो होतो आणि तिथं आम्हाला बराच वेळ लागला, म्हणून जवळच्या एका मॉलमध्ये आम्ही पोट भरण्यासाठी गेलो. पण तिथल्या कॅफेटेरियाचे दर बघून आमचे डोळेच पांढरे व्हायची वेळ आली. पंधरा-वीस स्टॉल्स होते खरे. पण किंमती अवाढव्य होत्या. ८० रुपयांची पाणीपुरी, २०० रुपयांचं सँडविच, १८० रुपयांपासून पुढे सुरु होणारी चाट हे खिशापेक्षा मनालाच परवडत नव्हतं.

मी त्यांना म्हटलं, जाऊ द्या.आपण टपरीवर चहा घेऊ.

ते म्हणाले, जीबीएस कसा भडकला आहे,बघतोयस ना. उघड्यावरचं काही नको रे बाबा. आम्हीं पंधरा वीस मिनिटं तिथं होतो आणि शेवटी काहीही न खाता पिता तिथून निघालो. पण मी पाहतो,मला फार वाईट वाटतं. पाचशे-सातशे रुपये किंमतीची कॉफी अर्धवट टाकून लोक निघून जातात. पाचशे रुपयांतले तीनशे



त्या मॉल मध्ये जे दृश्य होतं,ते बघून मला धक्का बसला.

तरुण मुलामुलींची तर गर्दी होतीच,शिवाय शेकड्यांनी परिवारसुध्दा होते. तिथं पाणीसुद्धा विकत घेऊन प्यावं लागत होतं. चार-पाच जणांचं बिल एक हजाराच्या वर सहजच जात असेल. कितीतरी लहान लहान मुलं त्या कॅफेटेरिया मध्ये जंक फूड मनसोक्त खात होती. कॉलेजवयीन मुलामुलींच्या जोड्या होत्या. ५०० रुपयाचं सिझलर घेऊन टेबलावर गप्पा मारत बसलेलं एक युगुल दहा मिनिटांनी ती डिश तिथंच तशीच टाकून उठून निघून गेलं. कितीतरी लोक खाणं अर्धवट टाकून उठून निघून जात होते. छोले भटुरे मागवलेल्या एका ग्रुपनं तर निम्मे भटुरे तसेच टाकले. विकत घेतलेल्या पाण्याच्या बाटल्या सुद्धा अर्धवट टाकून निघून गेलेले लोक मी बघत होतो.

बरं,असला टाकून माजण्याचा मस्तवालपणा करणारी जी जनता होती, ती काही मर्सिडीज क्लास नव्हती. सगळेच्या सगळे मध्यमवर्गीयच होते. पेट्रोल २५ पैशांनी महागले अन् जनतेचे कंबरडे मोडले किंवा कोथिंबीर कडाडली,लोकांनी खायचं काय? असले मथळे लिहिणाऱ्यांनी मॉलमधले हे मध्यमवर्गीय बघितलेले असतात का? असा प्रश्न मला पडला.

मेसचे डबे लावून जेवणाऱ्या मुलांचं आणि मुलींचं मी अनेकदा निरीक्षण केलंय. आठवड्यातून तीनदा तरी डब्यातलं अन्न जसंच्या तसं कचऱ्यात गेलेलं असतं. घराघरांतून गोळा केला जाणारा ओला कचरा तुम्ही अवश्य पहा. चांगल्या प्रतीचं ब्रँडेड अन्न कचऱ्यात फेकून दिलेलं तुम्हाला दिसेल. हॉटेलमध्ये सँडविचच्या डिशमध्ये कोबी किसून डेकोरेट करुन सर्व्ह करतात. तो कच्चा कोबी कितीजण खातात? मोठमोठ्या कॉफी शॉप्स मध्ये रुपये आपण कचऱ्यात ओतले,याचं त्यांना भानही नसतं आणि त्याचं त्यांना वाईटही वाटत नाही.

एकदा सोलापूरहून पुण्याला येत असताना एका प्रसिद्ध हॉटेल मध्ये आम्ही ब्रेक घेतला. शेजारच्या टेबलावर सात आठ जण बसले होते. आठ जणांनी आठ वेगवेगळ्या भाज्या मागवल्या. इतके स्टार्टर्स, इतक्या डिशेस.. टेबल अख्खं भरलं होतं. पण खाल्लं किती? जितकं मागवलं होतं त्यातलं निम्मंसुद्धा नाही..! बिल भरुन माणसं निघूनही गेली.

याला आपण नेमकं काय नाव द्यावं? ’महागाई किती वाढलीय’ असं ओरडणारी अगदी साधी साधी माणसंसुद्धा वडापाव घेताना पाच सात मिरच्या घेतात आणि त्यातली एखादीच खाऊन बाकीच्या चक्क कचऱ्यात टाकतात..! पराक्रम दाखवण्याच्या नादात एकस्ट्रा तिखट मिसळ मागवतात आणि चार घासातच त्यांचा धीर गळून पडतो. अन्न वाया..! सँडविचची हिरवी चटणी जास्तीची घेतात आणि टाकून देतात..! एखाद्या सँडविचवाल्याची किलोभर हिरवी चटणी दररोज सहजच उकिरड्यावर जात असेल..

गुरुवारी - शनिवारी देवळाबाहेर हात पसरुन बसलेली माणसं सुद्धा आता रुपया-दोन रुपयांचं नाणं, पार्ले बिस्कीट पुडा, एखादा वडापाव असलं काही दिलं तरी तोंड वेंगाडतात. त्यांना दहा रुपयांचं नाणं हवं असतं. ताजी पोळी-भाजी दिली तरी टाकून देणारे सुद्धा भिकारी मी पाहिलेत. मग भीक मागण्यामागची त्यांची नेमकी भावना तरी काय? आपल्याला आपल्या पात्रतेनुसार किंवा पात्रतेपेक्षा कितीतरी अधिक पटींनी मिळतंय, याची जाणीव इथेही दिसत नाही.

न कमावणारे,कमी कमावणारे,भरपूर कमावणारे, आपकमाईवाले,बापकमाईवाले सगळे सगळे या एकाच बोटीत बसलेले आहेत. काहीजणांची ही वृत्तीच आहे आणि काहीजणांना आपलं काहीतरी चुकतंय याची लांबलांबपर्यंत जाणीवच नाही. आणि दुसरं कुणी ह्यांना ही जाणीव करुन द्यायला तयार नाही.

महिन्यातले पंधरा दिवस मेसचा अख्खा डबा कचऱ्यात टाकणारे विद्यार्थी आणि मुलांच्या हट्टापायी भारंभार पदार्थ मागवून त्यातलं निम्म्याहून जास्त अन्न टाकणारे सुशिक्षित पालक दोघेही समाजाचे दोषी नाहीत का ?

महागाई वाढल्याचं ढोंग करणारी माणसं त्यांची जीवनशैली जराही बदलायला तयार नाहीत. बापकमाईवर घेतलेला ब्रँडेड कपडा जास्तीत जास्त चार पाच वेळा घालून कपाटात कोंबणारे अन् पुढच्या महिन्यात पुन्हा नवे कपडे घेणारे विद्यार्थी त्यांच्या आयुष्याचा नेमका कसा विचार करत असतील? त्यांचे आईवडील त्यांना दर महिन्याला पैसै पाठवताना काय विचार करत असतील? कॉलेजच्या ऑफिसात फी माफीचे अर्ज करुन घेणारी मुलं मला जेव्हां त्यांच्या परमप्रिय मैत्रिणीसोबत फर्ग्युसन कॉलेज रस्त्यावरच्या हॉटेलमध्ये दीडशे रुपयांचा उत्तप्पा खाताना दिसतात, तेव्हां त्यांची गरिबी नेमकी कोणती? असा प्रश्न पडणं स्वाभाविक आहे. कारण कॉलेजची फी खोटं कारण दाखवून माफ करुन घेऊन हॉटेलात एकावेळी पाचशे रुपयांची नोट खर्च करणं हे प्रामाणिक माणसाचं लक्षण नाही.

आमच्या आजूबाजूच्या परिसरात रात्री बारा वाजता पंधरा वीस बुलेट बाइक्स मोठाला आवाज करत गेल्या आणि अर्धा तास हवेत तीन चार हजार रुपयांची फटाक्यांची आतषबाजी होत राहिली की, आपण ओळखावं - आज कुठल्यातरी बेरोजगार दिवट्याचा वाढदिवस आहे आणि चार घरी धुणीभांडी करुन घराचा गाडा ओढणाऱ्या आपल्या आईच्या कमाईवर फुकट मजा मारणारं पोरगं आज एक वर्षानं मोठं झालं आहे..! रेशनचं अन्न आणून जगणाऱ्या घरच्या पोरांचे वाढदिवस रात्री बारा वाजता भर रस्त्यावर दोन-दोन केक आणून कसे होतात? सर्वच स्तरांमध्ये माणसांच्या जगण्याच्या व्याख्या बदलतायत आणि त्या अमिबासारख्या आकार उकार बदलत चालल्या आहेत,हे स्पष्ट दिसतं. याचा विचार कुणी एकट्यानं नव्हे तर, संपूर्ण समाजव्यवस्थेनं केला पाहिजे आणि तो अत्यंत गंभीरपणे केला पाहिजे.

लोकांच्या खिशात पैसा उदंड झालाय? जास्तीचे पर्याय सहज उपलब्ध झालेत? मोकळीक अन् स्वातंत्र्य वाढलंय? की माणसाला कशाचीच किंमत राहिली नाहीय? जाणिवांचं श्राद्ध घालून कुठल्याशा पोकळ धुंदीत वागण्याची ही रित समाजातल्या सर्वच स्तरांमध्ये जाणवण्याइतपत वाढतेय,हे प्रगतीचं अन् शहाणपणाचं लक्षण मानणाऱ्यांपैकी मी तरी नाही.

खरोखरचं सुजाण पालकत्व आणि आपण सुजाण पालक होण्यासाठी करत असलेला अनाठायी खर्च या दोन गोष्टी वेगळ्या नाहीत का? संवेदनाशून्य सजीवांच्या फौजा निर्माण करुन आपण काय मिळवतो आहोत, याचा हिशोब कधीतरी कुणीतरी लावला पाहिजे की नको?

नादारीचा मुखवटा घालून आतून काजू-बदामावर ताव मारणं हे माणसांच्या खोटारडेपणाचं स्वच्छ लक्षण आहे.

---

## प्रांजळाचे आरसे

प्राचार्य डॉ.कृष्णा पोतदार
मो.९४२२८९५४६५

## भिक्षेकऱ्यांचा डॉक्टर - डॉ.अभिजीत सोनवणे



डॉ.अभिजीत सोनवणे व लेखक डॉ.कृष्णा पोतदार

आमच्या लोकमान्य हास्ययोग संघ, पुणेचा ३० डिसेंबर २०२४ रोजी संस्थापक अध्यक्ष कै. प्राचार्य डॉ. सुभाष देसाई यांचा द्वितीय स्मृतिदिन होता. या निमित्ताने पुण्याच्या नवी पेठेतील निवारा या संस्थेच्या विशाल सभागृहात विद्यमान अध्यक्ष डॉ. प्रसाद आंबिकरांच्या अध्यक्षतेखाली आदरांजली वाहण्यासाठी मोठ्या संख्येने संघाचे सदस्य उपस्थित होते. प्रमुख पाहुणे म्हणून डॉ. अविनाश भोंडवे आणि डॉ. अभिजीत सोनवणे उपस्थित होते. आमच्या संघाच्या उपाध्यक्षा प्रा. विनयाताई मिराशी या कार्यक्रमाबद्दल आम्हाला सांगत होत्या की यातले डॉ. अभिजीत सोनवणे हे भिक्षेकरांचा डॉक्टर म्हणून ओळखले जातात. या कार्यक्रमात आपल्याला त्यांचं प्रत्यक्ष व्याख्यान ऐकायला मिळणार आहे तेव्हा सर्वांनी उपस्थित रहावयाचे आवाहन त्यांनी केले.

भिकाऱ्यांचा डॉक्टर हे ऐकायलाही थोडं जड जातं. खूपच कुतूहल निर्माण झालं त्यांच्याबद्दल. त्या कुतुहलाच्या धुंदीतच कार्यक्रमाला पोहोचलो. डॉ. अभिजीत बोलायला उभे राहिलेत. आपल्या आयुष्याचा पट उलगडू लागलेत. खेड्यातून आलेल्या एका मुलावर आजूबाजूची परिस्थिती काय आणि कसे परिणाम करते, त्यात वेदना आणि संवेदनांचा किती कस लागतो, त्यातून ते कसे घडलेत-बिघडलेत याचे भावपूर्ण चित्र ते उभे करीत होते. ते ऐकताना अंगावर सरसरून काटे उभे राहत होते. आपल्या स्वतःच्या आयुष्याबद्दल एवढ्या प्रांजळपणे बोलणारा माणूस आणि तोही डॉक्टर.... पहिल्यांदाच पाहत होतो.

भिक्षेकरांचा डॉक्टर अर्थात डॉक्टर फॉर बेगर्स.. एक प्रवास !! या पुस्तकाचे लेखक आहेत डॉ. अभिजीत सोनवणे. हे पुस्तक म्हणजे त्यांचं आत्मचरित्र आहे. एखाद्याच आयुष्य हे अनेक विविधांगी घटनांनी कसं भरलेलं असतं त्याचा हा उत्तम नमुना आहे. डॉ. अभिजीत सोनवणे यांचं मूळ गाव हे सातारा जिल्ह्यातील माण तालुक्यातील म्हसवड आहे. त्यांचं आजोळ आहे कोल्हापूर. त्यांच्या मामांचं गाव.. आईच्या आई-वडिलांचे गाव. त्यांचं बालपण हे त्यांच्या आजी आजोबांच्या सानिध्यात गेलं. आजोबा नामदेवराव व्हटकर आणि आजी लक्ष्मीबाई व्हटकर यांनी त्यांचे बालपणात अतिशय लाड केले. लाड यासाठी केले की आजीचे वडील तिच्या स्वप्नात आले आणि त्यांनी सांगितले की ते पांडुरंगाच्या पोटी जन्माला येणार आहेत. पांडुरंगाच्या पोटी जन्माला आल्यामुळे आजी त्यांना तिचा बाप मानायची. त्यामुळे सर्व प्रकारचे लाड होत राहत. लहानपणीच आजीमुळे त्यांच्या माणसांबद्दलचा अभ्यास सुरू झाला. वेगवेगळ्या प्रकारच्या शिव्या ते शिकले. नदीकाठी धुणे-भांडी करायला जाणाऱ्या स्त्रियांबरोबर ते जात. तेथे त्यांना त्या स्त्रियांच्या आपसापसातल्या चर्चे वरून स्त्रियांचे दुःख समजले. गावातल्या मोठ्या पुरुष मंडळी बरोबर ही ते जात. त्यांच्याबरोबर बीडी पिणं, तंबाखू मळणं, पत्ते खेळणं, घरातून पैसे चोरणं, वाईट सिनेमा बघणं यासारख्या गोष्टी शिकलेत. आजीच्या लाडाचा हा सर्व परिणाम होता.

पुढे वडिलांची बदली झाली. ते सावंतवाडी येथे चिफ मेडिकल ऑफिसर म्हणून रुजू झालेत. सावंतवाडीत त्यांचा मिलाग्रिस हायस्कूलमध्ये प्रवेश झाला. येथे शिकविणाऱ्या सर्व नन्स होत्या. गावाकडचा टारगटपणा येथे अजिबात नव्हता. या शाळेत सेवाभावाचे शिक्षण दिले जाई. रस्त्यात निराधार पडलेल्या माणसांना जेऊ घालणं, भटक्या कुत्र्यांना पाणी पाजणं, भीक मागणाऱ्या लोकांची ड्रेसिंग करणं, चिमण्या-कावळ्यांना अन्न ठेवणं अशी सेवेची कामं केली जात. त्यामुळे त्यांच्यात सेवावृत्तीची वाढ झाली. येथेच त्यांना सिनियर असलेली मुलं त्यांचं रॅगिंग करत. आईने त्यांना जशास तसे वागण्याचा सल्ला दिला. परिणामी अन्याय करणाऱ्या एका मुलाला त्यांनी बेदम मारले. त्यामुळे त्यांची दहशत वाढली. पुढे वारंवार ते हाण्यामाऱ्या, दादागिरी करायला लागले. खोटं बोलणं, शिव्या देणं, अभ्यास न करणं, उनाडक्या करीत फिरणं सुरू झालं. जेमतेम ४०% मार्क मिळवून ते बारावीची परीक्षा पास झालेत. त्याचवेळी वडिलांची बदली पुण्याला झाल्यामुळे त्यांना वडिलांच्यांच प्रयत्नामुळे फर्ग्युसन कॉलेजमध्ये विज्ञान शाखेत प्रवेश मिळाला. आई-वडिलांची इच्छा होती की मुलाने डॉक्टर व्हावं. त्यांनी त्याला मेडिकल प्रवेशासाठीचा अर्ज भरण्यास प्रवृत्त केलं. त्यांचं नशीब बलवत्तर म्हणून त्यांना गंगा मेडिकल कॉलेज, कोल्हापूर येथे प्रवेश मिळाला. हे खाजगी महाविद्यालय होतं. मेडिकल कॉलेजच्या पहिल्या वर्षाच्या वर्गात त्यांना काय शिकवलं जात आहे हे कळत नसे. यापूर्वी त्यांनी मन लावून एकाग्रपणे अभ्यास केलेलाच नव्हता.

मेडिकलला असतांना ते लेक्चर चालू असताना मागच्या बाकावर बसून कविता, लेख लिहत. एकदा असेच आजारी गाढवाचं मनोगत लिहीत असतांना डॉ. आजनाळकर सर त्यांच्याजवळ उभे राहिले तरी त्यांचं लक्ष नव्हतं. त्यांनी त्यांच्या हातातून वही ओढून घेतली आणि ते वही चाळत राहिले; त्यांनी त्यास गाढवावरचा लेख वाचावयास सांगितले. तो वाचून पूर्ण झाल्यावर त्यांनी बघितले की वर्गातली मुलं आश्चर्याने त्यांच्याकडे बघतायेत; त्यांचे डोळे पाणावलेत. डॉ. आजनाळकर सरांनाही अश्रू लपविणे कठीण जात होतं; त्यांनी तो लेख कॉलेजच्या भित्तिपत्रकावर लावला. सर्वांनी तो वाचावा हीच त्यांची त्यामागे इच्छा होती. त्या दिवशी त्यांना मिळालेली शाबासकी, टाळ्यांनी त्यांचं आयुष्य बदललं. आयुष्यात पहिल्यांदाच त्यांना कळालं की त्यांच्या स्वत:त काहीतरी आहे. त्यांचा आवाजही चांगला होता. चांगली गाणी म्हणायचे, कथा, कविता, गाणी यामुळे ते कॉलेजच्या मुलांच्या गळ्यातील ताईत झालेत. त्यांनी त्यांना स्वतःलाच स्वतःची एक नवी ओळख करून दिली. ॲनाटॉमी शिकविणारे डॉक्टर गुप्तांनी त्यांच्यातील हे टॅलेंट ओळखून त्यांना अभ्यासाकडे वळवले. परिणामी त्यांना अभ्यासाची आवड लागली. डॉ. आजनाळकर सरांनी त्यांना साहित्याची गोडी लावली. डॉ. गुप्ता सरांनी अभ्यासाची. विद्यार्थ्यांची मनं ओळखून त्यांच्यातल्या दोषांनाच बलस्थान बनवणारे असे शिक्षक विरळेच असतात. परिणामी अभिजीतना प्रथम वर्षात घवघवीत असं यश मिळालं आणि पुढील शिक्षणासाठी ते पुण्यातील टिळक मेडिकल कॉलेजमध्ये दाखल झालेत. तेथे दरवर्षी उत्तम मार्कांनी पास होत ते डॉक्टर झालेत.

अभिजीत डॉक्टर झालेत तरी पुढे काय करायचे हा प्रश्न आडड वासून उभा होताच. मध्यमवर्गीय आई-बाप दवाखाना थाटून देऊ शकत नव्हते. स्वतःच यातून काही मार्ग काढायचा म्हणून त्यांनी कोथरूडच्या एका डोंगराच्या वस्तीत दवाखाना सुरू केला. दवाखाना म्हणजे झोपडीवजा एक रूम. दोन तोडक्या-मोडक्या खुर्च्या; आईच्या पातळाचे पडदे आणि जमिनीवर सोलापुरी चादरी टाकून पेशंटची तपासणी. परंतु येथेही नशीब आडवे आले. झोपडी मालकाने दवाखान्याची झोपडी खाली करून द्यायला सांगितली. मग दुसरी, नंतर तिसरीही झोपडी बदलावी लागल्यामुळे डॉ. अभिजीत निराश झालेत. तेव्हा झोपडपट्टीतल्याच एका वयस्कर स्त्रीने सांगितले की घरोघरी जाऊन पेशंट तपासावेत. अलीकडे सर्व वस्तू घरपोच मिळतात मग डॉक्टर का नको? डॉ. अभिजीतना ही कल्पना आवडली. पुण्याजवळच्या एका खेड्यात त्यांनी हा प्रयोग सुरू केला. घरोघरी जाऊन कोणी आजारी आहे का? म्हणून ते विचारू लागले. सुरुवातीला लोकांना शंका येऊ लागल्या.. हा चोर तर नाही; काही जण हसू लागले पण ते निराश झाले नाहीत. हळूहळू गावकऱ्यांचा पाठिंबा मिळू लागला. अशातच त्यांना एक आजोबा भेटले. शिकलेले-सवरलेले.... पण काही कारणांनी घरातून बाहेर काढले गेलेले. लोक त्यांना भिकारी म्हणायचे. पण पूर्वी ते तीन हॉटेलचे मालक होते. घरातल्या लोकांनी त्यांना फसवून संगमताने हॉटेल त्यांच्या नावावर करून त्यांना मात्र बेदखल केले. ते त्या गावातल्या देवळातल्या ओसरीवर झोपायचे. त्यांनी निराश झालेल्या डॉक्टरांना वडीलकीच्या नात्याने जीवनाचे तत्त्वज्ञान थोडक्यात समजावले. ते म्हणायचे- बाळा, **(पान ६ वर)**

## ऐका ते खरं

नितीन अहिरराव
मो.९०९६२०४८७५

# तुम्हना नावनं पकड वॉरन्ट शे..!

रामराम मंडई कसा शेतस बठ्ठा मजामा ना .

खारानं नाव डारं आनी शेन खाये ते न्यारं या म्हनंना गत माले एक भलताच डेंजर अनुभव येल शे , तो तुम्हले आज सांगी राहिनु . मी असाच मन्हा दुकानवर काम करी राहीन्तु आनी अचानक मन्हा दुकान म्होरे पोलीस गाडी ईस्नी उभी राहिनी आनी दोन पोलीस पायऱ्या चढीस्नी दुकानमा वुनात, माले वाटनं व्हई काहीतरी काम , नै ते कोनातरी पत्ता बित्ता ईचाराले वुना व्हतीन , मी त्यास्ले रामराम करा

रामराम शेठ रामराम, आपलं नाव नितीन सोनार शे ना ?

हवं सर , मी नितीन अहिरराव नाव लावस पन सोनार शे म्हनीस्नी काही जन माले नितीन सोनार म्हनतस, आम्हनाकडे तुम्हना नावन पकड वॉरंट शे , तुम्हले आम्हना बरोबर पोलीस स्टेशनले येनं पडी

काय मन्हां नावनं पकड वॉरंट, आनी मी काय कयं , कोनता गुन्हा करा मी इन्स्पेक्टर साहेब

तुम्हना नाव वर घरफोडीना गुन्हा दाखल शे आनी तुम्हीन फरार आरोपी नंबर दोन शेतस

इन्स्पेक्टर साहेब तुम्हना काहीतरी गैरसमज व्हयेल शे ,मी एक कारागीर मानुस शे ,मी कसाले घरफोडी करु साहेब मी घाबरत घाबरतच बोल्नु

ते काही आम्हले माहित नै , तुम्ही नितीन सोनार शेतस आनी पहिले तुम्ही मोगलाईमा राहेत, बरोबर ना ?

हवं साहेब, ते बठ्ठ बरोबर शे पन ,मी कसाले चोरी करु ,मी ते रस्त्यावर पडेल एक रुपयाभी उचलत नै आनी मन्ही इतली हिंमतभी नै ,मी कसाले घरफोडी करु बोलता बोलता माले चांगलाच घाम फुटना आनी मी वल्लाचिंब व्हयनु

देखा शेठ , तुम्हले जे काही सांगन शे ते पोलीस स्टेशनले ईस्नी सांगा , जे काही खरं खोटं व्हई ते कोर्टमा व्हई . चला पटकरी आम्हले टाईम व्हई राहिना .मी कसबसं स्वताले सावरं एक गल्लासभर पानी पिध आनी म्हना बायकोले सांगीस्नी पोलीस इन्स्पेक्टर बरोबर पोलीसना जीपमा बसनु.

अचानक काय व्हयन आनी नवराले पोलीस काब्र लयी गयात हायी बायकोले काहीच माहित नव्हतं, घर मायबाप भी चारधामना यात्राले जायेल व्हतात आनी पोरे ते धाकलाच व्हतात , आख्खी गल्लीमातला शेजारी बाहेर उभा व्हतात, बायकोनी रडबोंबल सुरु व्हयनी मी पोलीस जीपमा बसीस्नी पोलीस स्टेशनले पोहचनु

मंडई खरी हकिकत अशी होती म्हनाच नावना




एक चिंधीचोर काही वरीसपहिले त्या परिसरमा राहे, तो घरफोडी करीस्नी फरार व्हयना , तो कोठे गया काय गया कोनलेज माहित नै व्हतं , आनी त्याले फरार व्हवाले सात आठ वरीस व्हयी जायेल व्हता, पोलीस तपास करत करत त्यास्ले अशी माहिती मियनी की नितीन सोनार नावना एक तरुननी मोगलाई भागमा दुकान टाकेल शे आनी तो तठे कारागीर करस असं , त्यास्नी फक्त नावच देखं , खर काय आनी खोटं काय यानी चौकशी करी नयी , त्यास्ले वाटनं बरा सापडना कितला वरीसपाईन फरार व्हयेल व्हता .

मी आयुष्यमा पहिलीसावच पोलीस स्टेशननी पायरी चढनु व्हतु , माले समजेच नै की काय करु आनी काय नै अशी , माले पोलीस स्टेशनमा एक कोपरामा बाकडावर बसाले सांग, मी गुमसुम व्हईस्नी गुपचूप बसनु, तठे जो भी इन्स्पेक्टर ये तो मन्हाकडे खालपाईन ते वर पावोत देखे, माले मी वाटे मी मोठा गुन्हा करेल शे आनी आते मन्ही काही खैर नैअसं वाटे धायमोकलीस्नी रडी लेवो.. नरडं कोल्डखटक पडी जायेल व्हतं

माले पोलीस इन्स्पेक्टर पोलीस स्टेशनले लई गयात हाई बातमी मन्हा वकील मामा श्री कैलास अहिरराव मामाले माहित पडनी आनी त्या उनात, तवय मन्हा जीवले बरं वाटनं , त्यास्नी पोलीस इन्स्पेक्टर बरोबर चर्चा करी , माले भी परत ईचार की तुम्ही घरफोडी करी का अशी , मी नै सांग . पन त्या इन्स्पेक्टर बोलनात

तुम्हले इतलामा सोडता येवावु नै , संध्याकायले तुम्हनी सुटी व्हई . आनी तुम्हले कोर्टमा दर तारीखले हजेरी देनी पडी हवं मी दर तारीखले हजेरी देवाले ईसु अस मी सांग ठिक शे बसा त्या बाकडावर इन्स्पेक्टर बोल्ना. मी बाकडावर जाईस्नी बस्नु, पन एक एक मिनीट एक एक वरीसना मायक जात व्हता , जीव नुस्ता कसमसा कराले लागना व्हता एकदानी संध्याकाय व्हयनी आनी मन्ही सुटी व्हयनी मी जो निंघनु ते परत मांगे फिरस्नी पन देखं नै डायरेक्ट घर उनु .. नंतर माले दर तारीखले कोर्टमा हजेरी देवाले जानं पडे , पाच सहा महिनानंतर तो खरा घरफोड्या सापडना आनी मन्हं नाव त्या केसमातुन कमी व्हयनं. ज्या खरोखर गुन्हेगार –हातस त्यास्ले कोर्ट कचेऱ्या, पोलीस स्टेशन यास्नं काहीच वाटस नै , कारन त्यास्नी नजर मरेल –हास आनी त्यास्नी गुन्हा करेल –हास , पन ज्यास्ना पोलीस स्टेशन आनी कोर्ट कचेरीना कधी सबंध येस नै त्यास्ले खूप फरक पडस आनी त्या भी मन्हा सारखाच भेमकाई जातस, तुम्ही म्हनश्यात कर नै ते डर कसाले पन मंडई ज्यानावर बितस त्यास्लेज माहित –हास खर काय ते.

---

दिलीप कजगांवकर
पुणे, मो.७७७००२५५९६

# विश्वनाथ

सदानंद माने, एक सामान्य माणूस. डॉक्टरी पथ्याचे लेबल लावून बिनसाखरेचा चहा पिणारा, शेजाऱ्याचे वर्तमानपत्र अगदी सकाळी सकाळी ढापून अथपासून इतीपर्यंत वाचणारा.

सावित्री ही सदानंदांची पत्नी. मला शंभर मुलांनी मागणी घातली; पण नशीबच फुटकं, या सदानंदाशी लग्न केलं, असं दिवसातून दहा वेळा म्हणणारी.

रविवारची सकाळ, घड्याळाचे काटे बरोबर ९० अंशावर. हातात शेजाऱ्याचा ढापलेला पेपर आणि समोर बिनसाखरेचा चहा.

तेवढ्यात फोन वाजला. नमस्कार सर, मी विश्वनाथ बोलतोय. पुढच्या आठवड्यात माझ्या एका पुस्तकाचे प्रकाशन करायचे आहे आणि त्या कार्यक्रमाला मी तुम्हाला चीफ गेस्ट म्हणून इन्व्हाईट करतोय. पुढच्या रविवारी सकाळी नऊ वाजता मी तुम्हाला रिमाइंड करण्यासाठी फोन करीन असे म्हणत सदानंदांना बोलण्याची कोणतीही संधी न देता विश्वनाथने फोन ठेवला.

सावित्री, अगं पुढच्या आठवड्यात एका कार्यक्रमाला मला चिफ गेस्ट म्हणून बोलावलं आहे, सदानंदांनी सावित्रीबाईंना सांगितले.

सदा अरे तुला आणि चिफ गेस्ट म्हणून बोलावलंय? माझा नाही विश्वास बसत याच्यावर. कदाचित त्यांना दुसरे कोणी सदानंद माने हवे असतील आणि त्यांनी फोन चुकून तुला लावला असेल, सावित्रीबाईंनी त्यांचा संशय व्यक्त केला. आपल्या माहितीत विश्वनाथ कोण आहे? सदानंदांनी विचार सुरू केला. त्यांच्यापुढे दोन नावं आलीत. एक म्हणजे गुंडप्पा विश्वनाथ, भारताचा माजी क्रिकेटपटू आणि दुसरे म्हणजे त्यांचे काका. आता गुंडप्पा विश्वनाथ, ज्याला मी कधीच भेटलो नाही, तो मला कसा बोलवेल त्याच्या पुस्तकाचे प्रकाशन करायला? पहिला विश्वनाथ सदानंदांच्या यादीतून बाद झाला. सदानंदांनी त्यांच्या विश्वनाथ काकांना फोन लावला. काका, कसे आहात तुम्ही? हल्ली काही लिहिणं वगैरे? सदा, अरे गेले सहा महिने मी अंथरुणाला खिळून आहे. काय लिहिणार मी? दुसरा विश्वनाथ देखील बाद झाला. सावित्री म्हणते तेच खरं असावं. सदानंद माने नावाचा कुणीतरी प्रख्यात माणूस असावा आणि नांवातील साधर्म्यामुळेच तो फोन आपल्याला लागला असेल, सदानंदानी चीफ गेस्ट प्रकरण मनातून काढून टाकले. पुढच्या रविवारी सकाळी बरोबर नऊ वाजता विश्वनाथचा फोन आला, सर मी तुम्हाला घ्यायला संध्याकाळी सहा वाजता गाडी पाठवतो, तुम्ही तयार रहा असे म्हणत विश्वनाथने फोन कट केला.

माने साहेब जायचं ना तुम्हाला चीफ गेस्ट म्हणून? म्हणत सावित्रीबाईंनी चहाचा कप सदानंदांच्या समोर ठेवला. सावित्री मला खूप भीती वाटते गं, विश्वनाथच्या मनातील सदानंद माने मी नक्कीच नसणार आणि त्यामुळे माझी फजिती होईल, सदानंद म्हणाले. सदा, अरे, घाबरू नकोस आणि हो जाताना हे नवीन कपडे घालून जा, बरोबर सहा वाजता गाडी घेणार आहे, तू तयार रहा म्हणत सावित्रीबाईंनी सदानंदांचा आत्मविश्वास वाढविला. काय वर्णावा आजचा सदानंदांचा रुबाब! सावित्रीबाईंनी दिलेले नवे कोरे कपडे, विश्वनाथने पाठविलेली आलिशान गाडी आणि गणवेशधारी ड्रायव्हर. सदानंद कार्यक्रमाच्या स्थळी पोहोचले. श्रोत्यांनी भरलेला मोठा हॉल. भले मोठे व्यासपीठ आणि त्या व्यासपीठावरील मधली खुर्ची सदानंदांची. सदानंदांना गरगरल्यासारखे झाले. तोल जाऊन पडू नये म्हणून ते नाईलाजानेच खुर्चीवर बसले. सर्वप्रथम मी आजच्या कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे श्री. सदानंद माने सर यांचे स्वागत करते, एक सुंदर तरुणी बोलत होती. कार्यक्रमाच्या सुरुवातीला विश्वनाथ सरांचे आणि त्यानंतर माने सरांचे भाषण होईल. नंतर माने सरांच्या हातून विश्वनाथ सरांनी लिहिलेल्या पुस्तकाचे प्रकाशन होईल आणि त्यानंतर विश्वनाथ सर माने सरांचा सोन्याचे कंगण देऊन सत्कार करतील.

विश्वनाथचा चेहरा ओळखीचा वाटत होता पण ओळख अजिबातच लागत नव्हती. विश्वनाथच्या बोलण्यावरून हे स्पष्ट होत होते की विश्वनाथ म्हणजे एक बडी असामी. भरपूर गाड्या, बंगले आणि भारतातच नव्हे तर परदेशात देखील व्यवहार. विश्वनाथला हवा असलेला सदानंद माने मी नक्कीच नाही याची सदानंदांना खात्री पटली. आता माझे आदरस्थान असलेल्या सदानंद माने सरांना मी विनंती करतो की त्यांनी दोन शब्द बोलावेत. विश्वनाथच्या या वाक्याने सदानंदांच्या पल्स रेटने सेंच्युरी तर ब्लड प्रेशरने डबल सेंच्युरी मारली. त्यांना गरगरू लागले. मी एक सांगायला विसरलो, विश्वनाथ म्हणाला. माझ्या करिअरची सुरुवात मी सातारा येथील मोल्डेड लगेज कंपनीतून केली. विश्वनाथच्या या वाक्याने जादू केली आणि सदानंद क्षणात नॉर्मल झालेत. विश्वनाथ अर्थात् विशीची ओळख त्यांना पटली होती.

विशी साताऱ्या जवळील एका छोट्याशा गावातला. अतिशय हुशार परंतु बिकट आर्थिक परिस्थितीमुळे डिप्लोमा नंतरचे शिक्षण घेऊ न शकलेला. विशी डिप्लोमा केल्यानंतर साताऱ्या जवळील एका मोल्डेड लगेज कंपनीत डिस्पॅच सेक्शन मध्ये कामाला लागला.

बरा पगार आणि रोजचा दोन ते तीन तासांचा ओव्हरटाईम असे दुहेरी इनकम त्याला मिळायचे. लग्नानंतर बायकोच्या ओढीमुळे की काय पण विशीचा ओव्हरटाईम मधील रस कमी झाला. सुरुवातीला कधी कधी आई, वडील, बायको आणि स्वतःला आळीपाळीने आजारी पाडून विशीने ओव्हरटाईम पासून स्वतःची सुटका करून घेतली. परंतु हे किती दिवस चालणार? तो विचार करू लागला आणि त्याच्या डोक्यात एक भन्नाट आयडिया आली.

लोडिंग करताना प्रथम लहान आकाराच्या बॅग्स, नंतर मध्यम आकाराच्या बॅग्ज आणि त्यानंतर मोठ्या आकाराच्या बॅग्ज लोड करण्याची त्यांची पद्धत होती.

विशीच्या मनात आलेली आयडिया अशी होती की, मोठ्या आकाराच्या बॅगमध्ये मध्यम आकाराची बॅग टाकली आणि मध्यम आकाराच्या बॅगमध्ये लहान आकाराची बॅग टाकली तर लोडिंग चा टाईम बराच कमी होईल. आता ही आयडिया राबवायची तर ती मॅनेजर साहेबांना सांगावी लागणार होती आणि विशीची तर मॅनेजर साहेबांकडे जाण्याची हिंमत नव्हती . त्याने ही आयडिया त्याच्या एका सीनियर कलीग मार्फत मॅनेजर साहेबांकडे पोहोचवली. स्वतःची आयडिया म्हणून नव्हे तर विशीची आयडिया म्हणून त्या प्रामाणिक माणसाने सांगितलेली आयडिया मॅनेजर साहेबांना खूप आवडली. यामुळे कंपनीचा दुहेरी फायदा होणार होता. एक म्हणजे डिस्पॅच सेक्शनचा ओव्हरटाईम कमी होणार होता आणि दुसरा म्हणजे कंपनीचा ट्रान्सपोर्टर बरोबरचा कॉन्ट्रॅक्ट हा व्हॉल्युम बेसिसवर होता आणि बॅग मध्ये बॅग टाकल्यामुळे कंपनीची ट्रान्सपोर्टेशन कॉस्ट मोठ्या प्रमाणात कमी होणार होती. मॅनेजर साहेबांनी विशीची ही आयडिया वरिष्ठांपर्यंत पोहोचवली आणि कंपनीने विशीला ५०००/– रुपयांचे बक्षीस देण्याचे ठरविले. हे बक्षीस एका वेगळ्या पद्धतीने द्यायचे असे एच आर मॅनेजर साहेबांनी ठरविले. दुसऱ्या दिवशी सकाळी विशी कंपनीत आला आहे याची खात्री केल्यानंतर पाच हजार रुपये कॅश, आणि प्रशस्तीपत्र घेऊन एच आर ऑफिसर कंपनीच्या गाडीने विशीच्या साताऱ्यापासून साधारणतः १०–१२ किलोमीटर अंतरावर असलेल्या गावी जायला निघाले. गाडी गावात शिरल्यावर विश्वनाथ मराठेंचे घर कुठे आहे? आपल्याला सांगता येईल का? आम्ही त्यांच्या कंपनीतून आलोय, ड्रायव्हरने चार–पाच मुलांच्या घोळक्याला विचारले. हो साहेब, पण काय झालं?मुलांनी उत्सुकतेने विचारलं. ड्रायव्हरने त्यांच्यापैकी एकाला गाडीत घेतलं, उरलेले मित्र विश्वनाथच्या घराकडे पळालेत.

विशीच्या कंपनीतून साहेब लोक आलेत, गावात बातमी वाऱ्यासारखी पसरली. अनेक लोक विश्वनाथच्या घराजवळ गोळा झालेत. हे सर्व बघून विश्वनाचे आई–वडील धावत धावत बाहेर आलेत. साहेब काय झालं? आमच्या मुलाने काही चूक केली का? प्लीज त्याला काही शिक्षा करू नका म्हणून ते साहेबांना विनवू लागले. विश्वनाथच्या बायकोने तर साहेबांचे पायच धरलेत. साहेब, विश्वनाथ ओव्हरटाईम करत नाही ते माझ्यामुळे परंतु मी तुम्हाला वचन देते मी त्याला आडवणार नाही पण तुम्ही त्याला कंपनीतून प्लीज काढू नका. नक्कीच विश्वनाथने कंपनीत काहीतरी घोटाळा केला असणार, जमलेल्या लोकांमध्ये चर्चा सुरू झाली. एकंदरीत वातावरण खूपच भावूक झाले होते. एच आर ऑफिसरने पुढे येऊन सांगितले, तुम्ही अजिबात काळजी करू नका. विश्वनाथने कोणताही घोटाळा केलेला नाही उलट त्याने कंपनीला एक अतिशय उपयुक्त सूचना दिली आहे जीच्यामुळे कंपनीचा खूप मोठा फायदा होणार आहे आणि म्हणूनच पाच हजार रुपये कॅश आणि प्रशस्तीपत्र घेऊन आम्ही येथे आलो आहोत असे म्हणत त्यांनी कॅश आणि प्रशस्तीपत्र विश्वनाथच्या आई–वडिलांना सुपुर्द केले. आपणा सर्वांना एक विनंती आहे की या बक्षीसाबद्दल विश्वनाथ घरी येईपर्यंत त्याला काहीही सांगू नका, हे सर्व त्याच्यासाठी आश्चर्यच राहू द्या. संध्याकाळी विश्वनाथ बसमधून उतरला आणि तीन–चार मित्रांना बस स्टैंड वर बघून त्याने विचारले, अरे मित्रांनो कुठे निघाला तुम्ही? विशी अरे तुलाच घ्यायला आलो आम्ही. मला आणि घ्यायला? का? कशासाठी? माझ्या घरी सगळे ठीक आहे ना? विशीने विचारले. विशी तू घरी चल, मग तुला सांगतो. विश्वनाथच्या प्रत्येक प्रश्नाला तेच ते उत्तर, तू घरी चल मग तुला सांगतो. विश्वनाथला खूप मोठे टेन्शन आले होते. घरापाशी खूप गर्दी जमली होती. आपले आई वडील ठीक असतील ना? आपली बायको ठीक असेल ना?असे अनेक प्रश्न त्याच्या मनात निर्माण झालेत. तेवढ्यात विशी आला, विशी आला, कोणीतरी ओरडले. विश्वनाथचे आई वडील आणि बायको बाहेर आलेत. आई–बाबा आणि बायको ठीक आहे मग काय झालं? विश्वनाथला समजत नव्हते. काय झालं? कोणी मला सांगेल का? विशीने विचारले. कोणीही काहीही बोलत नव्हते. तेवढ्यात शेजारचे साने काका पुढे आलेत आणि त्यांनी सर्व वृत्तांत विशीला सांगितला. कंपनीने दिलेले इतकं मोठं बक्षीस आणि तेही इतक्या अलौकिक पद्धतीने, विश्वनाथ कृतकृत्य झाला. त्यानंतर विश्वनाथने कंपनीत उत्तरोत्तर प्रगतीच केली. आणि त्या दिवशी माझी आयडिया मॅनेजर साहेबांपर्यंत पोहोचविण्याचे काम केले होते सदानंद माने सरांनी. आज मी जो काही आहे तो केवळ सदानंद माने सरांमुळेच. दुर्दैवाने एका अपघातामुळे माने सरांनी कंपनी सोडली आणि मी पुढे त्यांच्या मार्गदर्शनाला मुकलो. विश्वनाथाच्या त्या वाक्यामुळे स्वतःला झिरो समजणारे सदानंद माने सर क्षणात हिरो झाले होते, माने सरांची मान ताठ झाली होती. कार्यक्रमाचे चीफ गेस्ट, पुस्तकाचे प्रकाशन आणि त्यानंतर सोन्याचे कंगण, खरोखरच आजचा दिवस सदानंदांचा होता. आपल्या या सत्कारावर सावित्रीचा विश्वास बसेल का? सदानंदांच्या मनात शंका निर्माण झाली. तेवढ्यात विश्वनाथ म्हणाला, सर मी तुम्हाला घरी सोडतो. थोड्याच वेळात ते दोघेही सदानंदांच्या घरी पोहोचलेत. सावित्रीने विश्वनाथचे मोठ्या आत्मीयतेने स्वागत केले. सावित्रीने लगबगीने सदा आणि विश्वनाथ यांच्यासाठी चहा आणला, थोडी जास्त साखर टाकलेला. अगं चहात साखर जास्त झाली सदानंद म्हणाले. असू द्या हो, विशीला जरा गोड चहाच आवडतो, सावित्रीबाई म्हणाल्यात. तू विशीला ओळखतेस? आश्चर्याने सदानंदांनी विचारले. सावित्री आणि विश्वनाथ दोघेही गोड हसलेत. सर, खरं तर खूप वर्षांपासून मी तुम्हाला शोधत होतो. मागच्या महीन्यात वहिनींचा आणि माझ्या बायकोचा परिचय झाला. वहिनी आमच्या घरी आल्यात, त्यांच्याकडून तुमच्याबद्दलची सर्व माहिती मिळाली. आजच्या कार्यक्रमाला चीफ गेस्ट म्हणून तुम्हाला बोलवायचं हे मी वहिनींना सांगितलं, तुम्हाला काहीही न सांगण्याच्या अटीवर. रात्री सदानंदांना छान झोप लागल्यामुळे उठायला थोडा उशीरच झाला. आज शेजाऱ्यांचा पेपर ढापता येणार नाही याची मनात खंत होती. तेवढ्यात दारावरची बेल वाजली. चार शेजारी हातात पेपर घेऊन उभे होते आणि प्रत्येक जण सदानंदांना सांगत होता, सर आमचा पेपर घ्या. आजच्या पेपर मध्ये फ्रंट पेजवर सदानंद आणि विश्वनाथ यांचा फोटो होता आणि त्याखाली बातमी होती,सदानंद मानेंची विश्वनाथ ग्रुप ऑफ इंडस्ट्रीज मध्ये जनरल मॅनेजर पदावर नेमणूक, भरपूर पगार, गाडी आणि बंगल्यासह.

---

## हास्यगिरी

प्रा.वसंत गिरी
मो.९०११२२९२३२

# विनोदवीर अहंकाराला थारा देत नाहीत

एक कालावधी असा होता.विवाह मोसमात वर पित्याची काय टेक असायची?गडकऱ्यांच्या साहित्या मध्ये त्याची टेक नेमकी कशी असते?त्याचे वर्णन करतांना बाळकराम म्हणतो. विवाह मोसमात वर पित्याची वर्तणूक कशी बेफाम झालेली असते.या संधीचा लाभ तो कसा घेतो? त्याचे मन थोर थोर ऐतिहासिक पुरुषांच्या गुणविशेषाचे प्रदर्शन बनून जाते.अशी सुरुवात करुन त्याच्या वर्तनाचा जो उपहास येथे गडकऱ्यांच्या लेखणीतून उतरला आहे. ते लिहीतात,महमद गझनीच्या धनलोभाने तो स्वार्थ परायण होतो,नेपोलियनच्या महत्वाकांक्षैने आपल्या मुलाकडे तो पहातो,नाना फडणिसांच्या व्यवहार कौशल्याने तो मुलाची किंमत ठरवतो,शिवछत्रपतीं च्या धाडसाने वाटेल त्या विजापूरकरावर तो मारा करतो आणि नादिरशहाच्या क्रुर वर्तनाने ही रक्कम



वसूल करुन घेतो.

वरवर पहाता हा विनोद वाटतो पण समाजात रूढ झालेली पुरुषप्रधान संस्कृती स्त्री जातीची किती अवहेलना करते.वरपित्याचे अमानवी वर्तन व्यवहार्य पातळीवर किती निच्चांक गाठते आणि आपल्या वर पुत्राचा कसा भाव ठरवते? हे सिद्ध करण्याकरीता त्यांनी त्या संवादात वापरलेली आयुधे खूपच प्रभावी आहेत,हे वाचक व प्रेक्षकांच्या निदर्शनास येते. त्यामुळे गडकऱ्यांच्या प्रतिभेचे व विनोदशैलीचे मूल्य कळते.वरपित्याच्या अमानवी वर्तनास ते महमद गझनीचा धनलोभ, नेपोलियन बोनापार्टची महत्वाकांक्षा,नाना फडणिसांचा व्यवहार, शिवछत्र- पतींचा मारा व नादीरशहाचे क्रूर वर्तण ठरवितात. हुंडा ही समाजात रूढ झालेली अनिष्ठ प्रथा किती क्रुर व अमानुष आहे.हे सिद्ध करण्यासाठी मजेदार उदाहरणांचा त्यांनी उपयोग केलाआहे.वरवर पहाता नाट्यप्रेक्षकांना तो विनोद वाटतो. प्रेक्षक व वाचक त्यामुळे मनमुराद हसण्याचा आनंद घेतात पण समाजजीवनातीलं वैगुण्य शोधण्यास विवेकवादी वाचक,समिक्षक त्या स्थितीचा खोलवर विचार करुन जेंव्हा त्या विषयाच्याअंतरंगात शिरतात तेंव्हा विनोद समाजप्रबोधन व परिवर्तनाचे किती प्रभावी साधन आहे. हे विचारी व्यक्तीच्या लक्षात येते.तो विचार सर्वसामान्यापर्यंत पोहचविणे, त्यांना पटवून देणे व रुजविण्याचे काम सूज्ञ व्यक्तींनी करायचे असते. तो खूपच अप्रतिम शब्दात,अत्यंत शैलीदार वाक्यात स्पष्ट केल्यामुळे त्यातील आशय गर्भता,मार्मिकता पार काळजाला जावून भिडते. विनोदाचे मर्म जाणनाऱ्यांना या वाईट कृत्यामागीलं कर्म लक्षात येते.खोट्या प्रतिष्ठेची झूल मिरवणाऱ्या वरपित्याचा बुरखा गडकऱ्यांचा विनोद टराटरा फाडतो. खोट्या प्रतिष्ठेच्या दांभिकतेस आव्हान देतो.खरेच ती गडकऱ्यांच्या विनोदी संवादातील ताकद आहे. याची कल्पना वाचकास येते. हुंडापद्धतीवर प्रहार करतांना पुढे बाळकरामाचा संवाद असा,

श्रीमंत गोपिकाबाईंनी लग्न झालेल्या अर्थात हुंड्याची भरपाई करुन चुकलेल्या विश्वासरावास गिलच्यावर चालून जाण्यास मोकळेपणाने परवानगी देऊन, माधवराव व नारायणराव या दोघांना मात्र पानिपतच्या मोहिमेवर पाठविले नाही.गोपिकाबाईंना धोरणी व मुत्सुदी का म्हणतात ते उगीच नाही. दुसरी एखादी बाई असती तर सोन्यासारखी,सारखीच का?अगदी भारोभार,सोन्याच्या तोलाचीच.दोन्ही पोरे पानिपतवर तोफेच्या तोंडी देऊन,एवढ्या मोठ्या हुंड्याला आचवली असती!एवढ्या प्रचंड प्रमाणात हुंड्याचा हव्यास? मुलगा झाल्याबरोबर जन्मदाते हुंड्याच्या रकमेवर कोणकोणती इमले बांधतात? पौराणिक काळात हुंडाप्रथा असती तर युद्धासारखे अनर्थ बिनबोभाट टळले असते असे गडकऱ्यांचा बाळकराम आत्मविश्वासपूर्वक सांगतो,याचा अर्थ हुंडा प्रकार किती भयंकर आहे किंवा त्याची तुलना कोणत्या भिषन प्रसंगाशी करून त्यातील दाहकता सिद्ध करतात.हे आपल्या लक्षात येते.पुढे बाळकराम म्हणतो,शंभर राजबिंड्या राजपुत्रांचा हुंडा येण्याची खात्री असल्यावर हस्तिनापूरच्या टीचभर राज्यासाठी असलेल्या कुलक्षयकारक युद्धास धृतराष्ट्राने कधीही संमती दिली नसती.तेवढ्या हुंड्यातच त्याने तसली छपन्न राज्ये खरेदी केली असती. हा संवाद महाभारतातील भिषन युद्धापेक्षा हुंडा किती भंयकर आहे,हे सिद्ध करतो. शंभर वर्षापूर्वी गडकऱ्यांचा विनोद समाजातील घातक रुढीपरंपरावर किंवा जिवघेण्या कुप्रथेवर किती भेदक हल्ला करतो. रुढीग्रस्त प्रथेला व त्या प्रथेचा स्विकार करणाऱ्या स्वार्थी प्रवृतीवर आसूड ओढतो. त्यावरुन त्यांचा सुधारणावादी दृष्टीकोन लक्षात येतो.

अष्टपुत्र सौभाग्यवतीभव हा आशीर्वाद ५० वर्षापूर्वी अगदी निस्संकोचपणे जेष्ठ लोक देत होते. पण चुकूनही एखाद्याने अष्टकन्या सौभाग्यवतीभवं असा जर आशीर्वाद दिला तर त्या जेष्ठावर कोणती अनिष्ठ आपत्ती येईलं हे मात्र सांगता येत नव्हते. तिंबू नाना नावाचे गडकऱ्यांच्या नाटकातीलं पात्र असाच अष्टकन्येसाठी आशीर्वाद देते त्यानंतर तात्काळ त्यांना महाभंयकर आपत्तीला सामोरे जावे लागते. त्यांच्यावर रितसर कारवाई करुन न्यायाधिश त्यांना शिक्षा ठोठावतातं.त्यांच्यावरचा आरोप सिद्ध झाल्याचे निदर्शनासआणून त्यांना त्याबद्दल शिक्षा देतातं, विविधज्ञान विस्तारातील क्रितो व फिदो, ज्ञान प्रकाशातीलं स्थानिक सहकारी पत पेढ्यासंबधी सारे अग्रलेख व ' ब्रह्मज्ञान प्रदीप ' हे आध्यात्मिक गद्य नाटक वाचणाची व 'मानापमान ' नाटकातीलं प्रत्येक पदाचा अन्वयार्थ लावा. हे सर्व वाचन होई पर्यंत तुम्हाला पुण्यातल्या एखाद्या खाणावळीतच जेवावे लागेलं. दर आठवड्यास 'वीकएंड तकिट काढून मराठा रेल्वेच्या तिसऱ्या वर्गातून पुण्यावरुन मिरजेपर्यंत प्रवास करावा लागेलं.यापेक्षा कमी शिक्षा देता येणारं नाही अशी तंबी तिंबूनानास मिळाल्यावर त्यांचे डोळे पांढरे होतातं.शिक्षा देण्याची ही विलक्षण पद्धत खूपच मनोरंजन करणारी आहे. पुण्यावरुन मिरजेपर्यंतचा मराठा रेल्वेतील तिसऱ्या वर्गाचा प्रवास तेंव्हा अत्यंत खडतर असावा,त्या बरोबर त्या रेल्वेचा वेग म्हशीच्या चालीपेक्षा जास्त नसावा हे खात्रीने सांगता येईल.अगदी रेल्वेरुळावर म्हैस आली तरी रेल्वेचालक तिच्या आगमनाचा सन्मान करुन तो रेल्वेला त्वरित आराम द्यायचा. यावरुन तिच्या प्रचंड वेगाची स्पष्ट कल्पना वाचकांना येते. वर्तमान स्थिती मधेही मिनी गेजमधून जाणाऱ्या रेल्वेतून तिसऱ्या वर्गाचा प्रवास प्राणी व पक्ष्यासाठी आहे की माणसा साठी ? हा प्रश्न पडतो.गडकऱ्यांनी त्यांच्या नाटका साठी केलेला विचार १०० वर्षापूर्विचा आहे. त्या बरोबरच वाचनाचा अन्वायार्थ लावण्याची न्यायाधिशांची अटही तेवढीच चमत्कारीक वाटते. त्यामुळे अतिसामान्य किंवा किंचित ज्ञान व अज्ञानाचे भांडार असणाऱ्या व्यक्तीची अवस्था ही शिक्षा ऐकून काय झाली असेलं ? याची कल्पना आपणास सहजपणे येते.पुढे विनंतीअंती या शिक्षेला पर्याय म्हणून तिन वर्षे सक्तमजुरी व १००० रु दंड ही शिक्षा ऐकताच तिंबूनानाच्या आनंदाला पारावार राहतं नाही.या सर्व प्रसंगात अतिशयोक्ती,उपहास, उपरोध ही विनोदाची आयुधे गडकऱ्यांनी उपयोगात आणून अप्रतिम विनोदनिर्मिती केली आहे.आपल्या असे निदर्शनास येते.

सामान्य व्यक्तीच्या स्वभावातीलं सरळपणा किंवा जवळच्या व्यक्तीवरील अतिविश्वास किती?या संबधीचा सुंदर प्रसंग चि. वि. जोशींनी त्यांचा गुंड्या भाऊ उपोषनाला बसल्यावर चिमणराव रात्री चोरुन त्याच्या पोटपूजेची व्यवस्था लावतात.एकदा चिमण राव स्वंयपाक खोलीतील डबे हुडकण्याचा उपक्रम रात्री सुनसान झाल्यावर सुरु करतात.तेवढ्यात डबा आवाज करतो.जे कामअगदी कुणालाही थांगपत्ता न लागू देता करायचे होते,त्याचे बिंग फुटते की काय?असा प्रश्न त्याच्या मनात निर्माण होतो.निद्रीस्त अवस्थेत असलेले गुंड्याभाऊचे पिताश्री विचारतात, कोण आहे?त्यावर हजरजबाबी चिमणराव लगेच म्हणतात,कोणी नाही--आपलं ते मांजर! त्यावर गुंड्याभाऊचे पिताश्री झोपेतच टाळी वाजवून शुक् शुक् आवाज करतात व परत निद्रीस्त अवस्थेत जातातं. हा प्रसंग वाचकांच्या मनाला आनंद देवून जातो.

विनोदी साहित्याचा अभ्यास,त्या साहित्य विश्वातीलं संचार किती आनंददायी असतो?आपली दैनंदिनी सुखदायी करण्यासाठी अनेक विनोदी किस्से मी नेहमी माझा परममित्र पक्याला ऐकवत असतो. तोही त्याला दिलखुलास दाद देतो.तो त्याचा खूप सुंदर अनुभव आमची सायंभ्रमती सुरु असतांना सांगत होता.काल प्रवासातून आलो.खूप थंडी वाजली. हाडं ठणकायला लागलीतं त्यामुळे उडदाचे वरण खाण्याची माझी ईच्छा आहे. ईच्छाही तशी अगदी छोटीशीच.त्यात मांसाहार,वाईनं अपेक्षित नव्हतेच,पण सौ.च्या डोक्यात मात्र टमाटे संपवून टाकण्याचा बेतं पक्का झाला.त्यात कुठलाही बदल नाही.मी परत म्हणालो या आंबट टमाट्यांनी माझी हाडं जास्त ठणकतीलं.त्यावर गृहमंत्र्याचे फर्माण तयार, हे टमाटे आंबट नाहीतं. मी मनाशीच म्हणालो. खरे आहे तू ठरविल्यावर टमाट्यांना त्यांचा मूळ गुणधर्म सोडून द्यावा लागेलं आणि मी जास्तच हट्ट धरला तर उडदाचे वरणं आबंट होण्याची शक्यता आहे.त्यामुळे तुला योग्य वाटेल तोच निर्णय घे. या स्वगतानंतर मी माझा ईच्छात्याग केला.पक्याला त्याच्या संसारीक जीवनात विनोद वृतीमुळे सुचलेले शहाणपण त्याचे दैनंदिन जीवन गोड करेलं यात काही शंका घेण्याचे कारण आहे का? प्रत्येक प्रसंगामधील विनोद शोधता आला तर मनुष्यजीवन सुंदर होते. हे जसे पक्याला समजले तसे तुम्हाला उमजो. विनोद जीवनातील कलह दुर करुन प्रत्येक गोष्ट सहजसोपी करतो. जीवनातीलं आनंद शतगुणीत करतो.हे माझ्या मित्राच्या अनुभवावरुन आपल्या सुद्धा लक्षात यायला काही हरकत नसावी.

## खान्देश वैभव



प्राचार्य डॉ.अनिल बैसाणे
मो.९८२३२७७६१२
प्राचार्य डॉ.सुभाष पाटील
मो.९४२२२१८९९९

> विनोबाजींचे धुळे भेटीत वास्तव्य रामेश्वरजींकडेच रहात असे. सन १९९३ मध्ये गीताईच्या पहिल्या आवृत्तीचे प्रकाशन धुळे कारागृहात झाले तेव्हांपासून विनोबांचे लहान बंधू शिवाजीराव भावे गीताईचे प्रसार-प्रचाराचे कार्य करित महाराष्ट्रभर फिरत. त्यांचे वास्तव्य रामेश्वरजींकडेच असे. येथूनच ते सर्वत्र जात-येत असत.

# खानदेश गो-सेवाश्रम व गांधी तत्त्वज्ञान केंद्र आणि पोद्दार दाम्पत्य

**धुळे म्हणजे उत्तर महाराष्ट्रातील पुणे. :**

व्यापारी पेठेचे स्थळ असलेल्या धुळे शहराची विसाव्याच्या शतकाच्या प्रारंभी सर्वत्र ख्याती पावलेली होती. ज्ञान आणि थोर देशभक्तीच्या साधनेमुळे धुळे शहर म्हणजे उत्तर महाराष्ट्रातील पुणे अशी सर्वत्र प्रसिद्धी मिळाली होती. विनोबाजी भावेंच्या 'गीता प्रवचनां'मुळे गंगोत्री म्हणूनही धुळे शहरास महत्त्व प्राप्त झाले होते. अशा शहरात रामेश्वरजी आणि गंगूताई पोद्दार या उभयतांनी सर्व धर्मियांविषयी आदर बाळगून काकासाहेब बर्वे यांच्या अस्पृश्योद्धार कार्यातही सेवाभाव जपला. त्यांच्या घरात हिंदू-मुस्लिम-ख्रिश्चन असे पारिवारिक संबंध जोपासत धर्मसमन्वयाचे वातावरण निर्माण झाले होते.

**भोळाराम मारवडकर यांचे धुळ्यात आगमन :**

मारवाड मधील दातारमगड येथून भोळाराम व जोहारमल ह्यां बंधुनी पायीच प्रवास करीत धुळे गाठले. धुळे येथे आपल्या बहिणीकडे आश्रय मिळविला. ह्या बुंधनी हातजात्यांवर हरभरे भरडून सेनेच्या घोडदळास पुरविले होते. यातून मिळणार्या मोबदल्यात त्यांनी अतिशय कष्टाने आपला उदरनिर्वाह चालविला होता. पुढे भोळाराम आणि केसरबाई या दाम्पत्यांना २१ डिसेंबर १८९८ रोजी पुत्रप्राप्ती झाली.

**खानदेश गो-सेवाश्रमाची स्थापना :**

सन १९३२ मध्ये धुळे शहरात इ. वि. का. राजवाडे इतिहास संशोधन मंडळाच्या इमारतीचे उद्घाटन विनोबाजी आणि इंदोरच्या महाराणी होळकर यांच्या शुभहस्ते करण्यात आले. याप्रसंगी विनोबाजींचा मुक्काम रामेश्वरजींकडेच होता. तेव्हांच त्यांनी गोशाळेच्या उभारणीचा मनोदय व्यक्त केला. सदर कार्यक्रमात त्यांनी केलेल्या उद्बोधनामुळे परतीच्या प्रवासात जळगाव येथे विनोबाजींना कैद करुन धुळे कारागृहात बंदी म्हणून ठेवण्यात आले. कारागृहातूनच विनोबांनी सूचविल्याप्रमाणे वर्धा येथील आश्रमातून काही गायी-वासरे धुळे येथे आणण्यात आलीत. सन १९३५ मध्ये रामेश्वरजी यांनी शालीग्राम शेठ भारतीया यांच्या सहकार्याने मकर संक्रांतीच्या मुहूर्तावर 'श्री खानदेश सेवाश्रम, धुळे' या संस्थेची स्थापना केली. अप्पासाहेब रणदिवे यांच्या मार्गदर्शनाखाली संस्थेच्या इमारतीबरोबरच रामेश्वरजींच्या राहात्या घराचेही बांधकाम करण्यात आले. पुढे विनोबाजींच्या हस्तेच या संस्थेच्या वास्तुचे उद्घाटन करण्यात आले. तेव्हांपासून पोद्दार दाम्पत्यांचे वास्तव्य येथेच राहिले. या गो-सेवाश्रमातील गायी-वासरांची देखभाल स्वत: गंगुताई श्री. शंकरराव कुलकर्णी, श्री. रामचंद्र यांच्या मदतीने करीत. तर पुढे या संस्थेची धुरा श्री. पारनेरकरजी, श्री. दीनानाथजी, श्री. वसंतराव कर्णिक यांनी सांभाळली होती.

**विनोबाजींचे वडिल व बंधु समाधी स्थळ :**

विनोबाजींचे धुळे भेटीत वास्तव्य रामेश्वरजींकडेच रहात असे. सन १९९३ मध्ये गीताईच्या पहिल्या आवृत्तीचे प्रकाशन धुळे कारागृहात झाले तेव्हांपासून विनोबांचे लहान बंधू शिवाजीराव भावे गीताईचे प्रसार-प्रचाराचे कार्य करित महाराष्ट्रभर फिरत. त्यांचे वास्तव्य रामेश्वरजींकडेच असे. येथूनच ते सर्वत्र जात-येत असत.

पुढे जेव्हा विनांबाजींचे वडील नरहर पंत शंभूराव भावे हे आजारी असल्याचे समजले तेव्हा विनांबाजींच्या सूचनेनुसार त्यांना शिवाजीरावांनी रामेश्वरजींकडेच आणले होते. गो-सेवाश्रम परिसरातच त्यांचे अंतीम वास्तव्य होते. याच अवस्थेत नरहरपंतांचे शारदी पौर्णिमेच्या दिवशी दिनांक २९ ऑक्टोबर १९४७ रोजी निधन झाले. तेव्हा विनोबाजी आपल्या आश्रमवासियांसह धुळे येथे आले होते. आपल्या वडिलांवर धुळेकरांच्या उपस्थितीत याच परिसरात अंत्यविधी पार पडला. त्यांची स्मृति-समाधी तुळशीवृंदावन स्वरुपात आजही आपणास पहावयास मिळते. त्यांच्या समाधीवरिल कोनशिलावर ''योग तत्पर राहूनि दोष जाळित जाळित अनेक जन्मी संपूर्ण होऊनि मोक्ष गाठतो !'' अशा काव्यपंक्ति कोरलेल्या आहेत. तर बाजुलाच शिवाजीराव नरहर भावे यांची समाधी आहे. त्यांचे तर दिर्घकाळ वास्तव्य याच परिसरात राहिले आहे. शिवाजीरावांच्या समाधीवरील कोनशिलेवर ''सर्वत्र: सुखिन: सन्तु सर्वे सन्तु निरामय:, सर्वे भद्राणि पश्यन्तु मा काश्चेत दु:खमाप्नयात् !'' अशा काव्यपंक्ती कोरलेल्या आहेत.

केसरबाईंनी पुत्रप्राप्तीकरिता रामेश्वर या तीर्थास नवस केला असल्याने आपल्या पुत्रास रामेश्वर असे नाव दिले. अवघ्या ५ व्या वर्षीच रामेश्वराचे मातृछत्र हरपले. पुढे जुलै १९१९ मध्ये त्यांचा भडगाव (जि.जळगाव) येथील गंगुबाईंशी विवाह लावून देण्यात आला. रामेश्वरजी आणि गंगुबाई या पोद्दार दाम्पत्याचे खानदेश गो-सेवाश्रम येथेच वास्तव्य होते.

**देशभक्त व स्वा. सेनानींचे आदरतिथ्य :**

रामेश्वरजी हे म. गांधी, विनोबाजी भावे, जमनालालजी बजाज यांचे एकनिष्ठ भक्त होते. रामेश्वरजींच्या धर्मपत्नी गंगुताई तर जमनालालजी, बापूजी आणि विनोबाजी यांच्या परिचयातील सर्वांनाच आपलं मानीत. मोठ्या आनंदाने आणि उत्स्फुर्तपणे अतिथी सेवेत त्या तन्मय असत. विनोबाजींचे बंधु शिवाजी नरहर पंत यांचे तर मातृत्वाच्या भावनेने आश्रय देवून संगोपन केले. अनेक देशभक्त व स्वा. सेनानी भुमिगत अवस्थेत येथे येवून जात. त्यांना रामेश्वरजी व गंगुताई पोद्दार यांच्या अतिथ्याचा लाभ होत असे. जयप्रकाशजी, प्रभावतीदेवी, पं. जवाहरलाल नेहरु, गुलझारीलाल नंदा, काकासाहेब कालेलकर, स्वामी रामानंद तीर्थ, स्वामी आनंद, ढेबरभाई आदी मान्यवरांनी या पोद्दार दाम्पत्यांच्या घराला भेटी दिल्या आहेत. सरहद्द गांधी अब्दुल गफारखान तर सन १९३६ मध्ये एक आठवडाभर रामेश्वरजींकडे थांबले होते.

**अठरा तोळ्याचा सुवर्णालंकार राष्ट्राला समर्पित :**

रामेश्वरजी आणि गंगुताई यांनी देशभक्त, स्वा. सेनानी यांना आश्रय देण्याबरोबरच स्वत:ही स्वातंत्र्य आंदोलनात सहभाग नोंदविला होता. सन १९३२ मध्ये विनोबाजींसह अनेक नेते धुळे येथील कारागृहात होते. त्यात रामेश्वरजींचाही समावेश होता. गंगुताईसुद्धा याच सुमारास पिकेटिंगच्या सत्याग्रहात सहभागी झाल्या होत्या. म्हणून त्यांनाही दोन महिन्याच्या कारावासाची शिक्षा सुनावण्यात आली होती. अशा योगदानासह गंगुताईंनी राष्ट्राला केलेली आर्थिक मदत तर वैशिष्ट्यपूर्ण बाब होती.

सन १९३४ च्या जुलैमध्ये म. गांधीजी यांचा अखिल भारतीय दौर्यानिमित्ताने पुणे येथे मुक्काम होता. यावेळी महाराष्ट्रभरातून कार्यकर्ते जमले होते. पश्चिम खानदेश जिल्ह्यातून एक हजार एक रुपयाची लोकवर्गणी जमवून प्रतिनिधींनी गांधीजींना सुपूर्द केली होती. याचप्रसंगी गंगुताई पोद्दार यांनी म. गांधीजींकडे आपला अठरा तोळ्याचा करदोडा (सुवर्णालंकार) सुपूर्द केला होता. या सुवर्णालंकाराचा जाहीर लिलाव केला असता सहाशे सतरा रुपये इतकी रक्कम मिळाली होती. याच रकमेतून दलित विद्यार्थ्यांरिता वस्तीगृहाची उभारणी करण्यात आली होती. पोद्दार दाम्पत्यांच्या या सामाजिक ऋणाबद्दल तर महाराष्ट्र आणि विशेषकरुन धुळेवाशियांना विस्मरण होणे शक्य नाही.



विनोबांजींचे वडील कै. नरहरपंत भावे, बंधु कै. शिवाजीराव भावे यांची समाधी स्थळ । कै. रामेश्वर पोद्दार । कस्तुरबा अभ्यास कुटिर । म. गांधी तत्त्वज्ञान मंदिर, धुळे.

**म. गांधी तत्त्वज्ञान मंदिराची उभारणी :**

सन १९४२ मध्ये म. गांधीजींनी ब्रिटिशांना 'चलेजाव'चा इशारा दिला. या चळवळीच्या काळात पुणे येथील येरवडा कारागृहात म. गांधीजींचे स्वीय सचिव आणि स्नेही श्री. महादेवभाई देसाई यांचे १५ ऑगस्ट १९४२ रोजी देहवसान झाले. त्यांचा अंत्यविधी गांधीजींच्या हस्ते राजवाडा परिसरात करण्यात आला. आगाखान पॅलेस येथे कस्तुरबा गांधींजवळच त्यांची समाधी पहावयास मिळते. त्यांची पवित्र रक्षा मिळवून त्यांच्या स्मरणार्थ रामेश्वरजींनी गोशाळा आवारात म. गांधी तत्त्वज्ञान मंदिराची उभारणी केली. या मंदिराची पायाभरणी करतांना महादेवभाईंची रक्षा ठेवण्यात आली आहे.

**कस्तुरबा अभ्यास कुटिराची उभारणी :**

महादेवभाई देसाई प्रमाणेच कस्तुरबाजी गांधी यांचेही देहवसान येरवडा कारागृह, पुणे येथे २२ फेब्रुवारी १९४४ रोजी झाले. त्यांच्या स्मरणार्थ म. गांधीतत्त्वज्ञान मंदिराच्या पूर्वेस समोरच कस्तुरबा अभ्यास कुटिराचे बांधकाम करण्यात आले. याच वास्तुमध्ये खानदेश गांधी बाळुभाई मेहता यांचे अनेक वर्षाचे वास्तव्य होते.

**रामेश्वरजींसोबत पत्राचार :**

रामेश्वरजी हे म. गांधीजी, विनोबाजी यांचे परम् भक्त होते. त्यांच्या कार्याची महती म. गांधीजी, विनोबा यांच्या बरोबरच जमनालालजी, डॉ. राजेंद्रबाबू प्रसाद, मोरारजीभाई देसाइ, गुलझारीलाल नंदा यासारख्या मान्यवरांनाही ज्ञात होती. म्हणून त्यांच्याशी रामेश्वरजींचा पत्राचार होत असे. ''विनोबांजींवर निष्ठा ठेवा आणि निश्चिंत व्हा.'' असे शंकरराव देव यांनी रामेश्वरजींना कळविले असल्याचे पत्र विनोबाजींना पाठविले होते.

तसेच म. गांधींनी साबरमतीच्या आश्रमातून रामेश्वरजींना पत्र पाठवून ''रामनाम'' उच्चारणाचा अर्थ आणि महत्त्व समजावून सांगितले आहे. दुसर्या एका पत्रात विनोबाजींच्या वडिलांच्या निधनाचा संदेश कळविला आहे.

वर्धा आश्रमातून विनोबाजी कळवितात की, 'हरीच्या चरणी विश्वास ठेवावा, तो कसा लाभेल याची चिंता करण्याचे कारण नाही.' असे कळविले आहे. 'श्रद्धापूर्वक आचरण हे आपले कर्तव्य आहे. फळ ईश्वराधीन आहे. श्रद्धा सोडू नये.', 'नवीन नियम करु नये, जुने सोडू नये' अशी मार्गदर्शनपर पत्रे विनोबांनी रामेश्वरजींना पाठविली आहेत.

राष्ट्रपति भवन, दिल्ली येथून मा. राष्ट्रपती राजेंद्रबाबूंनीही प्रकृतिची काळजी घेण्याविषयी सूचविले आहे. दि. १२/१०/१९६१ च्या पत्रातून अर्थमंत्री मोरराजीभाई यांनीही स्वातंत्र्योत्तर वाटचालीविषयी रामेश्वरजींना कळविले आहे. दिनांक २९/१०/१९६६ रोजीच्या गृहमंत्री गुलझारीलाल नंदा यांनीही गोहत्या प्रतिबंधाविषयी प्रयत्नशील असल्याचे कळविले आहे.रामेश्वरजींच्या या पत्रप्रपंचावरुन स्वातंत्र्यपूर्व आणि स्वातंत्र्योत्तर काळातील देशाच्या वाटचालीत ते किती कार्यप्रवण होते याचा प्रत्यय येतो.

**अंधत्वावर मात करित श्रवण जिद्द जोपासली :**

देशाच्या सामाजिक आणि राजकीय वाटचालीत योगदान देणार्या रामेश्वरजींना उतारवयात साधारणत: १५ वर्षांच्या काळात अंधत्वाला सामोरे जावे लागले. असे असले तरी त्यांचे श्रवणकार्य खंडीत झाले नाही. निराश न होता आपल्या सहकार्याकडून वाचन करुन श्रवणाचे कार्य चालू ठेवले होते. या कार्यात नैसर्गिक चिकित्सक श्री. डॉ. वर्मा हे त्यांचे मदतनीस बनले होते. नवयुवकांकडून पत्रे, पत्रिकांचे वाचन करुन घेत, रेडीओ ऐकत यामुळे त्यांची अभ्यासुवृत्ती शेवटपर्यंत जोपासली गेली. अशाच वाटचालीत ७ फेब्रुवारी १९८० रोजी त्यांची प्राणज्योत मालवली. थोर देशभक्त, स्वा. सेनानी रामेश्वरजी पोद्दार यांना पुण्यतिथी दिनानिमित्त आदरांजली !

## सुजाण पालक



डॉ.अभिनय दरवडे
मो.७५८८१०४००७

# एक ग्लास दूध पितो आमचा चिंटू!



दूध हे आरोग्यासाठी आवश्यक पोषणमूल्यांनी भरलेले असते. अगदी अबालवृद्धांपर्यंत सर्वांना दूध पिण्याचा सल्ला दिला जातो. घराघरात लहानग्यांच्या मागे दुधाचा ग्लास घेऊन पळणारी आई हे चित्र सर्वत्र दिसतं! आपल्या बाळाला पोषण मूल्य मिळावीत यासाठी प्रत्येक आई झटत असते! दूध दुपत्यांचा देश सुजलाम सुफलाम मानला जातो! भारत दूध उत्पादनात जगात अग्रणी आहे, जागतिक उत्पादनाच्या सुमारे २४% योगदान देत आहे.

२०२२-२३ मध्ये, भारताचे दूध उत्पादन २३०.५८ दशलक्ष टनांपर्यंत पोहोचले! एकूणच, भारताचा दुग्धव्यवसाय राष्ट्रीय अर्थव्यवस्थेत ५% योगदान देतो आणि ८ कोटींहून अधिक शेतकऱ्यांना थेट रोजगार प्रदान करतो. आपल्या देशात मिळणाऱ्या दुधापैकी जवळपास ४० टक्के दूध हे सहकार व खासगी दूध संस्थांमार्फत संकलित केले जाते, उर्वरित ६० टक्के दूध हे असंघटित क्षेत्रामार्फत संकलित होते. ७० टक्के दूध हे थेट दूध म्हणून वापरले जाते आणि उर्वरित ३० टक्के दूध हे दुग्धजन्य पदार्थांच्या स्वरूपामध्ये मिठाई, खवा, पनीर, तूप, लस्सी म्हणून वापरले जाते. पण दुधाची हीच गरज आणि उपयुक्तता पाहून काही लोक काही नफ्यासाठी दुधात भेसळ करतात आणि लोकांच्या जीवाशी खेळतात. दुधातील भेसळ आरोग्यासाठी अत्यंत घातक असते. म्हणून दूध खरेदी करताना सावधगिरी बाळगणे आवश्यक आहे. महाराष्ट्रात वितरीत होणाऱ्या ६५ टक्के दुधात भेसळ होते हा खुद्द अन्न सुरक्षा प्राधिकरणाचाच अहवाल आहे.

या अहवालानुसार राज्यात दररोज वितरित होणाऱ्या दोन कोटी लिटर पैकी जवळपास सव्वा कोटी लिटर दूध भेसळयुक्त असते. असं अहवाल सांगतो! विधानसभेत सुद्धा यावर चर्चा झाली आहे, आणि या प्रश्नाची गंभीर दखल घेतली आहे धक्कादायक म्हणजे पॅक बंद पिशवीतील नामांकित दूध कंपन्यांच्या पिशव्यांमध्ये सुद्धा भेसळ आढळली आहे. या पिशव्या ब्लेडने कापून किंवा त्यात इंजेक्शन सोडून ,भेसळ करून त्या पुन्हा सीलबंद करण्यात आल्याचं आढळून आलं आहे. त्यामुळे तुम्ही तुमच्या घरात आणलेलं दूध भेसळयुक्त तर नाही ना? याची खात्री करून घेणे गरजेचं आहे! पण त्याआधी दुधात नेमकी कशाकशाची भेसळ होते ते पाहुयात.

दुधात कशाची भेसळ होते?

दुधात पाणी घालण्यासोबतच १० पेक्षा जास्त वेगवेगळ्या गोष्टी मिसळून सिंथेटिक दूध तयार केलं जातं. तज्ज्ञांच्या मते, पाण्यात दूध पावडर मिसळूनही बनावट दूध तयार केले जाते, ज्यामध्ये लोणी नसते. स्निग्धता दिसून येण्यासाठी रिफाइंड तेल आणि शॅम्पूचा वापर केला जातो. दूध पांढरे दिसण्यासाठी वॉशिंग पावडर आणि पांढरा रंग (सफेडा) मिसळला जातो. दुधात गोडवा आणण्यासाठी ग्लुकोज टाकले जाते. दुधात होणारी भेसळ हा सरकार आणि दुग्ध उद्योग या दोघांसाठी चिंतेचा विषय बनला आहे. इंडियन कौन्सिल ऑफ मेडिकल रिसर्चने (खउचठ) असा अहवाल दिला आहे की दुधात भेसळ केल्यामुळे आरोग्यावर घातक परिणाम होतात. दुधातील डिटर्जंटमुळे अन्न विषबाधा आणि इतर जठरोगविषयक गुंतागुंत होऊ शकते. त्याची उच्च अल्कधर्मी पातळी शरीराच्या ऊतींना देखील नुकसान करू शकते आणि प्रथिने नष्ट करू शकते. इतर कृत्रिम घटकांमुळे अशक्तपणा, हृदय समस्या, कर्करोग किंवा मृत्यू देखील होऊ शकतो. युरिया, कॉस्टिक सोडा आणि फॉर्मेलिनची भेसळ असलेले दूध पिण्याचे तात्काळ परिणाम (गॅस्ट्रोएन्टेरायटिस) डायरिया, आतड्याला सूज असले तरी दीर्घकालीन परिणाम अधिक गंभीर असतात. दूषित दूध आणि दुग्धजन्य पदार्थांच्या सेवनामुळे होणारे काही आजार पुढीलप्रमाणे आहेत:

१ दुधातील रोगजंतूंमुळे होणारे आजार: ब्रुसेलोसिस - ब्रुसेला नावाच्या जीवाणूमुळे होतो. ताप, अंगदुखी, अशक्तपणा येतो. ट्युबरक्युलोसिस (ढइ) - अनपाश्चरायझ्ड (कच्चे) दूध प्यायल्यास क्षयरोगाच्या जीवाणूंचा संसर्ग होऊ शकतो. साल्मोनेलोसिस - साल्मोनेला जीवाणूमुळे होतो. उलटी, जुलाब, ताप येतो. लिस्टेरियोसिस - लिस्टेरिया मोनोसाइटोजेन्स जीवाणूमुळे होतो. विशेषतः गर्भवती महिलांसाठी धोकादायक असतो.

२ दुधाच्या भेसळीमुळे होणारे आजार: हायड्रोजन पेरॉक्साइड, फॉर्मालिन, डिटर्जंट यांसारखी रसायने मिसळलेले दूध प्यायल्यास पचनतंत्रावर वाईट परिणाम होतो. यूरिया मिसळलेले दूध मूत्रपिंडांसाठी हानिकारक ठरते. स्टार्च व कृत्रिम गोडसर पदार्थ मिसळलेले दूध मधुमेह आणि जठराच्या समस्यांना कारणीभूत ठरू शकते.

३. दुग्धजन्य पदार्थांमुळे होणारे आजार: लॅक्टोज इन्टॉलरन्स - काही लोकांना दुधातील लॅक्टोज पचवता येत नाही. त्यामुळे गॅस, पोटदुखी, जुलाब होतात. ऍलर्जी - दुधातील केसीन आणि व्हे प्रोटीन मुळे काही लोकांना त्वचेवर पुरळ, श्वास घेण्यास त्रास, ऍनाफीलॅक्सिस होऊ शकतो. फूड पॉइझनिंग - खराब झालेले किंवा दूषित दूध आणि दूधजन्य पदार्थ सेवन केल्याने उलटी, जुलाब, ताप येतो.

४. दूध आणि हृदयरोग: चरबीयुक्त दूध जास्त प्रमाणात घेतल्यास कोलेस्टेरॉल वाढून हृदयरोगाचा धोका वाढतो.

दुधामध्ये होणाऱ्या भेसळीचे प्रकार


१. पाणी: हे सर्वात सामान्य प्रकार आहे, ज्यामुळे दुधातील पोषणमूल्ये कमी होतात. २. स्टार्च: यामुळे दूध घट्ट वाटते, पण पचनाच्या समस्या होऊ शकतात. ३. डिटर्जंट किंवा साबण: यामुळे दूध फेसाळते आणि पांढऱ्या रंगाचे दिसते, पण याचे सेवन केल्यास आरोग्यास धोका निर्माण होतो. ४. युरिया: हे दूध जास्त काळ टिकण्यासाठी मिसळले जाते, परंतु हे शरीरासाठी विषारी ठरू शकते. किडण्यांवर गंभीर परिणाम होऊ शकतात! ५. सिंथेटिक दूध: हे कृत्रिम रसायन, तेल आणि डिटर्जंट यांपासून (पान ६ वर)




## राशी भविष्य



सुमेध रानडे, पुणे
मो.९५६१०९३७४०




**मेष:** हा सप्ताह तुमच्यासाठी आर्थिक सक्षमता घेऊन येत आहे. आर्थिक कामे अडकलेली असतील तर ती आता मार्गी लागतील. आहात त्यापेक्षा चांगल्या परिस्थितीत पोचाल. एखाद्या गुंतवणुकीतून फायदा होऊ शकतो. अडकलेले पैसे मिळू शकतात. नोकरी व्यवसायामध्ये चांगले यश संभवते. आरोग्या सुधारेल. या आठवड्यात एखाद्या तज्ञ व्यक्तीचा सल्ला घेऊन मग आर्थिक निर्णय घ्या. एखाद्या अनुभवी व्यक्तीचं मार्गदर्शन खूप उपयोगी पडेल. इतरांसाठी आधार बना. स्वार्थापलीकडे जाऊन लोकसेवा करा.

**वृषभ:** हा सप्ताह तुमच्यासाठी महत्त्वाचे बदल घेऊन येत आहे. जर आत्ता तुम्ही निराश असाल तर या आठवड्यात ही परिस्थिती नक्कीच सुधारणार आहे. तुमच्या हाताबाहेर असलेल्या गोष्टी किंवा माणसं अनुकूल होतील. काही गोष्टींना गती मिळेल, योग्य दिशा मिळेल. अडकलेले काम सुटेल. नशिबाची चांगली साथ मिळेल. या आठवड्यात तुम्ही प्रामाणिक कष्ट करण्याची गरज आहे. आत्ता तुम्ही आनंद उपभोगत असाल तर हीच वेळ आहे दुसऱ्याला मदत करण्याची. निसर्गचक्र लक्षात ठेवा. तुम्ही चांगल्या परिस्थितीत असाल तर त्याचा अभिमान न ठेवता सत्कर्म करा आणि कोणाला दुखवू नका.

**मिथुन:** हा सप्ताह तुमच्यासाठी एका महत्त्वाच्या कलाटणीचा असणार आहे. तुमच्या मनाप्रमाणे नसलेले बदल घडतील आणि तुम्हाला शरणागती पत्करावी लागेल. अपेक्षित ध्येय गाठण्यात अजून वेळ आणि कष्ट लागतील. पण असं असूनही घाबरु नका, हे बदल सुधारणा करण्यासाठी गरजेचे आहेत. बदल हा निसर्गाचा नियम आहे हे विसरू नका! या आठवड्यात तुम्ही स्वतःचा अहंकार आणि मोठेपणा बाजूला ठेवून वागण्याची गरज आहे. आलेल्या परिस्थितीशी झगडायला जाऊ नका, शांतपणे स्वीकार करा!

**कर्क:** हा सप्ताह तुमच्यासाठी आर्थिक मुबलकता घेऊन येत आहे. तुम्ही वस्तू, पैसे, लोक, कौशल्य यांनी युक्त असाल. वरिष्ठांचे सहकार्य मिळेल. आर्थिक दृष्ट्या सक्षम व्हाल. घराबाबत किंवा जमिनीबाबत चांगली घटना घडेल. या आठवड्यात तुम्हाला तुमच्या खर्चावर नियंत्रण ठेवणे गरजेचे आहे. आर्थिक नियोजन नीट करा. कुठे आर्थिक गुंतवणूक करायची असेल तर करू शकता. लोकांना मदत करा. सगळ्यांचा सांभाळ करा. व्यावहारिक वागा, पण तुटक वागू नका. दानधर्म करा. गृहलक्ष्मीला प्रसन्न ठेवा!

**सिंह:** हा सप्ताह तुमच्यासाठी एकाच वेळी खूप पर्याय घेऊन येणार आहे. निरनिराळ्या गोष्टींमुळे निर्णय घ्यायला अवघड जाईल. मल्टी टास्किंग करावं लागेल. पण यांपैकी कोणतीही गोष्ट हवी तशी पुढे सरकणार नाही. एकूण थोडी तारांबळ उडण्याची शक्यता आहे. हवे ते साध्य होण्यासाठी अजून वेळ लागेल. या आठवड्यात तुम्ही बऱ्याच गोष्टींमधून एक दोन अत्यंत महत्त्वाच्या गोष्टींवर लक्ष केंद्रित करा. खूप काही करायला जाऊ नका, फसवणूक संभवते. वरवर आकर्षक वाटणाऱ्या कुठल्याही गोष्टीला भुलू नका. स्वप्नरंजन करत बसू नका!

**कन्या:** हा सप्ताह तुमच्यासाठी सोबतीने पुढे वाढण्याचा असणार आहे. कामाच्या ठिकाणी सहकाऱ्यांचे चांगले सहकार्य मिळेल. घरामध्ये जोडीदाराकडून अपेक्षित किंवा त्यापेक्षा जास्त प्रमाणात साहचर्य मिळेल. दुरावलेली नाती पुन्हा जवळ येतील. प्रेम आणि नात्यांच्या बाबतीत आनंददायी घटना घडेल. साथ संगतीमुळे अवघड मार्ग सोपा होईल! या आठवड्यात तुम्हाला एकटे राहण्यापेक्षा इतरांच्या सोबत राहणे जास्त फायद्याचे ठरणार आहे. एखाद्या कलेतून आनंद मिळवा. बुध्दीचा तर्क बाजूला ठेवून भावना समजून घ्या.




> टॅरो कार्डनुसार हा आठवडा मेष, वृषभ, कर्क, कन्या, तूळ, मकर यांना हिरवा झेंडा दाखवणारा, सिंह, वृश्चिक, धनू, कुंभ यांना पिवळा सिग्नल दाखवणारा आणि मिथुन आणि मीन यांना मात्र लाल चिन्ह दाखवणारा! सविस्तर मार्गदर्शन पुढे वाचा..

**तूळ:** हा सप्ताह तुमच्यासाठी थोडा विरंगुळा मिळण्याचा असणार आहे. तुम्ही पूर्वी श्रम केले आहेत, आता या आठवड्यात तुम्हाला त्याचे चांगले परिणाम बघायला मिळतील. तुम्ही आत्मपरीक्षण करू शकाल आणि काही महत्त्वाच्या गोष्टींचा विचार करू शकता. तुम्ही भौतिक सुखात आरामात असाल. या आठवड्यात तुम्ही काळजी सोडून आनंद घेण्याची गरज आहे. हा वेळ स्वतः मधे सुधारणा करण्यासाठी वापरा. जरी तुमच्याकडे चांगली संपन्नता असली तरी वस्तूंचा अतिरेक वापर करू नका. गरजेपुरताच वापर करा. कसलाही दिखावेपणा करू नका!

**वृश्चिक:** हा सप्ताह तुमच्यासाठी कष्ट करण्याचा आहे. कुठलीतरी आवडीची घटना घडायला किंवा केलेल्या प्रयत्नांना यश मिळायला वेळ लागेल. वाट पहावी लागेल. संयम आणि धैर्याचा कस लागेल. काहीतरी कमतरता जाणवेल. थांबून रहावं लागेल, इतरांवर अवलंबून राहावं लागेल. या आठवड्यात तुम्ही शांतपणे परिस्थितीचा सामना करण्याची गरज आहे. तडकाफडकी कोणतेही निर्णय घेऊ नका. खूप कष्ट करा. फळ मिळेल हे निश्चित पण विलंब होईल. आर्थिक गुंतवणूक खात्रीशीर ठिकाणी करू शकता.

**धनू:** हा सप्ताह तुमच्यासाठी मध्यांतराचा आहे. खूप कष्ट करुन, बरेच अडथळे ओलांडून तुम्ही एका टप्प्यावर येऊन पोचल्याने आता तुम्हाला थोडा वेळ तरी आरामाची गरज वाटणार आहे. कामे संथपणे होतील. अपेक्षित उत्तरं, अपेक्षित प्रतिसाद मिळणार नाही. एका जागी थांबून रहाल. पण चुकीचे वळण घेण्यापेक्षा आहे तिथे थांबणे योग्य असते! या आठवड्यात तुम्हाला काही प्रमाणात विश्रांती घेण्याची गरज आहे. धावाधाव थांबवा. जमेल तेवढंच काम करा, दडपण घेऊ नका. अतिविचार टाळा. प्रकृतीकडे लक्ष द्या.

**मकर:** हा सप्ताह तुमच्यासाठी इच्छापूर्तीचा असणार आहे! एखाद्या कामाचा मोबदला चांगला मिळेल. एखादी अपेक्षित घटना घडेल. मागच्या दुःखावर सुखाची फुंकर घालणारा हा काळ आहे. नातेसंबंधांमध्ये सुधारणा होईल. कलेला प्रोत्साहन मिळेल. या आठवड्यात तुमच्याकडून कळत नकळत स्वार्थी वागणूक होऊ शकते त्यामुळे ते लक्षपूर्वक टाळा. कुटुंबामध्ये एकोप्याने वागा. तुम्हाला आवडत असणाऱ्या गोष्टीसाठी वेळ काढा. कुठल्या नात्यात वितुष्ट आलं असेल तर ते दूर करण्याचा प्रामाणिक प्रयत्न करा!

**कुंभ:** हा सप्ताह तुमच्यासाठी काही प्रमाणात मागे येण्याचा असणार आहे. एक प्रकारे माघार घ्यावी लागेल. तुम्हाला हवे तसे घडणार नाही. अपेक्षित यश मिळण्यात काहीतरी कमतरता राहील. तडजोड करावी लागेल. पण हे करत असताना कोणाची तरी चांगली साथ मिळू शकते. प्रयत्न करुन प्रगती होईल. प्रवास घडू शकतो. या आठवड्यात तुम्हाला शांतपणे काम करण्याची गरज आहे. तुम्हाला तुमच्या शब्दांवर नियंत्रण ठेवण्याची गरज आहे. मध्यम मार्ग निवडा. थोडा वेळ शांत बसून आत्मचिंतन करा!

**मीन:** हा सप्ताह तुमच्यासाठी तडजोडी करण्याचा आहे. अपेक्षित यश मिळवणे कठीण आहे. बरेच कष्ट करावे लागतील. कसलीतरी कमतरता जाणवेल. लोकांवर अवलंबून राहावं लागेल. इतरांकडून हीन वागणूक मिळू शकते. पण या सगळ्यातूनच आजची रात्र ही उद्याच्या पहाटेची चाहूल घेऊन येते याचा अनुभव तुम्हाला येईल. या आठवड्यात तुम्ही स्वतः संयम ठेवण्याची गरज आहे. गरजा कमी करा. सध्या मोठी गुंतवणूक किंवा महत्त्वाचे व्यवहार टाळा. परोपकार करण्याचा प्रयत्न करा. गरिबांना मदत करा. आरोग्य सांभाळा!

## शौर्योद्गारांचा इतिहास

संजय धनगर
मो.९६३७३२५१६०

# जय जवान जय किसान..!

'जय जवान, जय किसान' हे नारा स्वतंत्र भारताचे दुसरे पंतप्रधान ' मूर्ती लहान, पण कीर्ती महान !' असलेल्या लालबहादूर शास्त्री यांनी दिला होता. स्वतंत्र



भारताचे पहिले पंतप्रधान पंडित नेहरू यांच्या आकस्मित निधनानंतर भारताच्या राज्यव्यवस्थेत एक भयंकर पोकळी निर्माण झाली होती. ती भरून काढणे कुणाच्याच हाती नसले तरी, राज्यकारभाराचा गाडा नीट चालवून भारताची प्रतिष्ठा टिकवून ठेवणे, ही एक काळाची गरज होतीच..! म्हणून नेहरूजीनंतर भारताचा मुख्य नेता कोण ? हा भूतकाळातील चर्चेचा विषय संपवून पंतप्रधान म्हणून लालबहादूर शास्त्री यांची निवड झाली होती. शास्त्रीजींनी केलेली जबाबदारीची कामे त्यांच्या कार्याची साक्ष देत होती. परंतु त्यांचा मृदू स्वभाव, शांतवृत्ती, समजूतदारपणा यापुढे तसाच राहिला तर भारताला अनेक संकटांना तोंड द्यावे लागेल अशी शंका काही धूर्त विचारवंतांना अस्वस्थ करत होती.

मऊ मेणाहुनी मृदू 'लाल' ही वृत्ती शास्त्रीजींच्या अंत:करणात असली तरी 'माझी नम्रता ही माझी दुर्बलता समजू नये' हे त्यांनी पुढे दाखवून दिले. कठोरप्रसंगी त्यांच्या नम्रतेचा स्फोट कधी होईल याची अनेकांना कल्पना नव्हती..! पण पंतप्रधानपदाची जबाबदारी स्वीकारल्यानंतर त्यांनीही त्यांच्या वृत्तीत कठोर वृत्ती दाखवली. शेजारच्या राष्ट्रांशी ऐक्य ठेवले तरच आपला देश अधिक निश्चिंत राहील यासाठी अनेक राष्ट्रप्रमुखांशी विचारविनिमय करून राष्ट्राराष्ट्रांत मित्रता वाढविली.

भारताचा शेजारी आणि प्रबळ शत्रू पाकिस्तान..! भारतावर चढाई करण्याचा विचारात असताना अनेक धुमशान, कुरघोडी दिसत होती. काश्मीर भागात पाकने हळूहळू छोटी आक्रमणे सुरू केली. पाक काश्मीरवर हल्ले करू लागले ...! हे युद्ध म्हणजे भारताच्या सामर्थ्याला व प्रतिष्ठेला आव्हानच होते. त्यासाठी भारताने सर्व सामर्थ्यांनिशी पावले उचलली व मोठ्या जिद्दीने या आक्रमणाला पुरेपूर धूळ चारली. त्याच काळात आपल्या देशात अन्नधान्याची टंचाई निर्माण झाली होती. देशातील अन्नधान्याच्या पूर्ततेसाठी अमेरिकेकडून गहू आयात केला जात होता. अमेरिकेकडून गहू आयात करत असतानाच भारतावर दबाव टाकण्याच्या हेतूने 'भारताने सैन्य मागे घ्यावे नाहीतर भविष्यात आम्ही तुमच्या देशाला होत असलेल्या गहू निर्यातीवर बंदी आणू.' असे पाकधार्जिण्या अमेरिकेने भारताला धमकावले. त्यावेळी शास्त्रीजी म्हणाले, उद्यापासून नाही तर आजपासूनच गहूबंदी करा. आम्ही तुमच्या धमकीला भीक घालत नाही. असे अमेरिकेला खडसावून सांगून देशवासीयांना आठवड्यातून एक दिवस उपवास करण्याचे आवाहन केले, एवढेच नव्हे तर या घोषणेची सुरुवात स्वत:च्या घरापासून केली. असा धाडसी निर्णय घेऊन देशाचे रक्षण आमचे जवान करतील तर देशाचे पोषण किसान करतील. जवानांच्या पराक्रमाला किसानांच्या श्रमाची जोड मिळावयास हवी. देशाच्या सीमा जवानांनी सांभाळाव्यात आणि
देशातील जमिनी किसानांनी पिकवाव्यात. जवानांनी देशवासीयांच्या प्राण वाचवावेत तर किसानांनी देशवासीयांना जिवंत ठेवावे. तोफा नि बंदुकांइतकेच आपल्या देशात नांगराचे महत्त्व आहे. म्हणूनच जवान आणि किसान हे खऱ्या अर्थाने मातृभूमीचे रक्षक आहेत. १९६५ मध्ये उरवा, प्रयागराज येथे एका सार्वजनिक मेळाव्यात जय जवान..! जय किसान..! चा नारा देत सैनिकांना भारताच्या रक्षणासाठी उत्तेजित केले आणि त्याचबरोबर अन्नधान्य आयातीवरील अवलंबीत्व कमी करण्यासाठी अन्नधान्याचे उत्पादन वाढविण्यासाठी सर्वतोपरी प्रयत्न करण्यासाठी शेतकऱ्यांना प्रोत्साहित केले म्हणून ही एक अतिशय लोकप्रिय घोषणा बनली. देशातील शेतकऱ्यांना अधिकाधिक धान्य पिकविण्याची प्रेरणा कदाचित शास्त्रीजींच्या याच ना-यातून मिळाली असावी. तसेच भारतीयांमध्ये देशभक्ती आणि राष्ट्रीय एकतेच्या भावनेला प्रबळ केले ते आजपर्यंत!



# भिक्षा

थंडीचा कडाका वाढला होता . ऐवढया पहाटेही भिक्षुकांची रिघ मंदिराबाहेर येऊन बसत असे .सुरेशचा मंदिरात जाण्याचा दिनक्रम . रोज एखाद्या भिक्षुकासोबत बोलण व्हायच . सर्वजण वयस्क अनाथ असेच होते . अन्नदान करणे सुरेशला मान्य होते तर कधी कपडेही देई . एक दिवस थंडीचा कडाका पाहून सुरेशने भिक्षुकांना कपडे ,कोणाला चादर दान केले .

नेहमीप्रमाणे ऑफिसला गेला . आज ऑफिसमध्ये त्याच्या डोक्यात एकच विचार होता उद्या भिक्षुक मी दिलेले कपडे घालून येतील . किती छान दिसतील . त्यांचे थंडीपासून संरक्षण होईल . या विचारातच त्याचा पूर्ण दिवस अगदी आनंदात गेला . समोर येणारे प्रत्येक कामही खूप उत्स्फूर्तपणे पूर्ण केलं . घरी गेल्यावर त्याने ही गोष्ट बायकोलाही बोलून दाखवली . ती म्हणाली ,मी पण येते उद्या मंदिरात . सकाळच्या काकड आरतीचे नियोजन करून रात्री ते झोपी गेले ...........

...... पहाटे उठून मंदिरात पोहचला . त्याला मंदिरातील देवापेक्षा बाहेर बसलेल्या भिक्षुकांनाच पहायच होते . पत्नी मंदिरात दर्शन रांगेकडे गेली . सुरेश बाहेरच उभा राहिला . लांबूनच पाहिले एक दोनच भिक्षुक दिलेले कपडे घालून आले होते . बाकी आहे त्याच अवस्थेत आलेले होते . भ्रमनिराशा झाली . त्याला खूप वाईट वाटलं . तेवढ्यात टाळांच्या गरजातही एका बाजूला मंदिर झाडण्याचा आवाज आला .त्याने तिकडे पाहिले एक मुलगा आठ - नऊ वर्षाचा मंदिर साफ करत होता . आज त्यांने मोर्चा त्या मुलाकडे वळवला . मुलाशी बोलणं झाल्यावर समजलं त्याचे आई-वडील महामारीमध्ये गेले . तेव्हापासून तो मंदिराची साफसफाई करून मिळेल ते अन्न खाऊन पोट भरत होता . त्याचे शालेय शिक्षण थांबले होते .

पत्नीने दर्शनाला बोलवले .दर्शन घेऊन घरी आला . ऑफिसला आला पण त्याचे चित्त कामावर मुळीच नव्हते . तो चिमुकला मंदिर साफ करणारा सारखा नजरेसमोर येत होता .कधी ऑफिस संपतय आणि घरी जातो असे त्याला झाले होते . घरी जाता -जाताच त्यांन एक छानसे दप्तर , काही वह्या , पुस्तके शैक्षणिक साहित्य घेतल .मंदिराजवळच एक शाळा होती . त्या शाळेतल्या मुख्याध्यापकांना जाऊन भेटला . त्याचे नाव अक्षय आहे .आई -वडील गेल्यापासून तो खूप एकटा झाला आहे . त्याचे अभ्यासात लक्ष लागत नाही .त्याचे चुलते त्याला शाळेत येऊ देत नाही .तेही भिक्षेकरू आहेत .अक्षयचे आई वडील मोलमजुरी करून कष्ट करून संसार करत होते . तो स्वाभिमानी आहे . अक्षय आई वडील गेल्यापासून शाळेतच येत नाही . अशी तक्रार मुख्याध्यापकांनी केली . तेव्हा खर काय ते सुरेशला समजले .

दुसऱ्या दिवशी सुरेशने अक्षयला जवळ बोलावले .घाबरतच सुरेशकडे आला . तुला शाळेत जायला आवडतं का .शाळेत का जात नाहीस ? शाळेचे नाव ऐकतात अक्षय ओक्साबोक्सी रडू लागला . माझे काका मला शाळेत पाठवत नाहीत . भीक्षा मागायला बसवतात .मला भिक्षा मागायला आवडत नाही . मी मंदिराची सफाई करतो . जे लोक देतील ते घेतो आणि काकांच्या स्वाधीन करतो . मला हे अजिबात आवडत नाही . काय करू आई बाबा गेल्यापासून मी काहीही करू शकत नाही मला माझे मित्र शाळेत चल म्हणतात पण त्या मित्रांचीही बोलू देत नाहीत .

सुरेशने त्याच बोलणं थांबवत तुझे काका कुठे आहेत मला दाखवा तो नको म्हणाला तरीही त्याच्या हाताला धरून काकांकडे नेले .ते रांगेतच बसले होते .त्यांनाही सुरेशने परवा कपडे दिले होते . ते कपडे न घालता फाटकेच कपडे घालून बसले होते . त्यांनी काकांना बोलावले .समजून सांगितले अक्षयची मी जबाबदारी घेत आहे . त्याला शाळेत पाठवायच आहे .जर त्याला इथे भीक्षा मागायला बसवलं तर मी तुमची तक्रार पोलिसात करेल . असं सांगितल्यावर काका घाबरले हाता - पाया पडू लागले .नाही - नाही आम्ही त्याला त्रास देणार नाही .आजपासून त्याला शाळेत पाठवतो असे कबूल झाले . सुरेशने शाळेचे दप्तर अक्षयला दिले .त्या दप्तराला अक्षय कितीवेळ कवटाळून बसला . त्याचा आनंद गगनात मावत नव्हता . त्याला देव भेटल्यासारखं झालं होतं .सुरेशच्या पाया पडू लागला . तुम्हीच माझे आजपासून देव आहात असं म्हणू लागला . सुरेशने अक्षयचे डोळे पुसले . एक सर्वसामान्य माणूस आहे देव तर मंदिरात आहे देवानेच मला तुला मदत करण्याची बुद्धी दिली .चल रडू नकोस तुला मी शाळेत पोहोचवतो . अक्षयला
शाळेचा नवीन ड्रेस घेतला . अक्षयने शाळेचा गणवेश अंगावर चढवला . गाडीवर बसवले .अक्षयला शाळेत सोडले . मुख्याध्यापकांची आणि वर्ग शिक्षकांची भेट घेऊन त्याच्यावर जातीने लक्ष ठेवायला सांगायले .आजपासून मी त्याच पालकत्व घेत आहे तसा फॉर्महीभरून दिला . त्याची शाळेची फी भरली . अक्षयला वर्गात बसवून तो बाहेर पडला .आज त्यालाही देवाची सेवा करण्याचे भाग्य मिळालं असं मना पासून वाटत होतं .घरी आल्यावर पत्नीनेही अक्षयची जबाबदारी घेण्याचे कबूल केले आणि यशस्वी पुरुषामागे एक स्त्री असते याची त्याला खात्री पटली.

**- शामला पंडीत, पुणे**

## लेखकांना सूचना

- लेख, कथा, कविता, ललित लिखाण पाठवितांना शब्दमर्यादेचे भान पाळा., तसेच लेखातील सन, तारखा, आकडेवारी, वेळ हे इंग्रजीमधूनच पाठवावे.
- झेरॉक्स केलेल्या कुठल्याही साहित्याची दखल घेतली जाणार नाही.
- पुस्तक-परिचय पाठवितांना मूळ पुस्तक जरूर पाठवावे.
- शक्यतोवर संगणकावर टाईप केलेले साहित्य पाठवावे, अर्थात आपले हस्ताक्षर उत्तम असेल तर स्वहस्ताक्षरातील साहित्य चालेल.
- आपण पाठविलेले साहित्य २ महिन्याच्या आत प्रसिध्द न झाल्यास ते अस्विकृत समजावे, त्यासाठी वेगळा पत्रव्यवहार करु नये.

## हसा ना गडे

दत्ता जोशी
मो.८३२९९२२०२७

# गुलाबी साडी अन्...

त्या दिवशी कुठून मला दुर्बुद्धी सुचली कुणास ठाऊक. मी ऑफिस मधून येतांना सहज एका साडीच्या सेल कडे लक्ष गेलं. छान छान स्वस्त साड्या त्या सेल मध्ये विक्रीला काढलेल्या होत्या. तिथं रेंगाळत असतांना तिथल्या एका पोरीने मला आदराने आत बोलावलं. असा मी बाहेरून कितीही अरसिक अप्रेक्षणीय दिसत असलो तरी कोणी आदराने आणि त्यातल्या त्यात कोणी मुलीने बोलावलं तर मला अजिबात नाही म्हणवत नाही. म्हणजे तसा मी स्वभावाने हळवाच आहे म्हणा ना. लोकं याच्या पूर्ण उलट समजतात मला.तर मी आत गेल्याबरोबर दुकानातल्या बऱ्याच बऱ्या दिसणाऱ्या मुलींनी मला गराडाच घातला. सर, इकडे या ना. नवीन नवीन ड्रेस मटेरियल आलं आहे. एक चुणचुणीत, चंट, गोरीपान आणि सुंदर मुलगी मला म्हणाली. तिचा चेहरा खूपच बोलका, हसरा, डोळे पाणीदार, दात चमकदार आणि हनुवटीवर तीळ होतं. बस बस, इतकंच. तुम्हाला तर माहीतच आहे तसा मी कोणाही मुलीकडे मान वर करून बघत नाही.

तेव्हढ्यात दुसऱ्या मुलीने मला दुसऱ्या बाजूला बोलावलं. ही पण तशीच गोरीपान चुणचुणीत वगैरे होती. ती साड्यांबद्दल सांगत होती.

असं एकटं दुकट असतांना जर अशा पाच सहा मुली सर इकडे या, सर इकडे या असं म्हणायला लागल्या तर किती गांगरायला होतं, माहित आहे का.

त्या दुकानात भले मोठे मोठे आरसे होते त्या मुळे त्या मुलींची संख्या खूपच वाटत होती. एका मुलीने मला हातात एक जाहिरातीचा कागद दिला त्यात पन्नास हजाराची पैठणी दहा हजारात, दहा हजाराचा शालू दोन हजारात, चार हजाराची साडी एक हजारात असे प्रचंड सेल असलेले आयटम लिहिलेले होते.

असं काही घ्यायच्या हेतूने मी तिथं गेलोच नव्हतो. मी सहज रेंगाळत आत गेलो होतो.पण तिथं इतक्या स्वस्त दराच्या साड्या पहिल्या नंतर मला एकदम आठवण झाली की पुढच्या महिन्यात बायकोचा वाढदिवस आहे. सरप्राईज म्हणून एक साडी घेऊन द्यावी तिला. पण लगेच समजलं की आपल्याला साडीतल काहीच कळत नाही.

तेव्हढयात एका मुलीने सरबत आणून दिलं. त्यांच्या आदरातिथ्याने मी भारावून गेलो. पण नम्रपणे त्यांना सांगितलं की मुलींनो आज नाही पण उद्या नक्की मी येतो, कारण मला बायकोसाठी साडी घ्यायचीच आहे.

नक्की या हं सर, तुमच्या साठी दुकान उघडच आहे केंव्हाही. त्या मुली एकमुखाने म्हणाल्या.

दुसऱ्या दिवशी, ऑफिस मध्ये माझ्या टायपिस्ट मुलीला मी म्हटलं, ऑफिस सुटल्यावर थोडावेळ माझ्या सोबत साड्यांच्या दुकानात येशील का. त्या स्टेशन जवळच्या दुकानात सेल लागलेला आहे. थोडं साडी घेण्यासाठी मदत कर ना.

नो प्रॉब्लेम सर. ती हसत म्हणाली.

दुसऱ्या दिवशी आम्ही दोघ परत त्या दुकानात गेलो. आम्हाला पाहिल्यावर परत कालच्या सारख्याच त्या मुली आमच्या भोवती धावत आल्या.

आणि मग तो साड्या दाखवण्याचा सोहळा सुरु झाला. ही नको, ती दाखव. ही बघा मॅडम तुमच्या अंगावर कशी शोभून दिसेल. हा मस्त कलर आहे. एकदम नवीन प्रकार आहे. वगैरे वगैरे वाक्य कानावर पडत होती.

ती पोरगी पण त्या दुकानात पूर्ण गुंगून गेली होती.

तेव्हढ्यात, हाय जीजू इकडे कुठं. चिरपरिचित, खणखणीत आवाज माझ्या कानावर पडला आणि भर एसी दुकानात मला थंडी भरली. लग्नात गुलाबी साडी नेसलेली हिची मामेबहीण आपल्या मैत्रिणीनंसोबत त्याचं दुकानात आली होती. नेमकं त्याच वेळी, त्या ऑफिस मधल्या मुलीने सर, ही साडी कशी दिसते विचारायला एकच वेळ झाली. त्या वेळी हिच्या मामेबहिणीने ज्या नजरेने माझ्या कडे पाहिलं, त्या वेळी मला होळी पेटल्यानंतर कसा जाळ पसरतो तसा भास झाला.

मला एकदम गरगरल्या सारखं झालं. त्या नंतर मी सरबताचे किती प्याले पिलो, काहीच आठवत नाही. मी कोणती साडी विकत घेतली होती तेही आठवत नव्हतं.

घरी पोहोचलो तेंव्हा, हिच्या मामेबहिणीला तिथं बघितलं आणि मला तर काय बोलावे तेच सुचत नव्हतं. साडीची पिशवी मी बायकोला दिली,तुझ्या साठी साडी घेतली आहे बोलायचं होतं पण तोंडातून शब्दच फुटत नव्हते.सारखी बोबडी वळत होती. कस सांगावं तिला की हा सगळा खटाटोप तिच्या साठीच केला होता म्हणून.




काहीच समजत नव्हतं.

काहीही म्हणा जीजू पण तुमची चॉईस खूप भारी आहे, हिची लग्नात गुलाबी साडी नेसलेली मामेबहीण खवचट पणे हसत म्हणाली. तिनेच पुढाकार घेऊन बॉक्स उघडला आणि म्हणाली, जिज्जू, तुम्ही तर साडी म्हणालात आणि यात तर ड्रेस आहे. ड्रेस तर ताई घालत नाही. मस्तच झालं मग आता हा ड्रेस मीच ठेऊन घेते.

सगळा घोळ लक्षात आला. साडीची पिशवी त्या पोरीकडे गेली होती. ड्रेसची माझ्याकडे आली होती आणि दोघांचे पैसे मात्र मी भरले होते. साडी गेली होती त्या पोरीकडे आणि ड्रेस घेतला होता मेहुणीने.

आता कसं काय सांगू बायकोला की हे करतांना जीव तुझ्यातच गुंतलेला होता म्हणून.

# एक ग्लास दूध पितो आमचा चिंटू!

**(पान ५ वरुन)** बनवले जाते, जे शरीरासाठी अत्यंत हानिकारक असते. ६.परदेशी चरबी, ७.सोडियम हायड्रॉक्साईड (कॉस्टिक सोडा) ८.तलावाचे, नाल्याचे अशुद्ध दूषित पाणी ९.माल्टोडेक्सट्रिन, १०.सोडियम कार्बोनेट, ११.फॉर्मेलिन आणि १२.अमोनियम सल्फेट

भारतीय अन्न सुरक्षा आणि मानक प्राधिकरणानाने (ऋ-डडख) घरीच दुधाची भेसळ ओळखण्यासाठी काही प्रक्रिया सांगितल्या आहेत.

दुधातील भेसळ कशी ओळखायची?

१. सिंथेटिक दूध: सिंथेटिक दुधाची चव कडू लागते. बोटांच्या दरम्यान चोळले की ते साबणासारखे स्निग्धपणासारखे वाटते. गरम झाल्यावर ते पिवळे होते.

२. पाण्याची भेसळ: दुधाचा थेंब एका गुळगुळीत पृष्ठभागावर टाकला आणि जर थेंब हळू वाहत असेल आणि टाकलेल्या ठिकाणी पांढरा डाग राहत असेल तर ते शुद्ध दूध आहे. जर दूध पृष्ठभागावर पडल्यानंतर कोणत्याही प्रकारचे डाग दिसत नसल्यास या स्थितीत तुमच्या दुधात भेसळ झाली असू शकते

३. स्टार्चची चाचणी दुधात आयोडीनचे काही थेंब घाला. मिक्स केल्यावर मिश्रणाचा रंग निळा होईल. तर त्यात स्टार्च मिसळलेला असू शकतो

४. दुधात डिटर्जंट: दूध आणि पाणी समप्रमाणात एकत्र करा. जर त्यात फेस तयार होऊ लागला, तर याचा अर्थ असा की त्यात डिटर्जंटची भेसळ झाली आहे.

४. युरियाची भेसळ: दहा मिलीलीटर दुधात पोटेशियम कार्बेनाइटचे ५-६ थेंब टाकावे. जर दुधाचा रंग पिवळा पडला तर समजावे की त्यात यूरियाची भेसळ केली आहे

खवा बनवून पाहा : दुधापासून खवा बनवूनही तुम्ही त्यातील भेसळ जाणून घेऊ शकता. खवा घन व तेलकट असल्यास तुमचं दूध शुद्ध आहे. जर तो दगडासारखे कठीण झाला असेल, कडवट लागत असेल, पिवळसर काळपट पडला असेल तर या प्रकरणात तुमचं दूध भेसळयुक्त आहे.

कसे टाळावे?

पाश्चरायइड (शास्त्रीय प्रक्रिया केलेले) विश्वासार्ह दूध वापरा. दूध उकळून प्या. पॅकबंद दूध किंवा दूधजन्य पदार्थांची गुणवत्ता तपासा. भेसळीची शंका आल्यास दूध घरच्या घरी चाचणी करून पाहा.

निष्कर्ष : म्हणूनच, योग्य चाचण्या करून , तपासून शुद्ध दूध मिळवण्याचे प्रयत्न केल्यास आपण स्वतःला आणि आपल्या कुटुंबाला सुरक्षित ठेवू शकतो. फक्त दुधाचाच आग्रह न धरता इतरही अन्न पदार्थांची म्हणजेच ताटात वाढलेल्या सर्व चौरस आहाराला खाण्याची सवय आपल्या बाळांना लावायला हवी!

# भिक्षेकऱ्यांचा डॉक्टर - डॉ.अभिजीत सोनवणे

**(पान ३ वरुन)** तू डॉक्टर म्हणून एलोपॅथी वापरशील, नॅचरोपॅथी वापरशील किंवा होमिओपॅथी वापरशील पण या पॅथींनी फक्त शरीरं बरं होतात रे.. मनं नाही. मनं बरी करायची असतील तर या जगात दोनच पॅथी आहेत. एक आहे सिम्पॅथी आणि दुसरी आहे इम्पॅथी. या दोन पॅथी जेव्हा तू वापरशील तेव्हा तू चांगला डॉक्टर होशील, आणि माणूसही ! असे अनेक संजीवन मंत्र त्यांनी डॉक्टरांना दिलेत. त्यांचं म्हणणं असायचं- तुला वेद नाही समजले तरी चालतील पण एखाद्याची वेदना समजून घे बेटा.... ते आजोबा डॉ. अभिजीतना हर प्रकारे मदत करायचे. या मदतीची परतफेड कशी करायची? यावर त्यांनी डॉक्टरला एक खेळ शिकवला. या खेळाचे नाव होते गेम ऑफ सपोर्ट. ते म्हणायचे- खेळात आपण चेंडू पुढे पुढे सरकवतो ना एकमेकांकडे? तसाच हा खेळ आहे. मदतीचं गाठोडं पुढं पुढं सरकवत राहायचं. परत घ्यायचं नाही. परतफेड घेतलीस तर तू या खेळातून बाद. आउट!!! या खेळाचं नाव आहे गेम ऑफ सपोर्ट.

गेम ऑफ सपोर्ट खेळाचे तत्त्वज्ञान पचवून भिक्षेकर्यांचे डॉक्टर अभिजीत सोनवणेंनी आपल्या पत्नी मनिषा सोबत २०२३ मध्ये जवळपास १७५ लोकांचे संसार उभे करण्यास मदत केली. काहींना स्वतःचे व्यवसाय टाकून दिले तर काहींना नोकऱ्या मिळवून दिल्या. आता कुणी फुलं विकतंय, कुणी भाजी विकतंय, कुणी बूट पॉलिश करतंय, कुणी हॉटेलात वेटर, तर कुणी हातगाडीवर चहा विकतंय ! ७२ अपंगांना व्हीलचेअर देऊन त्यांना व्यवसाय सुरू करून दिला; ३६ अंध बांधवांना वजन काटे घेऊन दिलेत. या व्यतिरिक्त डॉ. मनिषा अभिजीत सोनवणे रस्त्यावरच भिक्षेकरांचे योगासन क्लास घेतात आणि त्यांच्या मानसिक आजारावर इलाज करतात. एवढंच नाही तर जवळपास एक हजारावर म्हाताऱ्या भिक मागणाऱ्या माणसांच्या डोळ्याचे ऑपरेशन केले. त्यांच्या डोळ्यातील मोतीबिंदू काढून त्यांना नवी दृष्टी प्रदान केली. त्यांच्या मुलांना शालेय शिक्षणासाठी वह्या-पुस्तके घेऊन दिल्यात तर काहींच्या हॉस्पिटलचा खर्चही केला. काहींना कुबड्या घेऊन दिल्या. काहींना नवे कपडे देऊन त्यांना वृद्धाश्रमात प्रवेश मिळून दिला. पालक म्हणून स्वतःचे नाव त्यांनी दिले. अशी एक ना अनेक अफाट सेवाभावाची कामे डॉक्टरांनी केलीत.

डॉ. अभिजीतांचे हे अफाट सेवाकार्य बघून हजारो अनाथ लेकरांची माय म्हणवणाऱ्या सिंधुताई सपकाळ यांनी त्यांच्याबद्दल बोलताना म्हटले- तू मला माय म्हणतोस आणि समजतोससुद्धा ! तुझ्यासारख्याची माय होणे कोणत्या आईला आवडणार नाही? आज तूच कितीतरी जणांचा आधारवड झालास. तुझी माय होण्यापेक्षा, तुझी लेक म्हणून घेणं मला जास्त आवडलं असतं बेटा.... हरकत नाही... मी अनंत यातना सोसल्या म्हणूनच दुसऱ्याच्या समजू शकले. स्वतः च्या पोटात पडलेली आग समजली की, दुसऱ्याच्या पोटातील धग सुद्धा समजते

डॉ. अभिजीत सोनवणेंच हे आगळं वेगळं, अत्यंत विलक्षण असे अफाट सेवाकार्य बघून नतमस्तक व्हावेसे वाटते. त्यांचे हे कार्य आपल्याला संदेश देत आहे की त्यागाची व सेवेची बीजभूत मनोवृत्ती वाढवा. स्वार्थवृत्ती हळूहळू कमी करा. रोज इतरांकरिता काही तरी चांगली गोष्ट करा. इदं न मम ही मनोवृत्ती वाढवा. सेवेशिवाय व्यक्तीचा व समाजाचा विकास होत नाही. सेवा हा सर्वोत्तम धर्म मानला गेला आहे आणि त्याचं हे अधिष्ठान आहे. डॉ. अभिजीतांचे हे विशाल सेवाकार्य बघून संत तुकडोजींच्या ओळी आठवतात-

खरी सेवा निष्काम कर्म ।
परस्परांच्या सुखाचे वर्म ।।
समजोनी जो करील त्याग उद्यम ।
तोची सेवाभावी समजावा ।।

# जिल्ह्यातील तीस बालकांची अस्थिव्यंग सुधारक शत्रक्रिया रोटरी क्लब व डॉ.हेडगेवार सेवा समितीचा संयुक्तिक उपक्रम

**नंदुरबार, दि.८ (प्रतिनिधी) - रोटरी क्लब ऑफ नंदनगरी, रोट्रक्ट क्लब ऑफ नंदनगरी, डॉ.हेडगेवार सेवा समिती नंदुरबार तसेच रोटरी डिस्टिक्टच्या विविध रोटरी क्लबच्या संयुक्त विद्यमाने नंदुरबार येथील जिल्हा रुग्णालयात मोफत अस्थीव्यंग सुधारक शत्रक्रिया शिबीराचे आयोजन करण्यात आले होते. या शिबिरात बालकांची तपासणी करण्यात आली. त्यातून ३० गरजू बालकांची अस्थीव्यंग सुधारक शत्रक्रिया करण्यात आली.**

या शिबिराचे उद्घाटन माजी मंत्री तथा आमदार डॉ.विजयकुमार गावीत यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी शासकीय वैद्यकीय महाविद्यालयाचे डीन डॉ.संजय राठोड, जिल्हा शल्यचिकित्सक डॉ.वर्षा लहाडे, डॉ.हेडगेवार समितीचे प्रमुख केदारनाथ कवडीवाले, डॉ.मयुरेश वाडके, रोटरी डिस्ट्रिक्ट ३१४२ चे डी.जी.एन.चंद्रदास शेट्टी, डॉ.प्रमोद काळे (मुंबई), रोटरी क्लब ऑफ नंदनगरीचे अध्यक्ष इसरार अली सैय्यद, संतोष वसईकर, डॉ.निलेशकुमार वळवी, डॉ.सुबेदार, डॉ.ज्योती बागुल, शिक्षण संस्था चालक संघटनेचे सचिव युवराज पाटील आदी उपस्थित होते. या मोफत अस्थीव्यंग सुधारक शत्रक्रिया शिबिराच्या आयोजनात रोटरी डिस्ट्रिक्ट ३०६० चे रोटरी क्लब ऑफ नंदनगरी, रोट्रॅक्ट क्लब ऑफ नंदनगरी, डॉ. हेडगेवार सेवा समिती नंदुरबार, रोटरी डिस्ट्रिक्ट ३१४१ व ३१४२ चे रोटरी क्लब ऑफ अंबरनाथ, देवनार, कॉन्व्हेंटरी फोनिक्स, ठाणे हिल्स, ठाणे ग्रीन सिटी या रोटरी क्लब यांचा देखील समावेश होता. या मोफत अस्थीव्यंग सुधारक शत्रक्रिया पूर्व तपासणी शिबीरात ९ ते १४ वयोगटातील मुलांचा समावेश होता. नंदुरबार जिल्ह्यातून या शिबिरात एकूण ८५ बालकांची तपासणी करण्यात आली. त्यातून ३० गरजू बालकांची अस्थी व्यंग (दिव्यांग) सुधारक शत्रक्रिया मुंबई व लंडन येथील तज्ञ डॉक्टरांच्या हस्ते नंदुरबारच्या जिल्हा रुग्णालयात करण्यात आली. सदर मुलांची शत्रक्रिया पूर्व तपासणी रोटरी डिस्ट्रिक्ट ३१४२ चे माजी डिस्ट्रिक्ट गव्हर्नर डॉ.मयुरेश वारके, डॉ.हिमांशू बेंद्रे (मुंबई), डॉ.जिंस्या पाटील, डॉ. दिशा शेट्टी, डॉ.संपदा पटवर्धन यांनी केली. या विशेष शस्त्रक्रिया शिबीरासाठी मुंबई व ठाणे रोटरी क्लबचे सदस्य चंद्रहास शेट्टी, पराग पाटील, गणेश केलेसकर, नितीन मोरे, सागर धदास, अनिल मुळे, शैलेश मुळे, प्रशांत आंबेकर, सतीश शेट्टी, संग्राम जोशी, नागेश भट, शिरीष सोनगडकर, सतीश शेट्टी आदी उपस्थित होते. शिबिरासाठी संतोष वसईकर, जिल्हा केमिस्ट अँड ड्रगिस्ट असो. अध्यक्ष सुनील चौधरी, मनोहर धिवरे, डॉ.नितीन पंचभाई यांचे विशेष सहकार्य लाभले. शिबीर यशस्वीतेसाठी रोटरी नंदनगरीचे अध्यक्ष इसरार सैय्यद, सचिव विवेक जैन, जितेंद्र सोनार, प्रीतीश बांगड, रोट्रॅक्ट क्लब ऑफ नंदनगरीचे अध्यक्ष मयूर जैन, जय गुजराथी, रोट्रॅक्ट क्लब ऑफ नवापूरचे अध्यक्ष यामिन पठाण, राजेश्वर चौधरी, राहुल पाटील, गौरव चौधरी, डॉ. हेडगेवार सेवा समितीचे गिरीश बडगुजर, उमेश शिंदे, गौरव चौधरी आदींनी परिश्रम घेतले.

# नवापूरामधील इस्लामपुरा भागातील रहिवाशांनी नॅशनल हॉयवेवर उड्डाणपुलचे काम तीन तास रोखले; आश्वासनानंतर घेतली माघार

**नवापूर, दि.८ (प्रतिनिधी)- शहरालगत असलेल्या इस्लाम पुरा भागातील रहिवाश्यांनी नॅशनल हायवेवरील उड्डाणपुलाचे काम तीन रोखून धरल्याने प्रशासनाची एकच धावपळ उडाली.**



नवापूर शहरातून महामार्ग क्रमांक सहाचे काम कासव गतीने सुरू असून या महामार्गाच्या बाजूला इस्लामपुरा, प्रभाकर कॉलनी, दिगंबर पाडवी सोसायटी, सुभाष नगर, भिमनगर ह्या कितेक वर्षांपासून वास्तव्यास आहेत. परंतु शहरातुन प्रवेशासाठी कोणत्याही प्रकारची सोय नसल्यामुळे आज या भागातील रहिवाशांनी चक्क तीन तास उड्डाण पूलाचे कामबंद आंदोलन केले होते. यात महिला वर्ग व पुरुष मोठ्या प्रमाणात उपस्थित होते. गेल्या तीन चार दिवसांपूर्वी एका गरोदर महिलेला रुग्णालयात नेत असतांना बोगदा नसल्याने १ ते २ कि मी फिरुन नेत असतांना तीला आपला जीव गमावला लागला होता. यामुळे संतप्त नागरिकांनी उड्डाण पूलाचे काम चक्क तीन तास बंद पाडले. यावेळी रहिवासी यांनी एकच आक्रोश करतांना सांगितले की आमच्या लहान मुलांना शाळेत घेऊन जाताना, रुग्णालयात जाताना आम्हाला फार फिरुन जावे लागत आहे तसेच हा हायवेची उंची वाढविल्याने पावसाळ्यात आमच्या घरात पाणी भरलेजात असते त्यामुळे आमचे नुकसान होत आहे. जो पर्यत आमच्या मागण्या पुर्ण होत नाही तो पर्यत आम्ही नेशनल हॉयवेचे काम होऊ देणार नाही असा पविञा रहीवासी यांनी धरला होता. या प्रसंगी नेशनल हॉयवेचे एकही अधिकारी कर्मचारी उपस्थित राहीले नाही. याप्रसंगी पोलिस निरीक्षक शिवाजी बुधवंत, माजी विरोधी पक्षनेते नरेंद्र नगराळे व तहसीलदार यांच्या प्रतिनिधींना निवेदन सादर करून स्थानिक नागरिकांनी आपले काम बंद आंदोलन तात्पुरते मागे घेतले. यावेळी रहिवासी माजी उपनगराध्यक्ष फारुक शहा, प्रकाश ब्राम्हणे, आनंदा आतारकर, शिरसाठ पेटर, सलीम खालीक काकर, रमजानशहा गणी शहा आदी सह रहिवासी महिला पुरुष उपस्थित होते. यावेळी कोणताही अनुचित प्रकार होऊ नये म्हणून पोलिस निरीक्षक शिवाजी बुधवंत, उपनिरीक्षक जितेंद्र महाजन,जगदीश सोनवणे यांनी चोख बदोबस ठेवला होता.

# नवोपक्रम स्पर्धेत लोयच्या अंगणवाडी सेविका बबीता पाडवी राज्यात प्रथम



**नंदुरबार, दि.८ (प्रतिनिधी)- राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद महाराष्ट्र राज्य यांच्यावतीने घेण्यात आलेल्या नवोपक्रम स्पर्धेत नंदुरबार तालुक्यातील लोय येथील अंगणवाडी सेविका बबीता पाडवी यांनी राज्यात प्रथम क्रमांक पटकाविला.**

सलग दोन वर्ष महाराष्ट्र राज्यात प्रथम क्रमांक मिळवून बबिता पाडवी यांनी लोय गावाचाच नाही तर नंदुरबार जिल्ह्याचा लौकिक वाढवला आहे. राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद महाराष्ट्र राज्य यांच्यावतीने घेण्यात आलेल्या नवोपक्रम स्पर्धेत अंगणवाडी सेविका बबिता पाडवी राज्यात प्रथम आल्या. सदर स्पर्धामध्ये सन २०२४ - २५ मध्ये अकराशे चार स्पर्धकांनी सहभाग नोंदविला.यात बबीता पाडवी यांनी पूर्व प्राथमिक गटातून राज्यात प्रथम क्रमांक मिळवला. बबिता पाडवी यांचा यथोचित सन्मान करण्यात आला. उपसंचालक डॉ. कमलादेवी आवटे यांच्या हस्ते स्मृतीचिन्ह व प्रमाणपत्र देऊन सन्मानित करण्यात आले. यावेळी संचालक राहुल रेखावार, सहसंचालक अनुराधा ओक, विभाग प्रमुख डॉ. दत्तात्रय थिटे आदी मान्यवर उपस्थित होते.

## शहाद्यातील पाटील महाविद्यालय केंद्राची बैठक व्यवस्था

शहादा, दि.८ (प्रतिनिधी)- नाशिक विभागीय मंडळाची इ.१२ वीची लेखी परीक्षा ११ फेब्रुवारी पासून सूरू होत असुन शहादा येथील (कै.) सौ.जी.एफ.पाटील कनिष्ठ महाविद्यालय केंद्र क्रमांक ६२१ (ब) या केंद्राची बैठक व्यवस्था घोषीत करण्यात आली आहे. या केंद्रावर एकूण १६७६ विद्यार्थी प्रविष्ठ होत आहेत.शहादा येथील या केंद्रावर शेठ. व्ही.के. शाह.विद्या मंदिर व कै.सौ.जी.एफ. पाटील कनिष्ठ महाविदयालयातील सर्व विद्यार्थी तसेच प्रकाशा, कहाटूळ, सारंगखेडा व निशांत उर्दू कनिष्ठ महाविदयालयातील सर्व विद्यार्थ्यांची बैठक व्यवस्था करण्यात आली आहे. बैठक व्यवस्था ११ फेब्रुवारीला क.महाविद्यालयाचा सूचना फलकावर लावण्यात येईल. या केंद्रात नियमित अभ्यासक्रमासाठी कला शाखेतील ४२३ विदयार्थी (एस१२५७८३ ते एस १२६२०५), विज्ञान शाखेतील ११२२ ( एस. ०५८८०५ ते एस. ५९९२५ व एस. ४००२८९), वाणिज्य शाखेतील १०२( एस.१५८७७५ ते एस.१५८८७६),व किमानकौशल्य शाखेतील २९ (एस.१६६१८५ ते एस.१६६२१३), असे एकूण १६७६ विद्यार्थ्यांची बैठक व्यवस्था करण्यात आली आहे.

# माता रमाई आंबेडकर स्मारक उभारणीत मनपा प्रशासन उदासिन

**धुळे, दि.८- शहरात माता रमाई आंबेडकर यांचे भव्य स्मारक उभारण्यासाठी तत्कालिन महापौर चंद्रकांत सोनार यांनी जागा आणि निधीची घोषणा केली. त्यासंदर्भात वर्तमान पत्रांमध्ये बातम्याही छापून आल्यात. परंतु मनपा प्रशासनाने स्मारक उभारणीबाबत उदासिन धोरण स्विकारले आहे. महापालिकेने स्मारक उभारणीचा प्रश्न मार्गी लावावा. अशा मागणीचे साकडे निवेदनाद्वारे लोक जनशक्ती पार्टीच्या पदाधिकाऱ्यांनी मनपा आयुक्तांना घातले आहे.**

माता रमाई आंबेडकर स्मारक उभारण्याबाबत प्रशासन तसेच समाजबांधवांची बैठक मनपा सभागृहात होवून विषय मार्गी लागला होता. परंतु मागील चार वर्षांपासून हा विषय प्रलंबित राहिल्याने आंबेडकरी अनुयायांमध्ये प्रशासन व सत्ताधाऱ्यांविरूध्द असंतोष निर्माण निर्माण झाला. केंद्र सरकारच्या मागील पाच वर्षात आंबेडकरी अस्मितेचे प्रश्न सुटले. भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या आगामी १३४ व्या जयंती निमित्त आंबेडकरी अनुयायांना माता रमाई स्मारक उभारणीबाबत प्रशासनाने सकारात्मक निर्णय घ्यावा. अशी अपेक्षा निवेदनाद्वारे लोक जनशक्ती पार्टी महिला आघाडीच्या जिल्हाध्यक्षा शोभा चव्हाण, दिलीप साळवे, कुंदन खरात, सागर चिवटे यांनी व्यक्त केल्या आहेत.

# मुख्या.लोटन जगदाळे यांची धडगाव येथे पदोन्नती; गणोर वासियांकडून निरोप

**शहादा,दि.८(प्रतिनिधी)- तालुक्यातील गणोर येथील जिल्हा परिषद शाळेचे मुख्याध्यापक लोटन काशिनाथ जगदाळे यांची धडगाव येथे पदोन्नती झाल्याने त्यांचा निरोप व सत्कार समारंभ आयोजित करण्यात आला होता.**

या निरोपाप्रसंगी शाळेतील शिक्षक मनोहर निमजे, चेतन पाटील, प्रकाश जाधव, गुलाबसिंग पावरा, आदर्श माध्यमिक विद्यालय आडगावचे मुख्याध्यापक श्री.के. पाडवी, जिल्हा परिषद शाळा अंबापुर येथील शिक्षक अनिल राठोड यांनी श्री.जगदाळे सरांची कार्यकुशलता, प्रामाणिकपणा, उत्तम व्यवस्थापक अशा बहुआयामी पैलू बद्दल मनोगत व्यक्त केले. असे आदर्श मुख्याध्यापक गणोर शाळेस मिळाल्याचा अभिमान असल्याचे प्रतिपादन युवानेते राहुल रावताळे यांनी केले. यावेळी शिक्षक लोटन जगदाळे यांचा सपत्नीक सत्कार करण्यात आला. यावेळी विद्यार्थी, ग्रामस्थ, सहयोगी शिक्षक आदी उपस्थित होते.

## जाहीर नोटीस

**तमाम जनतेस या टायटल जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की,**
**मौजे महिंदळे येथील स. नं.८/३ पैकी प्लॉट नं. १ यास विस्तारीत सि.स.नं. ४५५ चे एकूण क्षेत्र ५८७.७३ चौ. मी. ६३२४ चौ. फुट यापैकी दक्षिणेकडून १७ मी. रुंदी सोडून मधला भाग चे क्षेत्र ४६.४६ चौ. मी. बखळ प्लॉट.**

यासी चतु:सिमा

| | | |
|---|---|---|
| पुर्वेस : | ५.४ फुट | स. नं. ८/४ |
| पश्चिमेस : | ५.४ फुट | रस्ता |
| दक्षिणेस : | ९३ फुट | या प्लॉटचा उर्वरित भाग |
| उत्तरेस : | ९३ फुट | या प्लॉटचा उर्वरित भाग |

येणे प्रमाणे वर्णन असलेली मिळकतीचा आमचे आशिल यांनी मिळकतीचे मालक **श्री. दिपक पंडीत गोसावी**, रा. महसूल कॉलनी समोर, साक्री रोड, धुळे यांचेशी कायम खरेदी करणेचा सौदा केलेला आहे व बयाणा रक्कम दिलेली आहे.

सबब तमाम लोकांना या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, सदर मिळकतीत कोणाचेही कोणत्याही स्वरुपाचे जसे सौदा, करार, बक्षीस, अदलाबदल, गहाण, लिज, लिन, लिव्ह अँण्ड लायसन्स, भाडेपट्टा, वारस हक्क, मुखत्यार, मृत्यूपत्र, वहिवाट, बोजे, ऋणभार, ताबा, आरक्षण, जप्ती,खरेदी-विक्री, न्यायिक व इतर प्रकरणे अथवा इतर कोणत्याही स्वरुपाचे हक्क व अधिकार असतील तर त्यांनी ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ७ (सात) दिवसांच्या आत खालील नमूद पत्त्यावर पुराव्यानिशी लेखी हरकती नोंदवाव्यात. टपाल व फोनवर तसेच परस्पर वर्तमानपत्रात दिलेल्या हरकती मान्य होणार नाही. तसेच दिलेल्या मुदतीत कोणाचीही कोणतीही हरकत न आल्यास सदर मिळकत आमचे आशिलांनी खरेदी करण्यास कोणाचीही काही एक हरकत नाही, तसेच सदर मिळकत ही निर्बोज व हस्तांतरणीय आहे. असे समजून आमचे आशिल सदर मिळकतीचा खरेदी व्यवहार पूर्ण करतील याची नोंद घ्यावी.

सदरची जाहीर नोटीस आमचे पक्षकाराने दिलेल्या माहितीवरुन व सांगितलेवरुन त्यांचे वतीने आमचे मार्फत प्रसिद्धीस दिली असे. धुळे दि. ०८/०२/२०२५

**ॲड. रोहित राजकुमार छाबिडया**
ब्लॉक नं.आर/२,रुम नं.१, कुमारनगर, साक्री रोड,धुळे.
मो.९९२२८२८८८३, ७४९९९९८९५५

## जाहीर नोटीस

तमाम लोकांस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, मौजे वलवाडी येथील स. नं. २७ यापैकी प्लॉट नं. ४४ चे एकूण क्षेत्र २०८.०० चौ. मी. यापैकी पुर्वेकडील भागाच क्षेत्र १०४.०० चौ. मी. बखळ प्लॉट.

यासी चतु:सिमा.

| | |
|---|---|
| दिशा : | चतु:सिमा |
| पुर्वेस : | प्लॉट नं. ४५ |
| पश्चिमेस : | याच प्लॉट नं.४४पैकी उर्वरित भाग |
| दक्षिणेस : | प्लॉट नं. ४८ अ. |
| उत्तरेस : | वापर व रस्ता. |

सदर बखळ प्लॉट अनिल नामदेव जगताप रा. चिंचवार, ता. जि. धुळे यांच्या मालकीचा व ताबे उपभोगातील असून त्यांनी उपरोक्त बखळ प्लॉट कायमस्वरुपी विकणेचा सौदा आमचे अशिल यांच्याशी केला आहे. व बयाणा रक्कम चेकद्वारे स्विकारलेली आहे.

आमचे आशिलांना सदर बखळ प्लॉटचा लवकरच खरेदीचा व्यवहार लवकरच पूर्ण करावयाचा आहे. तरी सदर बखळ प्लॉटच्या बाबतीत इतर सरकारी, निमसरकारी, संस्था, वित्तीय संस्था, बँका व इतर कोणाचाही खाजगी हक्क, अधिकार, गहाण, टांच, बक्षिस, बोजा, लीज, सौदा, करार, मुखत्यार, मृत्यूपत्र वगैरे कोणत्याही प्रकारचा तबदिलीचा व्यवहार असल्यास सदर मिळकतीवर कोणत्याही प्रकारे हिस्सा, अधिकार असल्यास त्यांनी सदरची नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ७ दिवसांच्या आत खालील पत्त्यावर मिळकती संबंधीत मुळ कागदोपत्री पुराव्यानिशी व त्याचे झेरॉक्स प्रती जोडून लेखी स्वरुपात हरकतीसह प्रत्यक्ष भेटून आपली हरकत नोंदवावी. तोंडी हरकत अथवा परस्पर वर्तमान पत्रात जाहीर हरकत नोटीस दिल्यास सदरचे हरकती आमचे आशिलांवर बंधनकारक राहणार नाही. वरील मुदतीत कोणाची काहीही एक हरकत न असल्यास सदरच बखळ प्लॉट निर्बोज व निर्वेध समजण्यात येईल व आमचे अशिल त्यांचा खरेदीचा व्यवहार पूर्ण करतील. त्यानंतर मात्र कोणची हरकत आल्यास ती आमचे आशिलावर बंधनकारक राहणार नाही.

सदरची नोटीस पक्षकाराने दिलेल्या कागदपत्राच्या व माहितीवरून व सांगणेवरून आमचे मार्फत प्रसिध्दीस दिली असे.

ठिकाण : धुळे दि. ०८/०२/२०२५

**ॲड. चेतन महादु यादव**
सि. स. नं. २५९७/अ, श्रीसदगुरू सदन, गल्ली नं.५, मिरच्या मारुती चौक, धुळे -४२४००१
मो.नं.९६८९१२४६९२

# आचार्य रामलालजींच्या दीक्षेला पन्नास वर्ष पूर्ण नोखामंडी येथे दीक्षा महोत्सव; उपस्थितीचे आवाहन

**शहादा, दि.८ (प्रतिनिधी) - अखिल भारत साधू मार्गी जैन संघाचे म.सा.आचार्य रामलालजी यांना दीक्षा घेऊन ५० वर्ष पूर्ण झाल्याने ९ फेब्रुवारी रोजी राजस्थान राज्यातील नोखामंडी या ठिकाणी भव्य असा दीक्षा महोत्सव आयोजित करण्यात आला असल्याची माहिती शहादा साधू मार्गी जैन संघाचे अध्यक्ष प्रकाश कोटडीया यांनी दिली.**

आचार्य रामलालजी यांनी १९७५ मध्ये जैन दीक्षा घेतली होती. गेल्या पन्नास वर्षापासून ते आपली जैन साधू मार्गी सेवा देत आहेत. आतापर्यंत त्यांनी शेकडो प्रवचने देखील केली आहेत. देशात एक चांगला आदर्श निर्माण व्हावा. चांगली संस्कार व राष्ट्रप्रेम भक्ती मार्गातून निर्माण व्हावा. आपली दीक्षाच्या माध्यमातून जास्तीत जास्त सेवा देण्याच्या त्यांच्या प्रयत्न आहे. १६ राज्यात पायी प्रवास करून त्यांनी प्रवचने केली आहेत. विशेष म्हणजे पायी प्रवास करताना कोणत्याही प्रकारच्या वाहनांच्या उपयोग करत नाहीत. शिवाय विजेच्या उपकरणांच्या साधनांच्या उपयोग देखील ते करून घेत नाहीत. त्यांचे जीवन जनतेच्या सेवेसाठी समर्पित आहे. त्यांच्या सानिध्यात ४०० पेक्षा अधिक दीक्षा देण्यात आलेल्या आहेत. त्यांच्या दिक्षेला ९ फेब्रुवारी रोजी पन्नास वर्षे पूर्ण होत असल्याने अखिल भारत साधू मार्गी जैन संघातर्फे देशभरात ठिकठिकाणी कार्यक्रमाचे आयोजन केले जात असून राजस्थान राज्यात भव्य असा दीक्षा महामहोत्सव साजरा केला जाणार आहे. अखिल भारतीय जैन संघाच्या साधकांनी सहभाग घ्यावा असे आवाहन शहादा साधू मार्गी जैन संघाचे अध्यक्ष प्रकाश कोटडीया यांनी केले आहे.

## कमलबेन पटेल यांचे निधन

शहादा, दि.८- शिंदे ता.नंदुरबार येथील मूळ रहिवासी (ह.मु. विजयनगर शहादा) कै. कमलबेन (रोहिणीबेन) काशिनाथ पटेल यांचे वृद्धापकाळाने दि.५ फेब्रुवारी रोजी निधन झाले. त्यांचे पश्चात पती, मुलगा, सून, मुलगी,जावई, नातवंडे असा परिवार आहे. त्या काशिनाथ नंदराम पटेल यांच्या पत्नी तर शिक्षण विस्तार अधिकारी सौ.ममताबेन पटेल व जगदीश पटेल यांच्या आई होत्या.

**आपला महाराष्ट्र**
**वाचकांना विनम्र सुचना**
आपला महाराष्ट्र वृत्त पत्रातून प्रसिध्द होणाऱ्या विविध जाहीरातीतील मजकुराची शहानिशा करुनच वाचकांनी त्यासंबधी आर्थिक व्यवहार करावा जाहीरातीतील आपल्या उत्पन्नाच्या संदर्भात अथवा सेवेच्या संदर्भात जाहीरातदार जे दावे करतात त्याची आपला महाराष्ट्र वृत्तपत्र समुह कोणतीही हमी घेत नाहीत जाहीरातीत करण्यात आलेल्या दाव्यांची पुर्तता जाहीरातदारांकडून न झाल्यास होणाऱ्या परिणामास आपला महाराष्ट्र वृत्तपत्र समुहाचे मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक जबाबदार रहाणार नाहीत कृपया वाचकांनी यांची नोंद घ्यावी.

## जाहीर नोटीस

नि.६/ड

**शिरपूर येथील मे.सिव्हील जज्ज सो. ज्युनी.डिव्ही. यांचे कोर्टात**

दि.कि.अर्ज नं.१४७/२०२५

१) गणेश काशिनाथ शिरसाठ (कोळी),
२) दिनेश काशिनाथ शिरसाठ (कोळी),
नं.१ व ३ रा.वाघाडी ता.शिरपूर, जि.धुळे,
३) शोभाबाई जीवन कोळी,
४) ज्योती प्रविण कोळी ..... **अर्जदार**

**विरूध्द**

कोणीही नाही ..... **जाबदेणार**

ज्याअर्थी अर्जदार गणेश काशिनाथ शिरसाठ (कोळी) यांनी मे.न्यायालयात नामे काशिनाथ धुडकु शिरसाठ (कोळी) हे दि.०६/०१/२०२१ रोजी मौजे वाघाडी ता.शिरपूर जि.धुळे येथे मयत झालेले आहेत. अर्जदार हेच त्यांचे कायदेशीर एकमेव वारस असल्याबाबत अर्जदार याने बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट १८२७ चे कलम २ अन्वये कायदेशीर वारस प्रमाण पत्र मिळणे करीता अर्ज दाखल केला आहे.

त्या अर्थी तमाम लोकांना कळविण्यात येते की, नामे काशिनाथ धुडकु शिरसाठ (कोळी) यांचे वारसांबाबत वर नमूद अर्जास कोणाची काही हरकत/तक्रार असल्यास दि.६/३/२०२५ रोजी ठिक १०:३० वाजता मे.न्यायालयात हजर होवून लेखी तक्रार सादर करावे तसे न केल्यास अर्जदार यांचा अर्ज मंजूर करून अर्जदार यांना वारस दाखला देण्यात येईल याची नोंद घ्यावी.

आदेशावरून

**कनिष्ठ लिपीक** (कोर्टाचा शिक्का) **सहाय्यक अधिक्षक**
**दिवाणी न्यायालय, शिरपूर** **दिवाणी न्यायालय, शिरपूर**

## जाहीर नोटीस

नि.६

**शिरपूर येथील मे.सिव्हील जज्ज सो. ज्युनी.डिव्ही. यांचे कोर्टात**

दिवाणी कि.अर्ज नं.१९०/२०२५

१) सायाबाई दंगल कोळी,
२) रामदास दंगल कोळी,
३) शिवाजी दंगल कोळी, सर्व रा.गिधाडे ता.शिरपूर, जि.धुळे,
सर्व ह.मु.रा.भोणे ता.जि.नंदुरबार. ..... **अर्जदार**

**विरूध्द**

कोणीही नाही ..... **जाबदेणार**

ज्याअर्थी अर्जदार सायाबाई दंगल कोळी वगैरे यांनी मे.न्यायालयात नामे दंगल परबत कोळी हे दि.२०/०१/२००७ रोजी मौजे भोणे ता.जि.नंदुरबार येथे मयत झालेले आहेत. अर्जदार हेच त्यांचे कायदेशीर एकमेव वारस असल्याबाबत अर्जदार याने बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट १८२७ चे कलम २ अन्वये कायदेशीर वारस प्रमाण पत्र मिळणे करीता. अर्ज दाखल केला आहे.

त्या अर्थी तमाम लोकांना कळविण्यात येते की, नामे दंगल परबत कोळी यांचे वारसांबाबत वर नमूद अर्जास कोणाची काही हरकत/तक्रार असल्यास दि.१०/०३/२०२५ रोजी ठिक १०:३० वाजता मे.न्यायालयात हजर होवून लेखी तक्रार सादर करावे तसे न केल्यास अर्जदार यांचा अर्ज मंजूर करून अर्जदार यांना वारस दाखला देण्यात येईल याची नोंद घ्यावी.

आदेशावरून

**कनिष्ठ लिपीक** (कोर्टाचा शिक्का) **सहाय्यक अधिक्षक**
**दिवाणी न्यायालय, शिरपूर** **दिवाणी न्यायालय, शिरपूर**

## जाहीर नोटीस

निशाणी नं.६

**शिरपूर येथील मे.सिव्हील जज्ज सो. (ज्यु. डि.) यांचे कोर्टात**

दि. कि. अर्ज नं. १८७/२०२५

**१) श्रीमती इंदुबाई वेडू पाटील, २) संदीप वेडू पाटील,**
**३) सचिन वेडू पाटील,** ४) संगिताबाई दत्तात्रय बोरसे
५) नेहा बाळासाहेब वाघ .... **अर्जदार**

**।।विरूध्द।।**

कोणीही नाही .... **जाबदेणार**

ज्याअर्थी मयत **वेडू वामन पाटील** हे दि. ०३/०१/२०२५ रोजी मौजे अर्थे खुा. ता. शिरपूर जि. धुळे येथे मयत झालेले असून, अर्जदार नं. १ ते ५ हेच मयत वेडू वामन पाटील यांचे कायदेशीर वारस असल्याबाबतचे प्रमाणपत्र मिळण्यासाठी मुंबई रेग्युलेशन अधिनियम १८२७ कलम २ अन्वये अर्ज दाखल केला आहे.

त्याअर्थी सर्व संबंधितांना सदर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, वरील मयत व त्यांच्या वारसांसंबंधी कुणाची काही हरकत/आक्षेप असल्यास सदर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ३० दिवसांच्या आत दिनांक ११/०३/२०२५ रोजी सकाळी १०.३० वाजता हजर होवून, हरकत/आक्षेप सादर करावा. अन्यथा सदर प्रकरणी पुढील कार्यवाही करणेत येईल.दि. ०३/०२/२०२५

सही:... सही...
**कनिष्ठ लिपिक** **सहा. अधिक्षक**
दिवाणी न्यायालय, (कोर्टाचा शिक्का) दिवाणी न्यायालय
शिरपूर जि. धुळे शिरपूर जि. धुळे

## जाहीर नोटीस

**शिरपूर येथील मे.दिवाणी न्यायाधीश सो. कनिष्ठ स्तर यांचे न्यायालयात**

दि. कि. अर्ज नं. १०२०/२०२५

**१) भिका लोटन धनगर, २) सोमेश्वर भिका धनगर,**
**३) ज्ञानेश्वर भिका धनगर,**
अ.नं.१ ते ३ रा.जातोडा ता.शिरपूर, जि.धुळे .... **अर्जदार**

।।विरूध्द।।

कोणीही नाही .... **जाबदेणार**

X

**शोभाबाई भिका धनगर** (मृत्यू दि. २०/०४/२०२१)
रा. जातोडा ता. शिरपूर जि. धुळे ... **मयत**

ज्याअर्थी अर्जदार यांनी मे. शिरपूर न्यायालयात मयत शोभाबाई भिका धनगर हे दि. २०/०४/२०२१ रोजी जातोडा ता.शिरपूर जि. धुळे येथे मयत झाले असून, अर्जदार यांना वारस प्रमाणपत्राची आवश्यकता असल्यामुळे अर्जदार यांनी बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट १८२७ कलम २ अन्वये वारस प्रमाणपत्र मिळणेबाबत अर्ज दाखल केलेला आहे.

त्याअर्थी सदर अर्जास कोणाचीही काही एक हरकत असल्यास अथवा काही खुलासा मांडावयाचा असल्यास त्यांनी दिनांक ५/३/२०२५ रोजी ठिक सकाळी १०.३० वाजता स्वत: अगर प्राधिकृत प्रतिनिधी मार्फत हजर राहून लेखी हरकती सादर कराव्यात. त्यानंतर आलेल्या हरकतीचा विचार केला जाणार नाही. व कुणाचीही काही एक हरकत नसल्याचे गृहीत धरुन सदर अर्जाबाबत पुढील कारवाई करण्यात येईल.

दिनांक ३०/०१/२०२५ रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी प्रसिद्धीस दिली असे.

सही:... सही...
**कनिष्ठ लिपिक** **सहा. अधिक्षक**
दिवाणी न्यायालय, (कोर्टाचा शिक्का) दिवाणी न्यायालय
शिरपूर जि. धुळे शिरपूर जि. धुळे

## जाहीर नोटीस

नि.६

**शिरपूर येथील मे.सिव्हील जज्ज सो. ज्युनी.डिव्ही. यांचे कोर्टात**

दिवाणी कि.अर्ज नं.१६९/२०२५

१) कविता रणजीत जाधव, २) राजकुमार दिलीप राजपुत,
रा.अहिल्यापुर ता.शिरपूर, जि.धुळे. ..... **अर्जदार**

**विरूध्द**

कोणीही नाही ..... **जाबदेणार**

X

दिलीप जगतसिंग राजपुत, मृत्यू दि.०५/१०/२०२१,
रा.अहिल्यापुर ता.शिरपूर, जि.धुळे. ..... **मयत**

ज्याअर्थी अर्जदार यांनी मे.शिरपूर न्यायालयात मयत नामे दिलीप जगतसिंग राजपुत हे दि.०५/१०/२०२१ रोजी मौजे अहिल्यापुर ता.शिरपूर जि.धुळे येथे मयत झाल्यामुळे अर्जदार यांना औपचारिक कारणासाठी वारस दाखल्याची आवश्यकता असल्याने अर्जदार यांनी बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट १८२७ चे कलम २ अन्वये वारस प्रमाणपत्र मिळणेबाबत अर्ज दाखल केलेला आहे.

त्याअर्थी सदर अर्जास कोणाचीही काहीएक हरकत असल्यास अथवा काही खुलासा मांडावयाचा असल्यास यांनी दि.७/३/२०२५ रोजी ठिक सकाळी १०.३० वा. स्वतःअगर प्राधिकृत प्रतिनिधी मार्फत हजर राहुन लेखी हरकती सादर कराव्यात. त्यानंतर आलेल्या हरकतीचा विचार केला जाणार नाही व कुणाचीही काहीएक हरकत नसल्याचे गृहीत धरून सदर अर्जा बाबत पुढील कारवाई करण्यात येईल.

दि.३/२/२०२५ रोजी माझ्या सहीने व कोर्टाच्या शिक्यानिशी प्रसिध्दीस दिली असे.

आदेशावरून

**सही/-** **सही/-**
**कनिष्ठ लिपीक** (कोर्टाचा शिक्का) **सहाय्यक अधिक्षक**
**दिवाणी न्यायालय, शिरपूर** **दिवाणी न्यायालय, शिरपूर**

## जाहीर नोटीस

**शिरपूर येथील मे.सिव्हील जज्ज सो. ज्युनी.डिव्ही. यांचे कोर्टात**

दिवाणी कि.अर्ज नं.१३६/२०२५
नि.नं.९ चौ.ता.११/३/२०२५

१) नरेंद्र गोविंद्र भागवत, रा.ब्रम्ह टेक, खालचेगाव, शिरपूर, जि.धुळे,
२) लक्ष्मीकांत गोविंद भागवत, ३) सौ.वीणा नितीन नाईक,
सर्व रा.कैलास विश्रांतवाडी, पुणे. ..... **अर्जदार**

**विरूध्द**

कोणीही नाही ..... **जाबदेणार**

विजया गोविंदा भावगत,
मयताचा पत्ता- ब्रम्ह टेक, खालचेगाव, शिरपूर, जि.धुळे,
मृत्यू दि.०५/०१/२०२५ ..... **मयत**

ज्याअर्थी अर्जदार नं.१ ते ३ यांच्या आई नामे विजया गोविंद भागवत ह्या दि.०५/०१/२०२५ रोजी मौजे शिरपूर, जि.धुळे येथे मयत झालेल्या आहेत. मयतास अर्जदार नं.१ ते ३ हेच कायदेशीर वारस आहेत. म्हणून अर्जदार यांनी बॉम्बे रेग्युलेशन अधिनियमाच्या कलम २ प्रमाणे वारसाचे प्रमाणपत्र मिळणेबाबत अर्ज मे.न्यायालयात त्यांनी दाखल केलेला आहे.

त्याअर्थी या नोटीशीने तमाम जनतेला कळविण्यात येते की, तमाम जनतेपैकी वरील मयताचे या अर्जदारांव्यतिरिक्त जे कोणी कायदेशीर वारस असतील त्यानी मे.न्यायालयात ही नोटीस प्रसिध्द झाल्यापासून ३० दिवसाच्या आत अगर दि.११/३/२०२५ रोजी ठिक सकाळी १०.३० वाजता स्वतःअगर प्राधिकृत प्रतिनींधीमार्फत हजर राहून लेखी हरकती सादर कराव्यात अन्यथा सदरील अर्जदाराच्या तोंडी लेखी पुरावा घेवून त्या आधारे अर्जदारा व्यतिरिक्त दुसरे कोणीच वारस नाही, असे गृहीत धरण्यात येवून मयताचे वारस म्हणून वारसांचे प्रमाणपत्र अर्जदार यांनी केलेल्या मागणीप्रमाणे देण्यात येईल. त्यानंतर आलेल्या हरकतींचा विचार केला जाणार नाही. मे.दिवाणी न्यायाधीश सो., क.स्तर, शिरपूर, जि.धुळे यांचे आदेशावरुन प्रसिध्दीस दिली असे.

आदेशावरून

**कनिष्ठ लिपीक** (कोर्टाचा शिक्का) **सहाय्यक अधिक्षक**
**दिवाणी न्यायालय, शिरपूर** **दिवाणी न्यायालय, शिरपूर**

## जाहीर नोटीस

नि.६

**शिरपूर येथील मे.सिव्हील जज्ज सो. ज्यु.डि. यांचे कोर्टात**

दि.कि.अर्ज नं.१८१/२०२५

१) छबीबाई धारू भिल, २) गुलाब धारू भिल,
३) बाबुराव धारू भिल, ४) विनोद धारू भिल,
५) दमुताबाई महेंद्र भिल, ६) अमृता जतन भिल,
७) सावित्रीबाई रामलाल भिल ..... **अर्जदार**

**विरूध्द**

कोणीही नाही ..... **जाबदेणार**

ज्याअर्थी मयत कै.धारु केसऱ्या भिल हे मौजे- वरूळ, ता.शिरपूर, जि.धुळे येथे मयत झाले असून अर्जदार हेच त्यांचे कायदेशीर वारस असल्याबाबतचे प्रमाणपत्र मिळण्यासाठी मुंबई रेगयुलेशन अधिनियम १८२७, कलम २ अन्वये अर्ज दाखल केला आहे अर्जदारांना सदरचा वारस दाखला शासकीय व निमशासकीय कामासाठी आवश्यक आहे.

त्याअर्थी सर्व संबंधितांना सदर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, वरील मयत व त्यांच्या वारसांसंबंधी कुणाची काही हरकत/आक्षेप असल्यास सदर नोटीस प्रसिध्द झाल्यापासून ३० दिवसांच्या आत दि.११/३/२०२५ रोजी सकाळी १०.३० वाजता हजर होवून, हरकत/आक्षेप सादर करावा. अन्यथा कोणाची काहीही हरकत नाही, असे समजण्यात येवून, अर्जदारांचा अर्ज मंजूर करण्यात येईल. दि.५/२/२०२५

आदेशावरून

**कनिष्ठ लिपीक** (कोर्टाचा शिक्का) **सहाय्यक अधिक्षक**
**दिवाणी न्यायालय, शिरपूर, जि.धुळे** **दिवाणी न्यायालय, शिरपूर, जि.धुळे**

## जाहीर नोटीस

नि.६

**शिरपूर येथील मे.सिव्हील जज्ज सो. ज्यु.डि. यांचे कोर्टात**

दि.कि.अर्ज नं.१८४/२०२५

१) शालिक शामराव तिरमले, २) लिलावती शिवाजी सांळुके,
३) सौ.कल्पनाबेन गुलाबराव महाजन,
४) ग.भा.जिजाबाई आनंदराव तिरमले,
५) समाधान आनंदराव तिरमले ..... **अर्जदार**

**विरूध्द**

कोणीही नाही ..... **जाबदेणार**

ज्याअर्थी मयत कै.शामराव सटू तिरमले हे मौजे- बोराडी, ता.शिरपूर, जि.धुळे येथे मयत झाले असून अर्जदार हेच त्यांचे कायदेशीर वारस असल्याबाबतचे प्रमाणपत्र मिळण्यासाठी मुंबई रेगयुलेशन अधिनियम १८२७, कलम २ अन्वये अर्ज दाखल केला आहे अर्जदारांना सदरचा वारस दाखला शासकीय व निमशासकीय कामासाठी आवश्यक आहे.

त्याअर्थी सर्व संबंधितांना सदर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, वरील मयत व त्यांच्या वारसांसंबंधी कुणाची काही हरकत/आक्षेप असल्यास सदर नोटीस प्रसिध्द झाल्यापासून ३० दिवसांच्या आत दि.११/३/२०२५ रोजी सकाळी १०.३० वाजता हजर होवून, हरकत/आक्षेप सादर करावा. अन्यथा कोणाची काहीही हरकत नाही, असे समजण्यात येवून, अर्जदारांचा अर्ज मंजूर करण्यात येईल. दि.५/२/२०२५

आदेशावरून

**कनिष्ठ लिपीक** (कोर्टाचा शिक्का) **सहाय्यक अधिक्षक**
**दिवाणी न्यायालय, शिरपूर, जि.धुळे** **दिवाणी न्यायालय, शिरपूर, जि.धुळे**

# हिरे वैद्य.महाविद्यालयात पस्तीस रूग्णांच्या डोळ्यांची शस्त्रक्रिया यशस्वी



**धुळे, दि.८- शहरातील श्री भाऊसाहेब हिरे वैद्यकीय महाविद्यालयात नेत्रशल्य चिकित्सा विभागाच्यावतीने जिल्ह्यात वेगवेगळ्या ठिकाणी घेण्यात आलेल्या मोतीबिंदुच्या शिबीराच्या माध्यमातून पंचवीस रूग्णांना शस्त्रक्रियेची आवश्यता आढळून आली. रूग्णांच्या सर्व तपासण्या करून शस्त्रक्रियेसाठी पात्र ठरवून ऑपरेशन करण्यात आले. तसेच दि.६ फेब्रुवारी रोजी हिरे वैद्यकीय महाविद्यालयात आलेले दहा नेत्ररूग्ण असे दोन दिवसांत एकुण पस्तीस नेत्ररूग्णांवर डॉ.मुकर्रम खान व डॉ.मुकेश सैनी यांनी यशस्वी शस्त्रक्रिया केल्या.**

नेत्ररूग्णांच्या शस्त्रक्रिया करतांना डॉ.अंकिता पटेल, डॉ.तिसीता वसावे, डॉ.अमोल घुले, डॉ.विनोद धुत, डॉ. निकिता इंगोले, डॉ.आदिती सासर, शल्यचिकित्सा कक्षातील नम्रता वळवी, रूक्साना शेख, साधना वळवी, निलेश वाडेकर व इतरांनी विशेष सहकार्य केले. तसेच डॉ.दत्ता देगांवकरांचेही सहकार्य मिळाले. मोतीबिंदूचे ऑपरेशन झालेल्या रूग्णांच्या डोळ्याची पट्टी जिल्हाधिकारी जितेंद्र पापळकर यांच्याहस्ते काढण्यात आली. यावेळी महाविद्यालयाचे डिन डॉ.सयाजी भामरे, डॉ.अजित पाठक, डॉ.माया वसईकर, डॉ.अमिता रानडे, मेट्रन अरूणा भराडे उपस्थित होते.

# श्रीमती हेमंतबेन रसिकलाल पटेल आयुर्वेद सिटी क्लिनिक येथे संधीवात, मणक्यांचे विकार तपासणी, पंचकर्म शिबीर



**शिरपूर, दि.८- माजी मंत्री आमदार अमरिशभाई पटेल, माजी नगराध्यक्ष भूपेशभाई पटेल यांच्या मार्गदर्शनाखाली एस.व्ही.के .एम. मुंबई संचलित श्रीमती हेमंतबेन रसिकलाल पटेल आयुर्वेद सिटी क्लिनिक, शिरपूर तर्फे संधीवात व मणक्यांचे विकार तपासणी व पंचकर्म उपचार शिबीर १३ फेब्रुवारी २०२५ गुरुवार रोजी सकाळी ९ ते दुपारी ३ वाजेपर्यंत करण्यात येणार आहे.**

नाव नोंदणीला १ फेब्रुवारी २०२५ पासून सुरुवात झाली असून सर्वप्रथम नाव नोंदणाऱ्या फक्त ३०० रुग्णांची तपासणी करण्यात येईल. नाव नोंदणी व शिबीराचे ठिकाण श्रीमती हेमंतबेन रसिकलाल पटेल आयुर्वेद सिटी क्लिनिक, दि शिरपूर पिपल्स को-ऑप. बँकेच्या मागे, महाराजा कॉम्पलेक्स, शिरपूर आहे. या ठिकाणी सांधे दुखी, मान दुखी, पाठ दुखी, आमवात, कंबर दुखी, टाच दुखी, संधिवात, गुडघे दुखी, हातापायाला मुंग्या येणे, सायटिका, मणक्याचे विकार, हाडे ठिसुळ होणे, नस दबणे, गादी सरकणे यावर तपासणी व पंचकर्म उपचार करण्यात येणार आहेत. यावेळी ब्लड प्रेशर तपासणी, हिमोग्लोबीन, ब्लडशुगर, बी.एम.डी. (हाडांची तपासणी), एचबीए १ सी, इसीजी या चाचणी अल्पदरात करण्यात येतील. रुग्णांना औषधी ३० टक्के सवलतीच्या दरात मिळतील. सोबत आपल्या आजारासंबंधीची अगोदरची फाईल असल्यास सोबत आणावी असे कळविण्यात आले आहे. तरी गरजू रुग्णांनी या सेवेचा लाभ घ्यावा असे आवाहन करण्यात आले आहे.

# भाड्याने घेतलेले वाहन परस्पर विकणारी सहा जणांची टोळी जेरबंद; दोन वाहने जप्त




**धुळे, दि.८- भाड्याने कार देणाऱ्या कंपन्यांकडून कार भाड्याने घेवून ती वाहने परस्पर स्वस्तात विक्री करून आर्थिक फसवणुक करणारी सहा जणांची टोळी धुळे तालुका पोलीसांनी जेरबंद केली असून दोन चारचाकी वाहनेही जप्त करण्यात आली आहेत.**

नाशिक जिल्ह्यातील नांदगाव येथील अभिषेक शिवाजी पाटील यांनी दिलेल्या फिर्यादीनुसार, सेकंडहॅण्ड वाहन खरेदी करावयाची असल्याने चांगल्या वाहनाचा शोध सुरू असतांना सोशल मीडियावर महिंद्रा थार क्र.टीएस ०७/केबी-७००४ हे वाहन विक्रीस असल्याचे समजले. शिरूड चौफुली येथे अरबाज नसील शेख (वय २६)व मो.अझरूद्दीन अब्दूल रज्जाक (वय २५), सैय्यद अबरार अकबर अहमद (वय २६) यांनी वाहन दाखविले. वाहन तीन लाख रूपयांत विक्री करण्याचे सांगत आगावू तीन लाख रूपयांची मागणी केली. ठरल्यानुसार उर्वरीत रक्कम तीन लाखांची रक्कम वाहन नावावर केल्याचे निश्चित झाले. वाहन तक्रारदाराकडे सुपूर्द केले, मात्र वाहन नावावर करून देण्यासाठी संपर्क साधला असता त्यांनी प्रतिसाद दिला नाही. त्यानंतर दहा दिवसांनी मो.मझर अहमद इफ्तेकार अहदम सिद्दीकी (वय ३०), मोहम्मद अब्दुल्लाबीन सैफ (वय ३२),सैय्यद शाह फवाद शाह (वय २२)सर्व रा.चंद्रयान गुट्टा, हाफी बाबा नगर, हैद्राबाद या तिघांनी वाहनाचे आम्ही मुळ मालक असल्याचे सांगितले. या वाहनाला जीपीएस लावले असल्याने कारचा शोध घेतआले. या वाहनाची चोरी झाल्याची तक्रार झाली असल्याने कार अभिषेक पाटील यांच्याकडून घेवून गेल्याने फसवणुक झाल्याची खात्री झाली.

दोन दिवसांपुर्वी अभिषेक पाटील यांनी नाव बदलुन पुन्हा आरोपींशी संपर्क साधुन कार खरेदी करण्याबाबत सांगितले. त्यानुसार सुझुकी कार एक्स एल-६, टीजी ०७/सी-१९८९ चा फोटो व्हाट्स ॲपवर दाखला. कार खरेदीसाठी आरोपीतांनी पुन्हा शिरूड चौफुली येथे दि.७ फेब्रुवारी रोजी दुपारी दोन वाजता बोलावले. त्याठीकाणी अभिषेक पाटील यांनी तीन आरोपींना ओळखले आरडा ओरड करून परिसरातील नागरिकांच्या मदतीने सहा जणांना ताब्यात घेवून गस्ती पथकातील पोलीसांच्या ताब्यात दिले. पोलीस स्टेशनला आणून विचारपुस केली असता आरोपींनी फिर्यादीची फसवणुक केल्याची खात्री झाली आहे.

ही कारवाई जिल्हा पोलीस अधीक्षक श्रीकांत धिवरे, अपर पोलीस अधीक्षक किशोर काळे, यांच्या मार्गदर्शनाखाली तालुका पोलीस स्टेशनमधील मपोकॉ. छाया पाटील, पोहेकॉ.कुणाल पानपाटील, उमेश पवार, पोकॉ. विशाल पाटील, पोहेकॉ. ललित खळगे, योगेश पाटील, अविनाश गहिवड, चेतन कंखरे, योगेश कोळी, धिरज सांगळे, सखाराम खांडेकर, राजु पावरा, भावेश झिरे यांनी केली.

**रक्तदान हेच सर्वश्रेष्ठ दान**


**हॉल विकणे**

धुळे, बांबू गल्लीतील, पहिल्या मजल्यावरील प्रशस्त हॉल त्वरित विकणे आहे. ऑफिस, हॉस्पिटल, होलसेल मेडिसीन, मोबाईल गॅलरीसाठी उपयुक्त.

-: संपर्क :-

8408958987


## पान १ वरुन

### दिल्लीत आपचा गड ढासळला

कोणालाच दिसत नव्हता. मात्र यावेळी भाजपने या मध्यमवर्गाला लक्ष्य केले आहे. परिणामी, दिल्लीत भाजपच्या बाजूने जे वातावरण निर्माण झाले आहे त्यात मध्यमवर्गाचा महत्त्वाचा वाटा असल्याची साक्ष आकडेवारी देत आहेत.

**दिल्लीत मध्यमवर्ग किती मोठा आहे?**

संपूर्ण देशाबद्दल बोलायचे झाले तर दरडोई उत्पन्नाच्या बाबतीत दिल्ली तिसऱ्या क्रमांकावर आहे. त्यात फक्त तेलंगणा आणि हरियाणा पुढे आहेत. दिल्लीत प्रति व्यक्ति दरडोई उत्पन्न १६७.५ टक्के आहे. दिल्लीच्या आर्थिक सर्वेक्षणातही असे सांगण्यात आले होते की सध्या राजधानीत दरडोई उत्पन्न प्रति व्यक्ति ४.६१ लाख आहे. एक आकडा असेही दर्शवितो की दिल्लीत मध्यमवर्गीय लोकसंख्या सुमारे ४५ टक्के आहे, ही राष्ट्रीय सरासरीपेक्षाही जास्त आहे जी सध्या ३१ टक्के आहे.

### कॉँक्रीट रस्त्यांची दुर्दशा

नागरिकांनी आपल्या तक्रारी महानगरपालिकेत सादर कराव्यात असे आवाहन याप्रसंगी शिवसेना पदाधिकाऱ्यांच्या वतीने करण्यात आले. मा.आ.गोटे व शिवसेना पदाधिकाऱ्यांनी केलेल्या आव्हाना नुसार शहरातील पत्रकारांना समवेत घेऊन हा पाहणी दौरा करण्यात आला. यावेळी बहुसंख्य पत्रकार उपस्थित होते. रस्ते महानगरपालिका पालिका माध्यमातून नगरउत्थान व राज्य नगरउत्थान योजना मूलभूत सुविधा अंतर्गत अनेक रस्ते कामांसाठी करोडो रुपयांचा निधी अशाप्रकारे अत्यंत निकृष्ट दर्जाच्या कॉँक्रीट रस्त्यांवर उधळण्यात आला आहे. सर्व रस्त्यांच्या तक्रारींची त्या सर्व रस्त्यांचे फोटो व्हिडिओ अपलोड करण्यात येणार आहे. प्रशासनाने दखल न घेतल्याने आता न्यायालयात दाद मागणार असल्याचा इशारा देण्यात आला. निकृष्ट रस्त्यांच्या पाहणी प्रसंगी शिवसेनेचे जवाहर पाटील, संजय पाटील, विनोद जगताप, ॲड.बंटी पाटील मुन्ना पठाण, शिवाजी शिरसाळे, राजेंद्र शिंत्रे, संदीप चौधरी, प्रशांत ठाकूर, सचिन रुणवाल, सलीम लंबू, नंदू पाकळे, सागर निकम, पंकज भारस्कर, शुभम रणधीर, अनिल शिरसाट, अमोल ठाकूर, चेतन भामरे, योगेश गोसावी, भुरा गोसावी, नंदकुमार भामरे, दीपक जाधव, डॉ. सोमनाथ चौधरी, चंद्रकांत हजारे, शिवाजीराव पाटील, नितीन भामरे, ज्योती चौधरी, तेजस सपकाळ आदी उपस्थित होते.

### पुलाचे काम लवकर पूर्ण करण्याचे निर्देश

कार्यालयात या संदर्भात झालेल्या बैठकीत महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळाच्या कार्यकारी अभियंता रंजना दळवी, तहसिलदार दीपक गिरासे व उप अभियंता श्री.वानखेडे यांच्या उपस्थितीत ही महत्वपूर्ण चर्चा झाली आहे.जनतेच्या सुरक्षिततेसाठी आणि प्रवास सुलभ करण्यासाठी प्रशासन कटिबद्ध आहे.लवकर विकासकामे पूर्ण करण्यासाठी सूचना देण्यात आल्या असून दि.१ मे २०२५ पूर्वी काम पूर्ण करण्यात येणार आहे.यामुळे नंदुरबार जिल्ह्यातील दळणवळण सुविधा सुरळीत होणार आहे.

### सार्व.गणेश मंडळांच्या भावनांशी खेळ

दसरा आला. पंधरा दिवसांनंतर दीपावली पर्वही उलटले. विधानसभा निवडणुकीचे बिगुल वाजल्याने स्पर्धा आयोजकांना चांगलेच फावले. आचारसंहितेच्या पडद्याआड लपून गणेश मंडळांसह परिक्षकांनी घेतलेल्या मेहनतीवर पाणी टाकण्याचे काम शिंदे सरकारने केले. परिणामी स्पर्धेतील सहभागी गणेश मंडळांच्या कार्यकर्त्यांमध्ये तसेच प्रचंड नाराजीचा सूर उमटू लागला आहे. परिक्षकांनीही कसब पणाला लावत सलग दोन दिवस रात्री दीड ते दोन वाजेपर्यंत प्रामाणिकपणे कर्तव्य बजावले. स्पर्धेतील विजेत्यांना बक्षिसे तर नाहीतच, सोबत परिक्षकांनाही मानधनापासून वंचित रहावे लागले आहे. स्पर्धा सुरू असतांना निवडणुकीप्रमाणेच दिशाभूल करणारी वागणुक परिक्षकांना देवून आता गरज सरो आणि वैद्य मरो अशी भूमीका गणेश आरास स्पर्धेचे नेतृत्व करणाऱ्या स्थानिक पदाधिकाऱ्यांनी घेतली आहे.

गणेशोत्सवानंतर पंधरा दिवस पितृपक्ष, त्यानंतर नवरात्र, दसऱ्यानंतरही काही दिवसांनंतर विधान सभा निवडणुकीसाठी निवडणुक विभागाने आचारसंहिता लागू केली. गणेशोत्सव ते दसऱ्या पर्यंतच्या काळात गणेश मंडळांचे बक्षिस वितरण होणे गरजेचे होते. परंतु शासनाने लाडक्या बहिणींचे लाड पुरवण्यासाठी गणेश भक्तांच्या भावनांशीही खेळ केला असल्याचे मत गणेश मंडळातील संतप्त पदाधिकाऱ्यांकडून व्यक्त केले जात आहे.

### निवेदन दिशाभुल करणारे

शिक्षिका व्यथित होवून पुन्हा मे. उच्च न्यायालयाच्या औरंगाबाद खंडपीठात १००६/२०२५ या आशयाची याचिका दाखल केली आहे. सदर याचिकेमध्ये शासन, शिक्षणाधिकारी सह तक्रारदार चंद्रकांत हजारे यांना प्रतिवादी केलेल आहे. त्यावर दि.२३ जानेवारी २०२५ रोजी कामकाज होऊन पुढील तारखेपर्यंत स्थगिती दिलेली असून हे तक्रारदाराला अवगत असतांना सुध्दा शिवसेना उबाठाच्या पदाधिकाऱ्यांची दिशाभूल करून खोटी माहिती पुरवून निवेदन देण्यास भाग पाडत आहे. सदरची बाब ही न्यायप्रविष्ठ आहे याबाबत खुलासा करत असल्याचे स्पष्ट केले आहे.

### ॲथलेटीक्स स्पर्धेसाठी निवड चाचणीचे आयोजन

असे आवाहन धुळे जिल्हा ॲथलेटीक्स असोसिएशन धुळेचे अध्यक्ष मा.आ.राजवर्धन कदमबांडे, प्रा.नरेंद्र पाटील, हेमंत भदाणे, प्रमोद पाटील यांनी केले आहे. सहभागासाठी विश्वास पाटील, प्रशांत पाटील, सुखदेव महाले, सुभाष पावरा, अमोल पाटील, धनंजय सोनवणे यांच्याशी संपर्क साधावा.


**पाहिजेत**

* पूर्णवेळ कामासाठी
* पॅकेजिंग विभाग : छोटे बॉक्स पॅक करणे, पाऊच भरणे
-: पत्ता :-
CS फॉउंडेशन
प्लॉट नं.४३, अशोक नगर, अशोक उद्याना जवळ, एलआयसी कॉलनी जवळ, लेनिन चौक, धुळे
संपर्क – 8999322698
मुलाखतीची वेळ – सायंकाळी ५ ते ६ वाजे दरम्यान.

**पाहिजेत**

कॉम्प्युटर कामासाठी मुलगा किंवा मुलगी पाहिजे.
Excel आणि इंटरनेट वापरता येणे आवश्यक.
कोयल ट्रान्सपोर्ट
चाळीसगावरोड क्रॉसिंग (फ्लाय ओव्हरच्या खाली) मोहाडी, धुळे
7057092669

**पाहिजेत**

नामांकित कंपनीच्या सेल्समन या पदासाठी पदवीधर पुरुष/स्त्री मेहनती, गरजू असलेले उमेदवार पाहिजेत. प्रत्यक्ष अर्जासह भेटणे.
वयोमर्यादा : २७ वर्ष फ्रेशर
१) गोदरेज – ०१ जागा
२) पॅनासोनिक – ०१ जागा
३) ओनिडा – ०१ जागा
४) आय.एफ.बी. – ०१ जागा
पगार साधारणत: १५०००
+ विमा + पीएफ + मेडिकल अलाउंस
भेटण्याची वेळ : सकाळी १० ते दु. ३, सायं.५ ते ९
कल्याणी इलेक्ट्रॉनिक्स
५७, महानगरपालिका कॉम्प्लेक्स, झाशी राणी पुतळ्याजवळ, धुळे

**पाहिजेत**

दुध डेअरीच्या कामासाठी अनुभवी माणसे पाहिजेत. समक्ष भेटा!
महात्माजी दुग्धालय
ग.नं.४, खोल गल्ली, धुळे

**विकणे आहे**

फ्रीज, डायनिंग टेबल, खुर्चीसह सागवानी लाकडाचे दिवान, बॉक्स पलंग, ड्रेसिंग टेबल सागवान लाकडाचे योग्य भावात आल्यास विकणे आहेत
-: संपर्क :-
9420879315
9422505530


## उठावणा एवं शोक बैठक



बड़े दुख के साथ आपको सूचित किया जाता है कि स्व.मदनलालजी श्रीकिसनजी अग्रवाल इनके सुपुत्र एवं नरेंद्र (नारायण) श्रीकिसनजी अग्रवाल इनका भतिजा तथा रविंद्र मदनलाल, मनीष एवं सुनील इनके बडे भाई तथा पवन एवं योगेश के पिताजी **श्री.सुरेश मदनलालजी अग्रवाल** इनका दुखद निधन हो गया है। ईश्वर इच्छा.

इनका **उठावना** आज रविवार दि ०९-०२-२०२५ को समय दोपहर ४-०० बजे अग्रवाल विश्राम भवन, नदी किनारे, धुलिया यहापर है.

एवं उनकी **शोक बैठक** सोमवार दि.१०-०२-२०२५ को एवं मंगळवार दि.११-०२-२०२५ को शाम ४ बजे से ६ बजेतक उनके **निजी निवास**- बालाजी अपार्टमेन्ट, ग्राउंड फ्लोअर, माणिक बंगले के सामने, अग्रवाल नगर, धुलीया यहाँपर है.

-: शोकाकुल :-

नरेंद्र श्रीकिशन अग्रवाल, रवींद्र मदनलाल अग्रवाल
मनीष, सुनील, पवन, योगेश,
करण, नील, राघव, जनक, देवांश
नंदकिशोर बाबूलाल अग्रवाल, किशोर कालूराम अग्रवाल
मनोहर रामगोपाल अग्रवाल, रमाकांत बसंतलाल अग्रवाल
संदीप कमलकिशोर अग्रवाल

**एवं समस्त भुतीया परिवार**

फर्म : वंदना कापड दुकान/अपोलो गारमेंट्स


**पाहिजेत** (GOLD'S GYM)

कॉम्प्युटर ऑपरेटर्स (मुली) - 2
जेन्टस ट्रेनर - 2
लेडीज ट्रेनर - 2
गोल्डस जिम, गांधी चौकाजवळ, आग्रा रोड, धुळे
संपर्क : 75881 20120

**पाहिजे**

अकौन्टींगच्या कामासाठी हुशार व अनुभवी मुलगा किंवा मुलगी पाहिजे. टॅलीचे ज्ञान आवश्यक
साईबाबा रेडीमेड ॲण्ड होजिअरी
गल्ली नं.२, मुल्लाबाडा रोड, अकबर चौक, धुळे
9422286958
7350148955

**पाहिजेत**

GST व इन्कम टॅक्स रिटर्न आणि Tally चे काम करण्यासाठी अनुभवी मुली / लेडीज ऑफिस असिस्टंट पाहिजे.
संपर्क : धवल शाह
ऑफिस : अशोका इस्टेट, संतोषी माता चौक, साक्री रोड, धुळे
9423383529 / 8766814290

**शेती विकणे आहे**

मेहेरगाव ते चिचवार शिवारात पेट्रोल पंपा लायक रोडटच शेती विकणे आहे.
-: संपर्क :-
हॉटेल ज्योती पंजाब
स्वस्तिक टॉकीजजवळ, धुळे

**पाहिजेत**

काट्यावर माल मोजण्यासाठी लेडीज- २/जेन्टस्-२
माऊली ट्रेडींग कंपनी
बालाजी मंदिजसमोर, ग.नं.४, धुळे
02562 - 235143
9422642107

**बंगला विकणे**

अग्रवाल नगर
वल्लभ नगर
डोंगरे महाराज नगर
डि.आर.प्रॉपर्टीज
9422289693

**रोडटच शेती विकणे**

चाळीसगाव रोड टच आणि साक्री रोड टच हॉटेल, मॅरेज लॉन, मंगल कार्यालयासाठी उपयुक्त एक एकर आणि दोन एकर शेती विकणे आहे.
डि.आर.प्रॉपर्टीज
9422289693

**गल्ली नंबर २- जागा विकणे**

अकबर चौक परिसरात बेकरी किंवा होलसेल कापड विक्री साठी उपयुक्त जागा विकणे आहे
डि.आर.प्रॉपर्टीज
9422289693

**गरम पाण्याचा एकच उपाय...**




आजच खरेदी करा आणि मिळवा पाईप सोबत फिटिंग फ्री *...
57 वर्षापासून आपल्या सेवेत...
अधिकृत विक्रेते श्री महावीर इलेक्ट्रीक ॲण्ड टी.व्ही.
श्रीराम मंदिराजवळ, फुलवाला चौक, आग्रा रोड, धुळे ▪ फोन: 229162, 235763

**पाहिजेत**

जायका चहा साठी ज्ञान असलेले
१) अनुभवी काऊंटर साठी धुळे
२) ड्रायव्हर पाहिजे.
समक्ष भेटा
-: संपर्क :-
नवीन महापालिकेसमोर, धुळे

**पाहिजेत**

होलसेल औषधाच्या कामासाठी जेन्टस्/लेडीज व सेल्समन बाहेरगावी जेन्टस् पाहिजे.
श्री साई फार्मा
ग.नं.५, धुळे
9422296296

**पाहिजेत**

अनुभवी टेलर पाहिजे. पडदे, सोफाकव्हर, मच्छरदाणी शिवणारा अनुभवी टेलर पाहिजे.
सीमा हॅण्डलूम
पारोळारोड, धुळे

**पाहिजेत**

दुकान कामासाठी मेहनती मुले पाहिजेत.
सम्राट बॅटरीज
पारोळारोड, धुळे
9823241749
8329784099

**पाहिजेत**

होजिअरी दुकानासाठी होतकरु माणसे पाहिजेत.
हेल्पर-३, सेल्समन-१
वय २० ते ३० पर्यंत
मोहनलाल दामोदरलाल
जैन मंदिरासमोर, ग.नं.२, धुळे
9422287153
9404891061
9405374753

**पाहिजे**

हॉस्पिटलमध्ये रात्रपाळीच्या कामासाठी मुलगा पाहिजे. अनुभव असल्यास प्राधान्य. समक्ष भेटा!
संगोपन बाल रुग्णालय
02562 - 235007


हे पत्र संपादक, मालक, प्रकाशक, हेमंत सुधाकर मदाने यांनी हेमंत प्रिंटींग प्रेस, वीर सावरकर मार्ग, धुळे येथे मुद्रित करुन आपला महाराष्ट्र, जनशक्ती, वीर सावरकर मार्ग, धुळे-४२४००१ येथे प्रकाशित केले. दुरध्वनी मुख्य कार्यालय, धुळे (०२५६२) २३५३९६, २३८३९६, aplamaha@gmail.com नंदुरबार २२३४४४ aplamahashd@gmail.com शहादा-२५६९३९, मालेगाव-२४३१३३६, नाशिक-२५७५९८९, पुणे-४००४११५, आपला महाराष्ट्र-रजि.नं.एम.एच.डी.आय.ए.१७ र.नं.११२२२/६०